**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

**पृ.शी./मु.शी.**: मंत्र्यांचा परिचय

**सभापती** : मंत्र्यांचा परिचय...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

(गोंधळ)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आपण अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी प्रथम औपचारिकता पूर्ण करीत असतो त्यामुळे कामकाजाच्या सुरुवातीला सभागृहाला मंत्र्यांचा परिचय करुन देत आहोत.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी पहिल्यांदा हरकत घेतली आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना नेहमी प्रथम बोलण्याची संधी दिली जाते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आजची सभागृहाच्या कामकाजाची पत्रिका आम्ही पाहिली त्यामध्ये मंत्र्यांचा परिचय ही बाब सर्वप्रथम दाखविली आहे. मला या संदर्भात एवढीच माहिती घ्यावयाची आहे की, कोणत्या मंत्र्यांचा शपथविधी झाला आहे. शपथविधीचा जो कार्यक्रम चॅनेलवर दाखविण्यात आला त्यामध्ये उप मुख्यमंत्र्यांचा शपथविधी झाल्याचे आम्ही पाहिले. घटनेच्या कलम 163 व 164 मध्ये उप मुख्यमंत्री नावाचा कुठेही उल्लेख नाही. त्यामध्ये मुख्यमंत्री, मंत्री आणि राज्यमंत्री असा उल्लेख आहे. त्यामुळे उप मुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाला असला तरी या सभागृहामध्ये ती बाब येऊ शकत नाही अशी संविधानातील तरतूद सांगते. त्याचप्रमाणे 28 जुलै 1995 नंतर हायकोर्टामध्ये एक केस दाखल झाली. माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या उप मुख्यमंत्रीपदाला चॅलेंज करण्यात आले त्यावेळी हायकोर्टाने असा निकाल दिला की, अशापध्दतीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

कोणतेही पद नाही. त्यामुळे राजभवनामध्ये शपथ घेतली गेली त्याबाबतचा शब्दश: वृत्तांत असा आहे की, "मी अजित आनंदराव पवार गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की, महाराष्ट्राचा उप मुख्यमंत्री म्हणून" यामध्ये उप मुख्यमंत्री अशाप्रकारचे पदच नसल्यामुळे घटनेप्रमाणे ती शपथ होत नाही.

गोंधळ

अशाप्रकारे जर कुणी मंत्री झाला नसेल तर त्या मंत्र्यांचा परिचय या सभागृहामध्ये कां करुन देत आहोत? तसे करणे म्हणजे या सभागृहाची प्रथा व परंपरा आपण मोडीत आहोत. जर मंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली असेल तर आम्ही समजू शकतो. काल पत्रकार परिषदेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी हे बीन खात्याचे मंत्री असल्याचे सांगितले. तसे सांगितले असेल तर कुण्या मंत्र्यांची खरेच शपथ झालेली आहे कां? याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. तशी कुणाही मंत्र्यांची शपथ झाली नसेल तर या सभागृहाला त्यांचा परिचय कां करुन दिला जात आहे? त्याचप्रमाणे उप मुख्यमंत्री हे पद नसल्यामुळे ती शपथ होऊ शकत नाही. त्यामुळे आपण संसदीय प्रथा आणि परंपरा कां मोडीत आहात असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याचे समर्थन करण्यासाठी उभा आहे. भारतीय संविधानातील कलम 164 मधील तरतुदीनुसार उप मुख्यमंत्री पदाबाबत कोणतीही तरतूद नाही. प्रश्न असा आहे की, या सभागृहामध्ये कामकाज करीत असतांना आपण अनेक वेळा कौल आणि शकधर यांच्या पुस्तकातील तरतुदीचा आधार घेत असतो. त्या कौल आणि शकधर यांनी आपल्या पुस्तकातील पान क्र. 144 वर याबाबत स्पष्टपणे म्हटले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, या सभागृहाचा नेता जाहीर होण्यापूर्वी मला त्या बाबत हरकत घ्यावयाची आहे. जर होणारे सभागृहाचे नेते या सदनाचे सदस्य नसतील तर अशा वेळी कोणती तरतूद अवलंबिली पाहिजे, याबाबत कौल आणि शकधर यांच्या पुस्तकामध्ये उल्लेख आहे. ही बाब पार्लमेंटमध्ये सन 1991 मध्ये उपस्थित झाली होती. त्यावेळी माननीय पंतप्रधान श्री.नरसिंह राव हे सभागृहाचे नेते नव्हते आणि सदस्यही नव्हते. अशा वेळी त्यांना नेता कसे निवडायचे, असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर तत्कालीन माननीय मनुष्यबळ विकास मंत्री यांना सभागृहाचा नेता म्हणून निवडण्यात आले. याबाबत कौल आणि शकधर यांच्या पुस्तकामध्ये उल्लेख आहे. पण मला असे वाटते की, ही बाब घटनेमध्ये नाही. अशा वेळी जर आपण घटनेच्या बाहेर जाऊन नियम करावयाचे ठरविले तर ते चुकीचे होईल. आज सुध्दा सांप्रत लोकसभेमध्ये माननीय पंतप्रधान हे लोकसभेचे सदस्य नाहीत तर ते राज्यसभेचे सदस्य आहेत. आज लोकसभेमध्ये माननीय मंत्री श्री.सुशिलकुमार शिंदे हे लोकसभेचे सभागृह नेते आहेत.

(सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे बोलणे पूर्ण होऊ द्यावे. माझ्यावर अन्याय होत आहे.

(सत्तारुढ पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्यावर अन्याय होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे. मी याबाबत रुलींग देत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, सांप्रत सभागृहा-मध्ये या सदनाचे 3 माननीय मंत्री आहेत. स्वत: माननीय मुख्यमंत्री या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत. माननीय मंत्री श्री.रामराजे नाईक निंबाळकर आणि माननीय राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान हे या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत. मला माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या बाबतीत व्यक्तिगत विरोध नाही. मात्र याबाबत घटनात्मक तरतूद आहे हे मला सांगावयाचे आहे आणि याबाबत आपल्याकडून मला रुलींगची अपेक्षा आहे, असे हे मला सांगावयाचे आहे आणि याबाबत मला माननीय सभापतींकडून रुलींग अपेक्षित आहे. ही बाब घटनेप्रमाणे नाही. पार्लमेंटमध्ये हे रुलींग 1991 मध्ये दिले होते.

(अनेक सन्मानीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे.

श्री.संदिप बाजोरिया : मी कुठे बोललो. प्रत्येक वेळी तुम्हाला मीच दिसतो काय? सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नीट बोलावे.

(सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया काही तरी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अहो, खाली बसा हो. कोण बोलत आहे, कोण बोलत आहे ? सभापती महोदय, हे काय चालले आहे? ते ओरडून बोलत आहेत. सभापती महोदय, ही काय पध्दत आहे ? सन्माननीय श्री.रावते साहेब, ही काय पध्दत आहे ? सभापती महोदय, ही सभागृहाची पध्दत आहे का ?

(सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया तसेच इतर अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

(सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आपली जागा सोडून पुढे जातात.)

श्री.जयंत प्र.पाटील : ए तू पण नीट बोल रे. काय बोलतोस, सांग.काय बोलतोस, सांग. तू काय बोलतो रे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब, आपल्याला असे बोलता येणार नाही. सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांचा मान राखणे, हे आपले व्यक्तिगत कर्तव्य आहे. या दृष्टीकोनातून सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी नम्रपणे बोलत आहे. यापूर्वी जी रुलींग आहेत, त्यानुसार व कौल आणि शकधर यांच्या पुस्तकातील संदर्भांच्या आधारावर मी बोलत आहे. माझी आपल्याला नम्र विनंती आहे. या संबंधातील रुलींग हे ऐतिहासिक स्वरुपाचे होणार आहे. या सभागृहात डी.पी.डी.सी.कशी असावी आणि कशी नसावी याबद्दल 2-3 वेळा घटनेचा आधार घेऊन सदनामध्ये निवेदन केले आहे. पण आम्हाला येथे न्याय मिळाला नाही. मग आम्ही हाय कोर्टामध्ये गेलो आणि त्याठिकाणी माझ्या बाजुने निर्णय दिला आहे. हाय कोर्टाने आठ दिवसापूर्वी सांगितले की, हे राज्य घटनेप्रमाणे चालले पाहिजे. अशा वेळी मला याबाबत आपल्या कडून रुलींगची अपेक्षा आहे.जर याठिकाणी आम्हाला न्याय मिळाला नाही तर मी हाय कोर्टामध्ये जाणार आहे आणि मग तेथे याबाबत ऐतिहासिक निर्णय होईल. जर माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी मंत्री म्हणून शपथ

बी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

शपथ घेतली असती तर तसा त्यांना अधिकार आहे.परंतु याबाबत आम्हाला माहितीच नव्हते कारण आम्हाला त्या समारंभाचे आमंत्रणच आले नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

:

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ...

आम्हाला शपथविधीच्या कार्यक्रमाचे आमंत्रणच आले नाही. त्यामुळे ते मंत्री झाले की, उप मुख्यमंत्री झाले हे आम्हाला कळले नाही. या बाबतीत परिपूर्ण अभ्यास करुन निर्णय मिळावा अशी मी आपल्याकडून अपेक्षा करतो.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कार्यक्रम पत्रिकेवरील पहिल्याच विषयाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी आपले आक्षेप नोंदविलेले आहेत. हे आक्षेप नोंदविताना ते सोयीस्कररित्या इतिहास विसरत आहेत. 1995 साली सुध्दा उप मुख्यमंत्री पदाचीच शपथ देण्यात आली होती. आता त्यांना या सभागृहाचे नेते कोण आहेत त्या बद्दलचा प्रश्न निर्माण होत आहे. या अगोदरच्या अधिवेशनापर्यंत सन्माननीय श्री. अजितदादा पवार हे या सभागृहाचे सदस्य नसताना सभागृहाचे नेते होते आणि आपण सगळ्यांनी त्यांना मान्यता दिली होती. त्यामुळे आपल्या सोयीप्रमाणे वेगळा अर्थ लावणे आणि परंपरेने जे चालत आलेले आहे त्यामध्ये कोठे तरी खोडा घालणे ही प्रवृत्ती अतिशय चुकीची आहे. कोणत्याही परिस्थितीत या प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यात येऊ नये. जे काही सर्वमान्य आहे, जे प्रथेप्रमाणे आहे त्याप्रमाणेच हे सर्व होत आहे. त्यामुळे असा निष्कारण वाद निर्माण करुन त्यांनी सभागृहाचा वेळ घेऊ नये. आपण सभागृहाची कार्यवाही त्वरित पुढे सुरु करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या बोलण्यामध्ये चुकीची माहिती आलेली आहे ती मी दुरुस्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी अशी माहिती दिली की, श्री. गोपीनाथ मुंडे साहेबांनी उप मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यावेळी हायकोर्टामध्ये आपल्या ॲडव्होकेट जनरल यांनी ॲफिडेव्हिट सादर केले आणि सांगितले की त्यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली होती नंतर त्यांना ऑफिशियली कॉन्फर केले गेले. असे ॲफिडिव्हिट आहे. ते आपण माहितीसाठी पहावे. त्यावेळी टी.व्ही.वर अमुक दिसले तमुक दिसले असे सांगण्यात आले. ते सर्व कोर्टाने मागवले आणि पाहिले आणि त्या ॲफिडेव्हिटच्या आधारे कोर्टाने दिर्णय दिला की, उप मुख्यमंत्री म्हणून जर शपथ घेतली असेल तर तर ते योग्य नाही. ते मंत्री म्हणून राहू शकत नाहीत. पण त्यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली असल्यामुळे त्यांना अधिकार दिले गेले असतील तर ते चालेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

आपण पुन्हा जाऊन मंत्री म्हणून शपथ घेऊन यावे. घाईघाईमध्ये ते राहिले असेल. पण आपण अभ्यास करा आणि नंतर या.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यावर स्पष्टीकरण देण्यासाठी मी उभा आहे. ही गोष्ट खरी आहे की, माननीय श्री. अजितराव पवार यांचा उप मुख्यमंत्री म्हणून शपथविधीचा कार्यक्रम झालेला आहे आणि माननीय मुख्यमंत्री यांनी सर्वांना निमंत्रण दिले होते. कदाचित त्यांना यावयाचे नसेल म्हणून त्यांनी सांगितले की, आम्ही येणार नाही. ज्या अर्थी त्यांनी सांगितले की, आम्ही येणार नाही त्या अर्थी त्यांना हे माहीत होते की, शपथविधीचा कार्यक्रम आहे. त्यांनी सांगितले की, आम्हाला काही माहीत नव्हते.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, 1995 साली माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी उप मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. बिहारमध्ये सुध्दा आपल्याच पक्षाकडे उप मुख्यमंत्री पद आहे. कर्नाटकमध्ये सुध्दा उप मुख्यमंत्री पद आपल्याच पक्षाकडे आहे.

श्री. विनोद तावडे : त्या ठिकाणी काँग्रेसचे सदस्य काही बोलले नाहीत.

श्री. हर्षवर्धन पाटील : काल जे 25 आमदार आले त्यांना काय सांगावयाचे ते आम्ही सांगू. माझी सभागृहाला विनंती आहे. सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील विषयाप्रमाणे आपण मला मंत्र्यांचा परिचय करुन देण्यास सांगितले त्याप्रमाणे मला मंत्र्यांचा परिचय करु देण्याची परवानगी द्यावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्हाला या बाबत निर्णय पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले तसेच सन्माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी या बाबतीत आपापल्या पध्दतीने स्पष्टीकरण मांडले. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे होते की, घटनेप्रमाणे मुख्यमंत्री आणि मंत्री, उप मुख्यमंत्री या संदर्भात मंत्री पदांचा पदाचा उल्लेख आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

या ठिकाणी उप मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणे योग्य आहे काय असा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. या संदर्भात मी आपणास या विधानपरिषदेमध्ये ज्यांचा उप मुख्यमंत्री म्हणून परिचय करुन देण्यात आला त्याचा तपशील सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो.

| | |
|---|---|
| श्री. छगन भुजबळ, उप मुख्यमंत्री | 11 नाव्हेंबर 2009 |
| श्री. छगन भुजबळ, उप मुख्यमंत्री | 15 डिसेंबर 2008 |
| श्री. छगन भुजबळ, उप मुख्यमंत्री | 22 जानेवारी 2003 |
| श्री. विजयसिंह मोहिते-पाटील,उप मुख्यमंत्री | डिसेंबर 2003 |
| श्री. गोपीनाथ मुंडे,उप मुख्यमंत्री | 25 मार्च 1995 |

या अनुषंगाने औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये दिनांक 18 जुलै 1998 रोजी श्री. दीपक गुलाबराव साळुंके विरुध्द गव्हर्नमेण्ट ऑफ महाराष्ट्र असे एक रिट दाखल झालेले होते. या संदर्भात उच्च न्यायालयाने जे आब्झर्व्हेशन केलेले आहेत त्यामधील परिच्छेद क्रमांक 18 मी आपल्या माहिती करिता वाचून दाखवितो.

“ For all practical purposes, the respondent No.6 is recognized by people at large and by the Chief Minister and members of the Council of Ministers, as Deputy Chief Minister. However, there is no doubt in anybody’s mind, that the respondent No.6 is not having any powers of the Chief Minister as invested in Chief Minister under the Constitution of India. So, it cannot be said that if the respondent No.6 poses himself as Deputy Chief Minister and if the leaders and members of B.J.P. describe him as Deputy Chief Minister, either privately or publicly, any false statement is made. No misrepresentation or no offence is committed by describing the respondent No.6 as Deputy Chief Minister...”

या पध्दतीचे उच्च न्यायालयाचे रुलिंग आहे. हे रुलिंग वाचल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा मी बाजूला सारुन मंत्र्यांचा परिचय करुन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

देण्याची परवानगी देत आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भातील रुलिंग मी नंतर देईन.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपणास व आपल्या मार्फत या सभागृहाला माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित अनंतराव पवार यांचा परिचय करुन देत आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सभागृहाच्या नेत्याबद्दल घोषणा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यादृष्टीने सभागृहाचा नेता हा माननीय मुख्यमंत्री ठरवतील. मंत्रिपदाबाबत कायदेशीर तरतूद आहे. त्या तरतुदीच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री यांनी श्री. अजित अनंतराव पवार यांची या सभागृहाचा नेता म्हणून नियुक्ती केलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की,

**सभापती** : मी आपले म्हणणे ऐकून घेतलेले आहे. आपण कृपा करुन खाली बसावे.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभागृहाचे नेतेपद रिक्त असून महाराष्ट्र विधानपरिषद सभागृहाच्या नेत्याच्या नियुक्तीच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी मला पत्र पाठवून कळविलेले आहे की, महाराष्ट्र विधानपरिषद नियमावलीतील नियम 2 च्या पोट नियम जे-1 मधील तरतुदीनुसार विधानपरिषद सभागृहाचा नेता म्हणून श्री. अजित अनंतराव पवार यांची उप मुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करीत आहे. या प्रमाणे मी श्री. अजित अनंतराव पवार यांना विधान परिषद सभागृहाचा नेता म्हणून घोषित करीत आहे.

----

नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: भारताचे माजी पंतप्रधान, श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे,माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

.

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान, श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा,कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे,माजी वि.प.स. यांच्या निधनाबदद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" भारताचे माजी पंतप्रधान, श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा,कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे,माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय,कै.इंद्रकुमार गुजराल यांचा जन्म 4 डिसेंबर, 1919 रोजी झेलम येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., पी.एचडी. पर्यंत झाले होते.

कै.गुजराल यांनी 1942 च्या स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय भाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

कै.गुजराल यांनी दिल्ली रोटरी क्लबचे अध्यक्ष, इंडिया इंटरनॅशनल सेंटरचे संस्थापक-सदस्य, विश्वभारती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष तसेच दिल्ली नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै.गुजराल 1964,1970 व 1992 असे तीन वेळा राज्यसभेवर तर 1989 व 1998 असे दोन वेळा लोकसभेवरही ते निर्वाचित झाले होते.

कै.गुजराल यांनी 1967 ते 1976 याकाळात केंद्रीय मंत्रीमंडळात संसदीय कार्य, दळणवळण, माहिती प्रसारण, गृहनिर्माण व नगरविकास खात्याचे राज्यमंत्री तसेच 1989-90 व 1996-97 या काळात परराष्ट्र व्यवहार खात्याचे मंत्री म्हणून कार्य केले होते. तर एप्रिल 1997 ते मार्च 1998 या काळात देशाचे पंतप्रधानपदही त्यांनी भूषविले होते.

अशा या कुशल प्रशासक, अत्यंत अभ्यासू, विचारवंत, उत्कृष्ट संसदपटू, अनुभवी व शिस्तप्रिय जेष्ठ नेत्याचे शुक्रवार दिनांक 30 नोव्हेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय,कै. विलासराव दगडोजीराव देशमुख यांचा जन्म 26 मे 1945 रोजी लातूर जिल्ह्यातील बाभळगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.एस्सी.,बी.ए.,एलएल.बी.पर्यंत झाले होते.

कै.देशमुख यांनी लातूर येथील मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट, मांजरा मेडिकल कॉलेज व राजीव गांधी इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलाजी मुंबईचे संस्थापक-अध्यक्ष तसेच मांजरा सहकारी साखर कारखाना, रेणा सहकारी साखर कारखाना व विकास सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक, लातूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे सदस्य, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक तसेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक तसेच सहकारी संस्थाशी निकटचा संबंध होता.

कै. देशमुख यांनी बाभळगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, लातूर पंचायत समितीचे उपसभापती तसेच उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी फार मोठे योगदान दिले आहे.

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. भोगले 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

कै. देशमुख 1980, 1985, 1990, 1999 व 2004 असे पाच वेळा लातूर विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते तसेच 2009 व 2012 असे दोन वेळा राज्यसभेवरही निर्वाचित झाले होते. त्यांनी 1980-85 या काळात अनेक महत्वाच्या खात्यांचे राज्यमंत्री तसेच 1986-95 या काळात महसूल, सार्वजनिक बांधकाम, सहकार, कृषी, परिवहन, शिक्षण, तंत्रशिक्षण, दुग्धविकास, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, उद्योग, सांस्कृतिक कार्य व विधान कार्य इत्यादी खात्यांचे मंत्री तर 1999 ते 2003 व 2004 ते 2008 असे दोन वेळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, तसेच 2009 ते 2012 याकाळात केंद्रीय मंत्रिमंडळात अवजड उद्योग, ग्रामीण विकास व विज्ञान, तंत्रज्ञान या खात्यांचे मंत्री म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. त्यांच्या मंत्री व मुख्यमंत्री पदाच्या काळात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे अनेक महत्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतले होते.

कै. देशमुख हे उत्तम संघटक, कुशल प्रशासक, अत्यंत कार्यक्षम, अभ्यासू, उत्कृष्ट संसदपटू वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्व या तिन्ही गुणांचा संगम असणारे दिलखुलास व रुबाबदार व्यक्तिमत्वाचे जन मानसातील लोकप्रिय नेते होते.

अशा या विकासाची दूरदृष्टी असलेल्या उमद्या नेत्याचे मंगळवार, दिनांक 14 ऑगस्ट 2012 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, आज देखील विलासराव देशमुख आपल्यातून निघून गेले आहेत हे आपल्या मनाला पटत नाही. आपणही त्यांच्याबरोबर काम केले आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला स्वर्गीय विलासराव देशमुख यांच्याबरोबर मंत्रीमंडळात काम करण्याची संधी लाभली. राज्याच्या हिताच्या दृष्टीने काम करीत असताना सर्वांना विश्वासात घेऊन पुढे जाण्याची त्यांची पध्दत होती. विरोधकांशी देखील त्यांनी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित केलेले होते. पक्ष संघटना किंवा प्रशासनाच्या संदर्भात जी कोणती जबाबदारी सोपविण्यात आली ती अतिशय तडफेने पार पाडण्याचे काम आठ वर्षे या राज्याचे मुख्यमंत्री असतानाच्या काळात त्यांनी केले. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत मला आणि माझ्या अनेक सहकाऱ्यांना त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी लाभली होती.

सभापती महोदय, राजकीय जीवनामध्ये काम करीत असताना एखादा आजार झाल्यानंतर त्या आजाराकडे दुर्लक्ष केल्यामुळे स्वर्गीय विलासराव देशमुख यांना किती मोठी किंमत मोजावी लागली हे आपण प्रत्यक्ष पाहिले आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी आजपर्यंत राज्याच्या विकासासाठी दिलेले योगदान हे सभागृह कधीही विसरु शकणार नाही, अशी त्यांची कारकीर्द होती. राज्याचे मुख्यमंत्री असूनही सर्वसामान्य माणसाला त्यांच्याशी मोबाईल फोनवरुन संपर्क साधणे सहज शक्य व्हायचे. मुख्यमंत्री या नात्याने त्यांच्याशी कोणी मोबाईल फोनवरुन संपर्क साधला तर म्हणणे ऐकून घेऊन त्याची अडचण दूर करण्याचे काम ते करीत असत.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य सहा महसुली विभागांमध्ये विखुरलेला आहे. असे असले तरी प्रत्येक विभागातील प्रश्नांची बारकाईने जाण असणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांना आपण सर्वांनी अतिशय जवळून पाहिलेले आहे. त्यांच्या दु:खद निधनामुळे फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही कदापि भरुन न निघणारी पोकळी आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

कै. कृष्णराव रखमाजीराव देसाई ऊर्फ बाबासाहेब कुपेकर यांचा जन्म 7 मार्च 1942 रोजी कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज तालुक्यातील कानडेवाडी येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. कुपेकर यांनी कानडेवाडी येथील सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था व स्मारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, गडहिंग्लज तालुका खरेदी-विक्री संघ, दौलत सहकारी साखर कारखाना व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अनेक वर्षे संचालक म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. कुपेकर यांनी कानडेवाडी गावचे सरपंच, कोल्हापूर जिल्हापरिषदेचे सदस्य व कृषी-पशुसंवर्धन समितीचे सभापती तसेच महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. कुपेकर 1995, 1999, 2004, 2009 असे सलग चार वेळा गडहिंग्लज मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. ऑक्टोबर 1999 ते ऑक्टोबर 2004 या काळात राज्याचे सहकार, पर्यावरण, कामगार, उद्योग व माजी सैनिकांचे कल्याण या खात्यांचे राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी कार्य केले होते. 6 नोव्हेंबर 2004 ते ऑक्टोबर 2009 या काळात महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष पद भूषवून त्यांनी फार मोठे योगदान दिले आहे.

अशा या अभ्यासू लोकप्रतिनिधी, कुशल प्रशासक, उत्कृष्ट संसदपटु व सामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी सतत आग्रही असणाऱ्या नेत्याचे बुधवार, दिनांक 26 सप्टेंबर 2012 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कुपेकर साहेबांबरोबर मला 1995-1999, 1999-2004, 2004-2009 या काळात काम करण्याची संधी मिळाली होती. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वाद तसेच बेळगावच्या संदर्भात जो वाद सुरु आहे त्याबाबत त्या भागातील जनतेला न्याय मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. शेवटच्या वेळेस ते ज्यावेळेस जसलोक हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते त्यावेळेस



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

महाराष्ट्र कर्नाटक सीमा वाद, बेळगावचा वाद मिटला पाहिजे, त्या भागातील जनतेचे प्रश्न सुटले पाहिजेत, या भागातील जनतेचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे अशा प्रकारचे त्यांचे नेहमी सांगणे असायचे. परंतु कुपेकर साहेब अचानक आपल्याला सोडून गेले. कै.कुपेकर आताही विधानसभेचे सदस्य होते. अशा थोर व्यक्तीला आपण सर्व जण मुकलेलो आहोत.

सभापती महोदय, कै. शंकरराव चिमाजी जगताप यांचा जन्म 14 फेब्रुवारी 1923 रोजी सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील वाघोली येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए.,एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. जगताप यांनी महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होऊन देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात तसेच गोवा मुक्ती संग्रामातही सक्रीय सहभाग घेतला होता.

कै. जगताप यांनी कोरेगाव एज्युकेशन संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाचे संस्थापक-सल्लागार तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कार्यकारी सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा कोरेगाव तालुक्यातील अनेक सामाजिक, शैक्षणिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै. जगताप यांनी सातारा जिल्हा परिषदेचे सदस्य, बांधकाम व आरोग्य समितीचे सभापती तसेच सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपदही भूषविले होते. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. जगताप 1978, 1980, 1985, 1990, 1995 असे सलग पाच वेळा सातारा जिल्ह्यातील कोरेगाव मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी विधीमंडळाच्या सार्वजनिक उपक्रम समिती, अंदाजसमिती व विशेष हक्क समितीचे समितीप्रमुख म्हणूनही उत्तम कार्य केले होते. 1980-85 या काळात विधानसभेचे उपाध्यक्ष तर 1985-90 या काळात विधानसभेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

अशा या ज्येष्ठ गांधीवादी, अत्यंत अभ्यासू, विचारवंत, उत्तम प्रशासक, उत्कृष्ट संसदपटू म्हणून कार्य केलेल्या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक 25 ऑगस्ट 2012 रोजी दु:खद निधन झाले.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

कै. बाळासाहेब ठाकरे यांचा जन्म दिनांक 23 जानेवारी 1926 रोजी पुणे येथे झाला. त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा लढ्यात सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. ठाकरे यांनी सुरुवातीस काहीकाळ "फ्री प्रेस जर्नल" या दैनिकात व्यंगचित्रकार म्हणून नोकरी केली होती. तसेच साप्ताहिक "मार्मिक" व दैनिक "सामना"चे संपादक म्हणून कार्य केले होते.

कै.ठाकरे यांनी 1966 मध्ये मुंबई येथे शिवसेनेची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक आणि राजकीय कार्यात ते सक्रीय झाले होते.

कै. ठाकरे यांनी शिवसेना पक्ष बांधणीसाठी संघटन कौशल्य वापरुन भारतीय कामगार सेना, स्थानिक लोकाधिकार समिती, विद्यार्थीसेना या संघटना स्थापन केल्या होत्या.

जनमानसातील लोकप्रिय नेता, व्यंगचित्रकार, संपादक, कुशल संघटक, कलाप्रेमी, स्पष्ट व बेधडकपणाचे वक्तृत्व अशा बहुआयामी जीवन जगणाऱ्या, लढाऊ वृत्तीच्या ज्येष्ठ नेत्याचे शनिवार, दिनांक 17 नोव्हेंबर 2012 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, कै. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा यांचा जन्म १ जानेवारी, १९२४ रोजी अहमदनगर येथे झाला. त्यांचे शिक्षण पदवी पर्यंत झाले होते.

कै. दिकोंडा यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय भाग घेतल्यामुळे त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. दिकोंडा यांनी सोलापूर येथील पद्मशाली शिक्षण संस्थेचे सरचिटणीस, पद्मशाली समाजाचे अध्यक्ष, इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबईचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाचे संचालक, सोलापूर मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार व पश्चिम महाराष्ट्र विणकर सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा सोलापूर येथील अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता. ते काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. दिकोंडा १९८६ व १९८८ असे दोन वेळा महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते.

..४..

श्री. अजित पवार....

अशा या ज्येष्ठ समाजसेवकाचे शनिवार, दिनांक २० ऑक्टोबर २०१२ रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.ओटवणेकर

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

कै. कन्हैयालाल विशनदास गिडवाणी यांचा जन्म 31 मार्च, 1949 रोजी गुजरात मधील अहमदाबाद जिल्ह्यातील साबरमती येथे झाला. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले होते.

कै.गिडवाणी यांनी भारतीय अन्न विकास महामंडळाचे सदस्य, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे संचालक तसेच महानगर टेलिफोन निगमचे सल्लागार सदस्य म्हणूनही कार्य केले होते.

कै.गिडवाणी सन 2000 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या समाजसेवकाचे मंगळवार, दिनांक 27 नोव्हेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

कै. सदाशिवराव आण्णासाहेब शिंदे यांचा जन्म 3 जुलै, 1927 रोजी सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील खाचगुण येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए., एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै. शिंदे यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय भाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

कै. शिंदे यांनी कोल्हापूर वीज कामगार संघटनेचे अध्यक्ष, महात्मा गांधी सेवा मंडळाचे संस्थापक, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. ते कॉंग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते होते.

कै. शिंदे 1964 व 1970 असे दोन वेळा कोल्हापूर स्थानिक प्राधिकारीसंस्था मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते.

अशा या जेष्ठ समाजसेवकाचे रविवार, दिनांक 23 सप्टेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

सभापती महोदय, या सर्व मान्यवरांना मी भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करतो.

===

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महादेय, आजच्या शोक प्रस्तावामध्ये अनेक थोर नेत्यांचा समावेश आहे. शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे हे अत्यंत थोर होते. त्यांचे नेतृत्व अवर्णनीय होते. श्री.वसंतराव नाईक यांच्यानंतर महाराष्ट्रात जास्त काळ मुख्यमंत्री पदावर राहिलेले मुख्यमंत्री म्हणजे श्री.विलासराव देशमुख हे आहेत. त्यांचा देखील शोक प्रस्ताव आपल्या सभागृहा समोर आहे. आपल्या प्रथेप्रमाणे आपण गट नेत्यांना शोक प्रस्तावावर बोलण्यास अनुमती देतो. त्या ऐवजी आज आपण अपवाद म्हणून या शोक प्रस्तावावर अन्य सन्माननीय सदस्यांना देखील बोलण्यास अनुमती द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी 8 मान्यवरांच्या दु:खद निधना निमित्त शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्या शोक प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल यांचे देखील निधन झाले आहे. स्वातंत्र्य लढ्यातील एकेक मोहरे हळूहळू कमी होत चालले आहेत. त्यातील एक मोहरा श्री.इंद्रकुमार गुजराल हे होते. 1942 च्या भारत छोडो आंदोलनामध्ये ते सक्रिय होते. त्यात त्यांना कारावासही झाला होता.

विद्यार्थी दशेत असताना त्यांनी कम्युनिस्ट पक्षाचा कार्यकर्ता म्हणून चळवळ गाजवली. स्वातंत्र्य लढ्यात आल्या नंतर त्यांचा संबंध कॉंग्रेस पक्षाशी आला व त्यानंतर त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. आणीबाणीच्या काळात ते माहिती व दूरसंचार खात्याचे मंत्री होते. त्या अनुषंगानेच त्यांचा केंद्रीय मंत्री म्हणून राजकीय प्रवास सुरू झाला. त्यांनी संसदीय कार्य, दळणवळण, माहिती प्रसारण, गृहनिर्माण व नगरविकास अशा प्रकारच्या वेगवेगळ्या खात्यांचा कार्यभार सांभाळला होता. मधल्या काळात ते मंत्री नव्हते. त्यावेळी ते सोव्हिएत युनियनमध्ये भारतीय राजदूत म्हणून कार्यरत होते. त्यावेळी रशियाची जिओ-पॉलिटकली स्थिती बदलत होती. त्यात त्यांनी अतिशय महत्वपूर्ण भूमिका वटवली होती.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

आंतरराष्ट्रीय धोरणासंबंधीचे त्यांनी घेतलेले निर्णय या देशातील सर्वसामान्य लोकांच्या नेहमीच लक्षात राहील.

सभापती महोदय, श्री.इंद्रकुमार गुजराल यांनी देशाचे बारावे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली त्यावेळी देशात राजकीय आणि आर्थिक अस्थिरता होती. देशात राजकीय अस्थिरता निर्माण झालेली असल्यामुळे जगात आपल्या देशाची असलेली शान हळूहळू कमी होत होती. अशा काळात त्यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली. श्री.इंद्रकुमार गुजराल हे परराष्ट्र मंत्री असताना त्यांनी जे काम केले ते सर्व जनतेच्या लक्षात राहिले आहे.अशा या कुशल प्रशासक, अभ्यासू, विचारवंत, अनुभवी व शिस्तप्रिय नेत्यास आपण भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहोत.

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांच्या बद्दल बोलावयाचे झाल्यास संघर्ष सुध्दा हसत खेळत घेणारी व्यक्ती म्हणून श्री. विलासराव देशमुख यांच्याकडे पाहता येईल. या सभागृहात कै.प्रमोद नवलकर असो, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी असो, सन्माननीय सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर असो, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरराव रावते असो वा अन्य सदस्य असो यांच्या समवेत एखाद्या विषयावर वैचारिक संघर्ष झाला तरी कधीही व्यक्तिगत हेत्वारोप करायचे नाही असे श्री.विलासराव देशमुखांचे व्यक्तिमत्व होते. अशा प्रकारचे प्रशिक्षण पहिल्या बाकावर बसलेल्यांकडून मिळते आणि ते मागील बाकावर बसलेल्या सदस्यांनी घ्यायचे असते.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुखांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे समोरच्या कार्यकर्त्यांची पत, प्रतिष्ठा कशी वाढेल हे ते नेहमीच पहायचे. श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना मी त्यांना साठ्ये कॉलेजच्या अमृत महोत्सवाच्या कार्यक्रमाला उपस्थित रहावे यासाठी निमंत्रण देण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी ते मला म्हणाले की, "माझी भरपूर धावपळ होत आहे आणि वेळ देखील नाही. तेव्हा मला कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी आग्रह केला नाहीस तर बरे होईल." त्यावर मी त्यांना म्हणालो की, " मी त्या कॉलेजचा विद्यार्थी आहे म्हणून आपण त्या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे मला वाटले म्हणून मी आपणास निमंत्रण देण्यासाठी आलो."





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

मी त्या कॉलेजचा विद्यार्थी आहे असे समजल्यावर त्यांनी लगेच माझे निमंत्रण स्वीकारले. श्री.विलासराव देशमुख साठ्ये कॉलेजच्या कार्यक्रमाला आल्यानंतर भाषण करताना सुरुवातीची सात-आठ मिनिटे ते माझ्याबद्दलच बोलत राहिले. विनोद तावडे सभागृहात कसे काम करतात, आपल्या अभ्यासू वृत्तीने आम्हाला अडचणीत कसे आणतात आणि त्यांनी हे सर्व प्रशिक्षण ज्या कॉलेजमध्ये घेतले ते कॉलेज कसे आहे हे पाहण्यासाठी मी या ठिकाणी आलो आहे असे त्यांनी माझ्याबद्दल वक्तव्य केले. म्हणजे समोरच्या कार्यकर्त्याची प्रतिष्ठा कशी वाढेल हे ते नेहमीच पहायचे. मग तो कार्यकर्ता कोणत्याही पक्षाचा असो. त्यांच्या अशा स्वभावामुळे विरोधी पक्षातील मंडळींना सुध्दा त्यांच्याबद्दल एक आपुलकी होती.

सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी सांगितल्याप्रमाणे श्री.विलासराव देशमुख हे कोणत्याही कार्यकर्त्यांचे फोन स्वत: घ्यायचे. श्री.विलासराव देशमुख यांना आम्ही फोन लावला तर ते स्वत: फोन उचलतात असे मराठवाड्यातील कार्यकर्त्याने त्याच्या मित्राला सांगितल्यावर त्याला ते खरे वाटायचे नाही. मग तो कार्यकर्ता श्री.विलासराव देशमुख यांना फोन लावायचा आणि फोन स्पीकरवर ठेवून त्यांच्याशी बोलायचे. त्यावेळी ते कार्यकर्त्याचे नाव घेऊन त्यांच्याशी संवाद साधायचेच परंतु त्याच्याकडून गावाकडील माहिती देखील घ्यायचे. आपल्या कार्यकर्त्यांचा फोन स्वत: मुख्यमंत्री घेतात असे समजल्यावर त्या कार्यकर्त्याची गावात प्रतिष्ठा वाढायची आणि त्यामुळे त्यांची कामे देखील व्हायची. राजकीय जीवनात माणसे कशी जोडली पाहिजेत हा गुण त्यांच्याकडून घेण्यासारखा आहे.

सभापती महोदय, सन 2011 मध्ये आशिया खंडात क्रिकेट वर्ल्ड कपचे आयोजन करण्यात आले होते. या वर्ल्ड कपमधील अंतिम सामाना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार होता आणि त्या दृष्टीने वानखेडे स्टेडियमची दुरुस्ती सुरु होती. त्या स्टेडियच्या बाजूच्या असलेल्या हॉकी असोसिएशन आणि मुंबई विद्यापीठाची त्यासाठी परवानगी मिळत नव्हती, त्यामुळे दुरुस्तीची कामे रखडली होती. वर्ल्ड कपचा अंतिम सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियम ऐवजी अन्य ठिकाणी होणार किंवा कसे अशी परिस्थती निर्माण झाली होती. श्री.विलासराव देशमुख हे त्यावेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष होते. माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेब हे अध्यक्ष होते.

..3..



AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि.... 11:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यांच्याकडून देखील दुरुस्तीच्या कामासाठी परवानगी मिळण्यासाठी प्रयत्न सुरु होते. परंतु श्री.विलासराव देशमुख यांनी स्वत: लक्ष घालून ते काम विहित वेळेत पूर्ण करुन घेतले आणि वर्ल्ड कपचा अंतिम सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झाला. त्यांचे क्रिकेट क्षेत्रातील योगदान देखील महत्वपूर्ण आहे.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख हे हजरजबाबी होते. त्यांच्या हजरजबाबीपणाचे अनेक किस्से् आपणास ज्ञात आहेत. मला चांगले आठवते की, मी विद्यार्थी चळवळीत काम करीत होतो त्या वेळची गोष्ट आहे. त्यावेळी डॉ.पद्मसिंह पाटील हे पाटबंधारे मंत्री होते तर श्री.विलासराव देशमुख हे जलसंपदा मंत्री होते. मराठवाड्यात श्री.निलंगेकर पाटील, डॉ.पद्मसिंह पाटील आणि श्री.विलासराव देशमुख यांचे कसे राजकारण होते हे आपणास माहीत आहे. लातूरच्या एका कार्यक्रमात डॉ.पद्मसिंह पाटील उपस्थित होते, त्यावेळी श्री.विलासराव देशमुख म्हणाले की, "पाटील साहेब तुम्ही अडवा, मी जिरवतो." त्यांना सांगावयाचे होते की, पाटील साहेब आपण पाणी अडवा, आम्ही पाणी जिरवण्याचे काम करतो.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

इतक्या मार्मिक शब्दामध्ये त्यांनी सहजपणे राजकीय स्थितीचे वर्णन केले. ते मुख्यमंत्री पदावर असतांना यशवंतराव चव्हाण ऑडिटोरियममध्ये लावणी महोत्सव करण्यात आला त्यावेळी त्या महोत्सवाच्या उद्‌घाटनासाठी माननीय श्री. विलासराव देशमुख व माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेब गेले व समारोपाच्या कार्यक्रमासाठी माननीय गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील व माननीय श्री. नितीन गडकरी साहेब गेले. त्यावेळी माननीय श्री. आर. आर. पाटील असे म्हणाले की, गडकरी साहेब बारी आली की, हे दोघे जाणार आणि वारी आली की, आपल्याला पाठविणार. त्यानंतर तीन महिन्यांनी सोलापूरला लावणी महोत्सव झाला त्यावेळी माननीय श्री. विजयसिंह मोहिते पाटील यांनी माननीय श्री. विलासराव देशमुख यांना बोलाविले होते. त्यावेळी ते असे म्हणाले होते की, "हे आघाडीचे शासन आहे व सांस्कृतिक खाते आमचेकडे असून गृह खाते तुमच्याकडे आहे. तुम्ही तुमचा डान्स बार बंद केला आता आमच्या सांस्कृतिक खात्याच्या लावणी महोत्सवाच्या तंबूत कसे घुसता? हे चालणार नाही" अशाप्रकारे मार्मिक भाषेमध्ये एखाद्याला चिमटा घ्यावयाचा परंतु तो कळवळणार नाही अशाप्रकारची त्यांची वक्तृत्व शैली होती. अनेक वेळा अधिकाऱ्यांबरोबर बैठकीमध्ये चर्चा करण्यासाठी बसल्यानंतर निर्णय कोणता घ्यावयाचा हे त्यांच्या डोक्यामध्ये पक्के ठरलेले असायचे. त्यावेळी मी जर एखादा विषय मांडल्यानंतर बैठकीला उपस्थित असलेल्या श्री. स्वाधीन क्षत्रिय यांना ते तावडे साहेब बरोबर बोलत असल्याचे सांगायचे. अशाप्रकारे जनतेच्या हिताच्या दृष्टीने ते निर्णय घेत होते.

सभापती महोदय, माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांना ज्यावेळी मुंबईहून चेन्नईला पुढील उपचार करण्यासाठी हलविण्यात आले त्यावेळी आपल्या राज्यामध्ये एअर ॲम्बुलन्स नसल्यामुळे ती दुबईहून मागवावी लागली. जगाच्या पाठीवर प्रगत असलेल्या या मुंबई शहरामध्ये एक एअर ॲम्बुलन्स नसल्यामुळे दुबईहून ती येईपर्यन्त आपल्याला चार-पाच तास थांबावे लागले व त्यानंतर स्ट्रेचरवरुन त्यांना वाकडे-तिकडे करीत न्यावे लागले. या निमित्ताने शासनाला कुठेतरी आवर्जून विचार करावा लागणार आहे. ही निर्माण झालेली गरज लक्षात घेऊन याकरिता जर शासनाकडे निधी नसेल तर खाजगी स्वरुपामध्ये आपण स्पॉन्सरशीप देऊन कशाप्रकारे ही व्यवस्था निर्माण करु शकतो याचा आपण या ठिकाणी विचार करावा अशी मी शासनाला सूचना करु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

इच्छितो. सरपंच पदापासून केंद्रीय मंत्री पदापर्यन्त कसे जाता येते याचा मी माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांना आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर हे विधानसभेचे अध्यक्ष होते. आपण शेतकरी असल्याबद्दलचा अभिमान नेहमी त्यांच्या बोलण्यामधून आणि वक्तव्यामधून जाणवत होता. कारखान्याच्या निवडणुकीमधून निवडून आल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांकडे जबाबदारी सोपवून सत्तेमधून बाहेर पडण्याची हिंमत त्यांनी दाखविली. आमच्या पक्षाचे सदस्य माननीय श्री. चंद्रकांत पाटील आणि आमच्या पक्षाच्या कोल्हापूरच्या मंडळींकडून माननीय श्री. कुपेकर साहेबांच्या गावासंबंधी मी काही गोष्टी आवर्जून ऐकल्या होत्या. त्यामध्ये त्यांनी आपल्या चंदगड गावासाठी साडे चार कोटींची नळ पाणी पुरवठा योजना 40 दिवसामध्ये मंजूर करुन घेतली. आपण कोणत्याही पदावर असलो तरी जनतेच्या कामासाठी सतत मागे लागून ते ती गोष्ट करुन घेत असत. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातील 1 लाख रुपयांच्या खर्चाची बचत होईल यासाठी त्यांनी 16 कोटी रुपयांची सोलर स्ट्रीट लाईट योजना मंजूर करुन घेतली. त्या योजनेच्या आधारे देश पातळीवर सर्व ठिकाणी ती योजना सुरु झाली. अशाप्रकारे वेगवेगळया गोष्टी माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीमध्ये केल्या. शाळेमध्ये असतांना बेळगाव सीमा प्रश्नावरील आंदोलनामध्ये सहभाग घेतला म्हणून त्यांची शाळेतून हकालपट्टी करण्यात आली होती. अशाप्रकारे या विषयाशी त्यांची त्यावेळी व नंतरही कमिटमेंट होती. मी या निमित्ताने माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, मी मघाशी उल्लेख केला की, स्वातंत्र्य लढयातील एकेक मोहरे कमी होत चालले आहेत त्यामध्ये माननीय श्री. शंकरराव जगताप यांचा उल्लेख करावा लागेल. स्वातंत्र्य लढयामध्ये आणि गोवा मुक्ती संग्रामामध्ये सुध्दा त्यांनी योगदान दिले होते. ते सलग पाच टर्म विधानसभेवर निवडून आले होते. मागील वर्षी माननीय राष्ट्रपती महोदया श्रीमती प्रतिभाताई पाटील मुंबईमध्ये कार्यक्रमासाठी आलेल्या असतांना माननीय श्री. शंकरराव जगताप त्या कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यावेळी त्यांच्याबरोबर गप्पा मारल्या असता 1972 च्या दुष्काळामध्ये त्यांनी सातारा जिल्ह्यामध्ये बांधलेल्या 100 पाझर तलावांचा उपयोग आजही होत असल्याचे मला समजले. राजकारणामध्ये कोणत्याही पदावर विराजमान झाल्यानंतर आपल्या मतदार संघातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सर्वसामान्य जनते करिता बारीक सारीक गोष्टी करुन घेणारे माननीय श्री. शंकरराव जगताप यांचे नेतृत्व होते. मी या निमित्ताने त्यांनाही भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:50

श्री.विनोद तावडे . . . .

माननीय बाळासाहेब ठाकरे हे खरे म्हणजे आमच्या भारतीय जनता पार्टीचे कुटुंब प्रमुखच होते आणि त्यांच्या बाबतीत जेवढे बोलावे तेवढे कमीच आहे. परंतु या शोक प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांना देखील बोलावयाचे असल्याने अधिक बोलता येणार नाही. मात्र त्यांच्या बाबतीत 4-5 मुद्यांचा उल्लेख केला पाहिजे की, त्यांच्यामध्ये द्रष्टेपणा होता आणि त्यांना दहा-वीस वर्षानंतरचे दिसत असे. त्यांनी जे-जे विषय मांडले ते वादग्रस्त झाले असतील. या देशामध्ये बांगला देशातून घुसखोर येत आहेत हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर तो विषय देखील वादग्रस्त झाला होता आणि आपण गेल्या काही वर्षापासून पहात आहोत की, आज ती समस्या प्रत्यक्षात उभी राहिलेली आहे.

सभापती महोदय, मी विद्यार्थी परिषदेचा कार्यकर्ता असताना एक लाख, दोन लाखाचा मोर्चा काढावा यासाठी माननीय प्रमोदजी महाजन यांना भेटावयास गेलो होतो. मी त्यांना सांगितले की, आम्हाला विद्यार्थ्यांचा एक मोर्चा काढावयाचा आहे. त्यावर त्यांनी मला असे विचारले की, अशा प्रकारचा मोर्चा काढावा ही कल्पना कशामुळे आली? मी त्यांना सांगितले की, मी 1987-1988 च्या काळामध्ये राजपथवर 10-12 लाख शेतकऱ्यांचे आंदोलन पाहिले आहे. त्यामुळे मलाही असे वाटले की,आपणही अशा प्रकारे विद्यार्थ्यांचा मोर्चा काढू शकतो.साधारणपणे इंडिया टुडे, विकली मॅगझिन वगैरे वाचल्यानंतर पुढील दशक हे शेतकऱ्यांचे असेल असे वाटत होते. जर पुढील दशक शेतकऱ्यांचे असेल तर शेतकऱ्यांच्या बरोबरीने विद्यार्थ्यांचेही ते दशक असेल असे चित्र उभे राहू शकते काय असा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. ज्याप्रमाणे 1970 मध्ये आणीबाणीच्या काळामध्ये चित्र होते तसेच चित्र नंतर आसाम मध्ये देखील झाले. त्यावेळी श्री.प्रमोद महाजन यांनी सांगितले की, मी जेव्हा बाळासाहेब ठाकरे यांना भेटलो तेव्हा त्यांनी असे सांगितले की, प्रमोदजी, पुढील दशक हे शेतकऱ्यांचे असणार नाही तर पुढील दशक हे राजकारणातल्या हिंदुत्वाचे असणार आहे. याबाबतीत प्रमोदजीचे म्हणणे असे होते की, मला ते कधीच खरे वाटत नाही. त्यानंतर मी जेव्हा माननीय श्री.शरद पवारसाहेबांशी बोललो तेव्हा तेही असे म्हणाले की, अशा प्रकारे असूच शकत नाही. कारण सध्या शेतकऱ्यांच्या संबंधातील विषय प्रभावीपणे उपस्थित होत आहेत.परंतु माननीय शिवसेना प्रमुखांनी विलेपार्ले येथील पोट निवडणूक "गर्व से कहो, हम हिंदू है" या हिंदुत्वाच्या मुद्यावर लढविली आणि पुढील दशकामध्ये राजकारणातील हिंदुत्व त्यांनी यशस्वी करुन दाखविले आणि सुप्रीम कोर्टामध्ये हिंदुत्वाच्या व्याख्ये बाबत विजय देखील मिळविला.अशा प्रकारचा माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

शिवसेना प्रमुखांचा द्रष्टेपणा होता. आम्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असल्यामुळे स्वाभाविकपणे आम्हीही हिंदुत्ववादी होतो. अशा वेळी माझ्यासारखा कार्यकर्ता स्वयंसेवक संघाच्या हिंदुत्वामध्ये आणि माननीय शिवसेना प्रमुखांच्या हिंदुत्वामध्ये काय फरक आहे याबाबतीत सतत चाचपणी करीत असे. एकदा महाराष्ट्र टाईम्स्चे संपादक श्री.गोविंद तळवलकर यांनी उल्लेख केला की,"संघाच्या आमटीला शिवसेना प्रमुखांच्या हिंदुत्वाने फोडणी दिली." हे मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने माझ्या आणि त्यांच्या गाठीभेटी होत असत. त्यावेळी मी भारतीय जनता पक्षाचा मुंबईचा अध्यक्ष होतो.

सभापती महोदय, एकदा त्यांच्याबरोबर गप्पा मारता-मारता हिंदुत्व, भगवद्‌गीता या अनुषंगाने विषय निघाला असताना माननीय शिवसेना प्रमुख असे म्हणाले होते की, आपल्या भगवद्‌गीते मध्ये सांगितले आहे की, गाय पळत आहे आणि तिच्यामागे कसाई देखील पळत आहे. पण गाय एका दिशेने निघून गेली. मग कसायाने एकाला विचारले की, गाय कोठून गेली? तर उत्तर देणा-याला असे सांगितले की, गाय इकडून गेली असे सांग म्हणजे जेणेकरुन गोहत्तेचे पाप लागणार नाही आणि चांगल्या गोष्टीसाठी खोटे बोलले तरी काही बिघडत नाही. शिवसेना प्रमुख त्यावर असेही म्हणाले की, विनोद, मला असा हिंदुत्ववादी पाहिजे, जो कसायाला सांगेल की, "गाय इकडून गेली आहे आणि तुझी हिंमत असेल तर तेथे जाऊन दाखव. मग तुझे मुंडके तोडले नाही तर बघ." हा त्यांच्या हिंदुत्वातील खरा फरक आहे, तो येथे आहे.त्यानंतरच्या काळामध्ये त्यांच्या भूमिकेबाबत मुंबईमध्ये ज्या काही घडामोडी घडल्या, त्याकडे आपण त्याच विचाराच्या आधारावर पाहिले पाहिजे. अशा प्रकारे अतिशय कठोर असणारे त्यांचे व्यक्तिमत्व तेवढेच मृदू होते.

सभापती महोदय, प्रमोदजी यांच्यावर हल्ला झाला व त्यांना हिंदुजा मध्ये दाखल करण्यासाठी धावपळ सुरु होती. त्यावेळी आम्ही सर्वजण टी.व्ही.चॅनेलवरुन दिसत होतो. त्यावेळी बाळासाहेबांचे सेवक यांचा मला फोन आला. त्यांने मला सांगितले की, "साहब को बात करनी है" त्यावेळी ते मला म्हणाले की,"विनोद, आता प्रमोद महाजन यांची काय स्थिती आहे?" त्यावर मी असे सांगितले की, मघाशी मी आत जाऊन आलो. त्यांच्या शरिरामध्ये चार-पाच गोळ्या आहेत आणि डॉक्टरांनी प्रयत्न केले तरच काही शक्यता आहे नाहीतर सगळे अवघड दिसते.माझे हे वाक्य ऐकल्यानंतर त्यांचे असे वाक्य होते की,"आई जगदंबेने माझ्याकडून माँ, बिंदूमाधव यांना हिरावून



APR/ KTG 11:50

श्री.विनोद तावडे . . . .

नेले आहे. आता या वेळी मी प्रमोद महाजन यांना नेऊ देणार नाही अशा प्रकारची त्यांची ही जी त्यांची भावना होती ती केवळ पुत्रप्रेमाचीच होती. सहकारी युती पक्षाचा सदस्य म्हणून नाही तर त्यावेळी आम्ही प्रमोद महाजन यांच्यावर असलेले त्यांचे खरे पुत्रवत प्रेम पाहिले होते. तसेच तेवढेच ते मनाने दिलदार देखील होते.

सभापती महोदय, आम्ही युती सरकारमध्ये असताना संभाजीनगरची निवडणूक युती न करता लढलो आणि त्यावेळी एकमेकांवर खूप आरोप-प्रत्यारोप झाले. त्यावेळी शिवसेना पक्षाचे 4 नगरसेवक जास्त होते आणि भाजपचे नगरसेवक कमी होते. पण जेव्हा महापौर ठरविण्याची वेळ आली तेव्हा माननीय श्री.नितीन गडकरीसाहेब शिवसेना प्रमुखांना भेटावयास गेले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, साहेब, या वेळी या तत्कालीन कारणामुळे जर आमच्या पक्षाचा महापौर झाला तर ते जास्त उपयुक्त होणार आहे आणि साहेबांनी ही बाब लगेच मान्य केली. अशा वेळी अगोदरच्या कटू आरोप-प्रत्यारोपामध्ये न जाता साहेबांनी सांगितले की, ठीक आहे. तुमच्या पक्षाचा महापौर होईल. मात्र अडीच वर्षानंतर आमच्या पक्षाचा महापौर झाला पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

ही त्यांची दिलदार वृत्ती होती. मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे मी मुंबई प्रदेश भारतीय जनता पक्षाचा अध्यक्ष असताना शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख श्री. उद्धवजी ठाकरे आणि मी आम्ही दोघे मिळून महानगरपालिकेच्या निवडणुकीत खूप फिरलो. रात्री 2-3 वाजेपर्यंत आम्ही एकत्र शाखांमध्ये आणि पक्ष कार्यालयांमध्ये जात होतो. त्यावेळी आम्ही विजय संपादन केला. विजय संपादन केल्यानंतर सकाळी फोन वाजला. फोनवर डायरेक्ट बाळासाहेब होते. त्यांनी मला कोठे आहेस असे विचारले. मी सांगितले की, मी घरी आहे. लगेच मातोश्रीवर या असे ते म्हणाले. त्या ठिकाणी जी पत्रकार परिषद झाली त्यामध्ये त्यांनी एका बाजूला माननीय उद्धवजी ठाकरे यांना बसविले आणि दुसऱ्या बाजूला मला बसविले. त्यांनी आम्हाला दोघांना विजयाचे श्रेय दिले. आपण केलेल्या कामाची तेव्हा नेतृत्वाकडून पोचपावती मिळाली.

अशा अनेक गोष्टी माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून शिकावयास मिळाल्या. कार्यकर्त्यांना, नेत्यांना सांभाळणे काय असते या गोष्टी शिकावयास मिळाल्या. ज्यावेळी शिवाजी पार्कवर दुसऱ्या पक्षाच्या एखाद्या नेत्याची सभा असावयाची त्यावेळी कोणाच्या तरी गच्चीवरुन मी ती सभा पाहात असे. त्या ठिकाणी जवळ श्री. मनोहर जोशी यांची गच्ची आहे तसेच श्री. अनुप जलोटा यांची गच्ची आहे. पण ज्या वेळी श्रीमती सोनिया गांधी यांची मुंबईमध्ये पहिल्यांदा शिवाजी पार्कवर सभा झाली ती त्यांची सभा मला पहावयाची होती. त्यावेळी श्री. मनोहर जोशी तसेच श्री. अनुप जलोटा मुंबईत नव्हते म्हणून मी श्री. राज ठाकरे यांच्या गच्चीवर ती सभा पहावयास गेलो. मला असे वाटले की, एवढ्या लांबून सभा पाहिल्यानंतर मी सभा पाहात आहे हे कोणाच्याही लक्षात येणार नाही. पण एका पत्रकाराने झूमवरुन फोटो काढून छापला. दोन महिन्यानंतर मी जेव्हा नरेंद्रभाई यांना घेऊन साहेबांना भेटावयास गेलो त्यावेळी त्यांनी सहजपणे ही चूक लक्षात आणून दिली. ते म्हणाले की, तू राजबरोबर कॉलेजला असल्यापासून येतोस हे मला माहीत आहे. तू त्याच्याशी राजकारणावर बोलणार नाही आणि तोही तुझ्याशी राजकारणावर बोलणार नाही हेही मला माहीत आहे पण तू आता कार्यकर्ता नसून नेता आहेस आणि जेव्हा तुझा कार्यकर्ता किंवा अनुयायी हा फोटो बघतो तेव्हा कन्फ्युज होतो की, आपण इकडे जावे की तिकडे जावे, कारण आपला नेता येथे दिसतो. म्हणून अशा गोष्टी टाळल्या पाहिजेत. त्यांनी हे अगदी सहजपणे सांगितले. एखाद्याने रागवून सांगितले असते पण साहेबांनी ते अगदी सहजपणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सांगितले. अशा गोष्टी सहजपणे त्यांच्या बारीकबारीक गोष्टीतून शिकावयास मिळत असत.

परळ येथे आयटीसी हॉटेल झाले. त्या हॉटेलच्या समोर सिगारेट कंपनीच्या जवळ वर्षानुवर्षे एस.टी. चा बसस्टॉप होता. कोकणातून येणारे लोक त्या ठिकाणी उतरुन तेथून आपापल्या घरी जात असत. त्या आयटीसी हॉटेलच्या समोरच तो बसस्टॉप असल्यामुळे हॉटेलवाल्यांनी काही लोकांना हाताशी धरुन तो बसस्टॉप तेथून काढावयास लावला. त्या संदर्भात वर्तमानपत्रात वाचकांची पत्रे या सदरात एक पत्र आले. ते पत्र पाहून साहेबांनी तेथील आमदार आणि नगरसेवकाला फोन केला आणि सांगितले की, कोकणातील आणि मुंबईतील सामान्य माणूस त्याच ठिकाणी उतरणार, पाहिजे तर आयटीसी हॉटेलवाल्यांनी दुसरीकडे हॉटेल काढावे. पुन्हा महिनाभराने एस.टी.चा बसस्टॉप त्या ठिकाणी उभा करण्यात आला. ही घटना सन 2002 किंवा 2004 मधील लेटेस्ट घटना असेल. इतक्या सर्वोच्च पदावर असतानाही अशा बारीक गोष्टींकडे ते लक्ष ठेऊन असावयाचे.

साहेबांचे बोलणे नेहमी कॉन्ट्रॉव्हर्शीयल का होते अशी माझ्या मनात नेहमी शंका असावयाची. परवा ज्यावेळी श्री. नरेंद्र मोदी, माननीय उद्धवजी ठाकरे, श्रीमती रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना भेटावयास आले त्यावेळी श्री. नरेंद्र मोदी यांनी त्याचे अतिशय चांगल्या शब्दात वर्णन केले. ते म्हणाले की, बाळासाहेब हे कार्टुनिस्ट आहेत, व्यंगचित्रकार आहेत. त्यामुळे ते जो विचार करतात तो व्यंगचित्रातून करतात आणि ते व्यंगचित्र पाहिले की आपल्याला हसावयास येते आणि त्यातील मर्म कळते. पण ज्यावेळी ते व्यंगचित्र न काढता नुसते बोलतात त्यावेळी जर चित्र नसेल तर त्यातून नुसताच टोकदार मेसेज जातो. त्यामुळे व्यंगचित्रकाराच्या नजरेतून आलेले वक्तव्य त्या नजरेतून पाहिल्यानंतर टोकदार न वाटता ते वास्तव वाटते. शिवसेनाप्रमुखांच्या अशा अनेक आठवणी, अनेक गोष्टी अनेक सन्माननीय सदस्य सांगू शकतील. मी माननीय शिवसेनाप्रमुखांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

माननीय श्री. विठ्ठलराव दिकोंडा हे अच्युतराव पटवर्धन, एस.एम.जोशी, नानासाहेब गोरे अशा समाजवादी मंडळींबरोबर सामाजिक वाटचाल करुन राजकारणामध्ये आले. असे राजकारण करीत असताना सोलापूर मधील त्यांच्या कार्याचा गौरव माननीय सभागृहाच्या नेत्यांनी केला. त्यांच्याशी माझा फार परिचय नव्हता पण मी त्यांचे जीवनचरित्र वाचले, माहिती घेतली. त्यातून एक गोष्ट अशी दिसून आली की, ते समाजाशी कमिटमेंट असणारे व्यक्तिमत्व होते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

आमच्या संघ परिवारामध्ये असे म्हटले जाते की "तन समर्पित, मन समर्पित, दिल चाहता है और भी कुछ दे दूं". या प्रमाणे त्यांनी आपले देहदान केलेले आहे. अशा माननीय दिकोंडा साहेबांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी हे या सभागृहाचे सदस्य होते. आमच्या बरोबर विरोधी पक्षाच्या बाकावर बसून ते कामकाजात भाग घेत होते. सध्याच्या कॉण्ट्राव्हर्सीमध्ये त्यांचे नाव घेतले जात होते. त्यांनी स्वत:च्या नावाने काही गोष्टी केल्या म्हणून त्यांचे नाव पुढे आले बाकीच्यांनी बेनामी गोष्टी केल्या म्हणून त्यांची नावे पडद्याआड राहिली. या सभागृहामध्ये त्यांनी साखर निर्यातीमधील महाघोटाळा लावून धरला होता. इतकेच नव्हे तर त्यांनी सभागृह देखील डोक्यावर घेतले होते. साखर निर्यातीमध्ये होणारे घोटाळे थांबावेत यादृष्टीने ते सतत दक्ष असायचे. मूल्याधारित हमी भाव देण्यासाठी मंजूर केलेल्या 300 कोटी घोटाळयाचा प्रश्न त्यांनी या सभागृहामध्ये लावून धरला होता. साखर उत्पादन, साखर कारखानदारी, साखर निर्यात या क्षेत्रातील एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून मी त्यांच्याकडे पहातो. राज्यातील सहकारी तत्वावर चालणारे उद्योग आणि संस्था यांच्यावर देखरेख करण्यासाठी लोकलेखा समिती किंवा सार्वजनिक उपक्रम समिती सारखी एखादी समिती नेमली तर त्या सहकारी तत्वावर चालणारा उद्योग किंवा संस्था यामधील होणाऱ्या अनियमिततांवर नियंत्राण राहू शकेल असे त्यांचे मत होते. मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

श्री. सदाशिवराव शिंदे हे 1942च्या स्वातंत्र्य लढ्यातील व्यक्तिमत्व. श्री. शिंदे यांनी कोल्हापूर वीज कामगार संघटनेचे अध्यक्ष, महात्मा गांधी सेवा मंडळाचे संस्थापक तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते.

माननीय उप मुख्यमंत्री यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला मी पाठिंबा देतो आणि या आठही समाजविभूतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती (श्री. वसंत डावखरे)** : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर माझ्या सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आज जवळपास आठ महनीय व्यक्तींना मुकल्याबाबतचा शोकप्रस्ताव येथे मांडण्यात आलेला आहे. कोणा एका ज्योतिषाने 2012मध्ये जग संपुष्टात येणार असल्याची भविष्यवाणी केलेली होती आणि निर्सगनियमानुसार ती खरी होणे शक्य नसले तरी देखील यंदाचे 2012 साल हे आपल्या सर्वांच्याच जवळच्या स्नेह्यांना आपल्यामधून कायमचे दूर घेऊन गेले आहे आणि या सृष्टीला पूर्णविराम मिळाला नसला तरी देखील मोठी पोकळी निर्माण झालेली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

लोकनेते स्व. बाळासाहेब देसाई यांच्यामुळे तरुण वयात मला राजकारणाची गोडी लागली व त्याकडे मी आकृष्ट झालो. माझ्या घराण्याला स्वातंत्र्य सैनिकाचा वारसा असल्यामुळे काँग्रेस पक्षाकडे माझा पूर्वीपासूनच ओढा होता. परंतु राजकारणाच्या मुख्य प्रवाहामध्ये शिरता शिरतानाच मराठी मनाचा मानबिंदू ठरलेले बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद व सहकार्य मला लाभले आणि अन्यायाविरुध्द लढण्याची प्रेरणा मिळाली.

मला आजही मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या बरोबरची कलानगर येथील त्यांच्या 'मातोश्री' निवासस्थानातील पहिली भेट चांगली आठवते. ठाणे महानगरपालिकेची स्थापना होऊन प्रथमच शिवसेनेचे महापौर म्हणून 1986 मध्ये सतीश प्रधान निवडून आले होते. तेव्हा महापौर पदाची मुदत केवळ एक वर्षाचीच असायची. त्यामुळे 1987 मध्ये सेना-भाजप युतीच्या महापौर पदाच्या उमेदवार श्रीमती वीणा भाटिया यांचा केवळ एका मताने पराभव करुन मी ठाणे शहराचा महापौर म्हणून निवडून आलो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.भोगले 12:05

उप सभापती...

शिवसेनाप्रमुख यांच्याबद्दल आजच्या प्रमाणेच त्यावेळीही माझ्या मनात आदर व कुतूहल होते. त्यामुळे महापौर म्हणून माझी नियुक्ती जाहीर होताच महापालिकेतील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शिवसेनेचे सर्वोच्च पदाधिकाऱ्यांरी, ठाणे शहरातील माझे परममित्र स्व.आनंद दिघे यांचे समवेत मी बाळासाहेबांची खुल्या दिलाने भेट घेतली. त्याकाळच्या पक्षीय राजकारणाचा विचार करता अशा प्रकारची भेट ही बाळासाहेबांनाही अनपेक्षित होती. त्यातही मी युतीच्या उमेदवारावर निसटता विजय मिळवला असल्याने वातावरण फारच संवेदनक्षम होते. बाळासाहेबांना पुष्पगुच्छ देऊन मी चरणस्पर्श केला. त्यांनीही मला "यशवंत व्हा, किर्तिवंत व्हा आणि मराठी माणसांच्या हिताचे निर्णय घेऊंन ठाणे शहराची प्रतिष्ठा,शान व मान उंचावत ठेवा" असा भरभरुन आशीर्वाद दिला. त्यांचा स्पष्टवक्तेपणा इतका की, मी त्यांची घेतलेली भेट त्यांनी पक्षाच्या सभेत जाहीरपणे बोलून दाखवली ती अशी, "तो ठाण्याचा नवा कॉग्रेसचा महापौर, वसंत डावखरे, मी त्याला म्हटले, चांगल्या कामासाठी माझे आशीर्वाद केव्हाही आपल्या बरोबर आहेत. मात्र मराठी भाषा, मराठी माणूस व ठाण्यातील सर्वसामान्य जनता यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नाबाबत तडजोड अजिबात सहन केली जाणार नाही." इतका स्पष्टवक्तेपणा मला राजकीय नेत्यांमध्ये अभावानेच आढळला. त्यानंतरच्या काळापासून माझा ठाकरे कुटुंबीयांशी घरोबा झाला तो आजतागायत. आतापर्यंत मला त्यांचे प्रेम व सहकार्य अव्याहतपणे मिळत होते.

बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे असे अनेक गुण आहेत जे सर्वसामान्यांप्रमाणे मलाही भावले. ते धाडसी होते. आणीबाणीला केलेले समर्थन, स्व.इंदिरा गांधी यांचे कलानगरजवळ केलेले स्वागत, राष्ट्रपतीपदाच्या पहिल्या मराठी उमेदवार प्रतिभाताई पाटील आणि त्यांचे उत्तराधिकारी म्हणून अगदी अलिकडे प्रणव मुखर्जी यांना केवळ गुण पाहून दिलेला बिनशर्त पाठिंबा ही सर्व राजकीय धाडसाचीच उदाहरणे आहेत. पारदर्शीपणा हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणता येईल. पोटात एक अन् ओठात दुसरे असले गलिच्छ राजकारण त्यांनी केले नाही आणि म्हणूनच मराठी मनावर त्यांनी अमर्याद राज्य केले.

एकदा बाळासाहेब कोणत्या तरी कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाणे शहरात आले असताना शासकीय विश्रामगृहामध्ये माझे जिवलग मित्रवर्य स्व.आंनद दिघे यांच्या समवेत मी त्यांना भेटावयास गेलो होतो. आमच्या दोघांच्या निर्हेतूक मैत्रीचे त्यांना मोठे अप्रूप वाटायचे. आनंद दिघे अविवाहित

2....

उप सभापती....

होते. त्यांचे शुभमंगल व्हावे व त्यांनी संसारात रमबाण व्हावे अशी त्यांची मनस्वी विच्छा होती. विश्रामगृहावर आम्ही त्यांना वंदन करताच त्यांनी त्यांची ही इच्छा माझ्याकडे बोलून दाखविली व म्हणाले, "वसंता, हा आनंद शिवसेनेला आपले कुटुंब मानतो पण या विशाल जिवाभावाच्या कुटुंबाबरोबरच त्याचे दोनाचे चार हात झालेले पहायला मला नक्कीच आवडेल आणि ही जबाबदारी मी तुझ्यावर सोपवतो." आनंद दिघेंच्या आकस्मिक निधनाने एवढी एकच बाळासाहेबांची इच्छा मी पूर्ण करु शकलो नाही. "इश्वरेच्छा बलियसी" दुसरे काय ?

आज बाळासाहेबही आपल्यात नाहीत. असे बाळासाहेब होणे नाहीत, असे शिवसेनाप्रमुख पुन्हा होणे नाहीत. शिवसेना प्रमुखांचा शिवतीर्थावर जेव्हा अंतिम प्रवास सुरु होता, त्यांच्या अत्यंसंस्काराच्या वेळी, त्यांना अग्नी देत असताना माझ्या मनात एक भावना आली आणि मी सहज मनातल्या मनात बोललो..

"जाळू नका हो कलेवर तयाचे, जन्मभरी ते जळतच होते
उधळू नका हो फुले तयांवर, जन्मभरी ते फुलतच होते "

बाळासाहेबांच्या जागी शिवसेनाप्रमुख म्हणून दुसऱ्या कोणाचेही नाव उच्चारायला जीभ धजणार नाही, मन मानणार नाही. म्हणूनच मराठी माणसाची मानसिकता ओळखून श्री.उद्धवजी ठाकरे यांनी ते पद स्वीकारायला विनम्र नकार दिला यातूनच त्यांच्याही मनाचा मोठेपणा दिसून आला आहे. जगाच्या पाठीवर जोपर्यंत मराठी माणूस राहील तोपर्यंत बाळासाहेबांचे विस्मरण होणार नाही एवढे सांगून मी त्यांना आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, राजकारणातील उमद्या मनाचा तडफदार नेता म्हणून राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे नाव घ्यावे लागेल ते हे माझे परममित्र होते. बाभळगावच्या सरपंचपदापासून सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा होता. त्यांच्याही सार्वजनिक जीवनात अनेक चढउतार आले. पराभवाचे क्षण आले. कसोटी पाहणारी संकटे आली. प्रत्येक वेळी विलासराव हसतमुखाने व आत्मविश्वासाने त्यांना सामोरे गेले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पाठोपाठ "विलासरावांच्या जीवनावरील मुद्रा" या विलासराव देशमुख यांच्या फोटोबायोग्राफीचे प्रकाशन झाले. हिंदूहृदयसम्राट आणि जाणत्या राजाच्या बरोबरीने असा सन्मान मिळणे ही विलासरावांच्या अजोड कर्तृत्वाची पावतीच आहे.



ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.भोगले 12:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

युतीच्या कारकीर्दीनंतर 1999 मध्ये त्यांची मुख्यमंत्री पदावर प्रथम नियुक्ती झाली. लोकशाही आघाडीची एकजूट राखून सत्ता टिकवण्याची अवघड कसरत त्यांनी केली होती. काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी 2003 मध्ये मुख्यमंत्री पदामध्ये बदल करुन सुशिलकुमार शिंदे यांना मुख्यमंत्री केले होते. त्यामागे विलासरावांची अकार्यक्षमता हे कारण नव्हते तर...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

2004 सालामधील निवडणुकीच्या रणनीतीचा तो एक भाग होता. ती रणनीती यशस्वी ठरली. निवडणुकीतील विजयानंतर मुख्यमंत्री पदाची माळ पुनश्च विलासरावांच्याच गळ्यात पडली हे विसरुन चालणार नाही. त्यानंतरची केंद्रीय मंत्रीपदाची जबाबदारी ते लिलया पार पाडत होते. तरी देखील लातूर आणि महाराष्ट्राची त्यांची नाळ अबाधितच होती. चित्रपट, नाटक पाहणे, संगीत मैफिली ऐकणे याची त्यांना आवड होती. कामाच्या फायलींचा निपटारा करीत असताना देखील ते एकीकडे गाणी ऐकत असत. हिवाळी अधिवेशनामध्ये मी आयोजित करीत असलेल्या संगीत रजनी व स्नेह भोजनाच्या कार्यक्रमास ते आवर्जून हजेरी लावत असत आणि त्यांच्या फर्माइशीने कार्यक्रम अधिकच रंगत असे.

सभापती महोदय, विलासरावांची आमदारकीची कारकीर्द मुंबईमध्ये जिथे आता पोलीस मुख्यालयाची इमारत आहे त्या विधान भवनातील इमारतीमध्ये सुरु झाली. नरीमन पॉईंटच्या विधान भवनातील नवीन वास्तूमध्ये ती बहरली. तोच प्रकार नागपूर विधान सभागृहाच्या बाबतीत घडला. आता आपण बसलो आहोत या परिषदेच्या सभागृहात पूर्वी विधानसभेची बैठक भरायची आणि आता विधानसभागृहाची वास्तू पुढील बाजूला गेली आहे तेथे देखील त्यांनी चढत्या क्रमाने काम केलेले मी पाहिले आहे. विकासात अग्रेसर असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राचा क्रम त्यांनी कायम ठेवला होता. अशा ह्या यशस्वी आणि लोकप्रिय राजकीय नेत्याला आपण मुकलो आहोत. व्यक्तिश: राजकारणातील मी माझ्या दिलदार बंधुप्रेमाला पारखा झालो. स्व.विलासरावांना माझी विनम्र आदरांजली. त्याचप्रमाणे आमच्या इतर सहकाऱ्यांना, ज्यांची मी मघाशी नावे घेतली त्यांना देखील मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

---

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सदनाचे सन्माननीय नेते श्री.अजितदादा पवार यांनी जो शोकप्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आज सदनामध्ये भारताचे माजी पंतप्रधान कै.इंद्रकुमार गुजराल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला आहे. पंतप्रधान होण्यापूर्वी स्वातंत्र्यसेनानी म्हणून त्यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली. त्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळात अनेक महत्वाची मंत्री पदे त्यांनी भूषविली व नंतर ते देशाचे पंतप्रधान झाले. स्वातंत्र्यसेनानी म्हणून त्यांनी आयुष्यभर समाजसेवा केली. राज्यसभा व लोकसभेवर देखील ते निवडून गेले होते. अत्यंत अभ्यासू विचारवंत अशी ख्याती असलेले ते व्यक्तिमत्व होते. त्यांनी जवळपास एक वर्ष पंतप्रधान म्हणून आपल्या कार्यकुशल पध्दतीने देशाचा कारभार चालविला होता. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख यांच्याबद्दल या सदनामध्ये वेगळे काही सांगण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या त्यांच्याबद्दल भावना काय आहेत याची जाणीव निश्चितपणे आपल्यालाही आहे. युवक कॉंग्रेसचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी राजकारणात प्रवेश केला होता. राज्याच्या मंत्रीमंडळात त्यांचा राज्यमंत्री म्हणून सर्वप्रथम समावेश झाला होता. स्व.वसंतदादा पाटील यांच्या मंत्रीमंडळात गृहखात्याला दोन राज्यमंत्री नेमण्याची प्रथा सुरु झाली. त्या काळात स्व.विलासराव देशमुख यांच्यासमवेत गृहराज्यमंत्री म्हणून आपणही काम केले होते. गृहराज्यमंत्री या नात्याने स्व.विलासराव देशमुख यांचे तरुण नेतृत्व उदयाला आले.

सभापती महोदय, 1985 साली मी सर्वप्रथम विधानसभेवर निवडून आलो. त्या काळात स्व.विलासराव देशमुख हे मंत्रीमंडळातील एक तरुण कुशल प्रशासक म्हणून काम करीत होते.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

प्रशासनामध्ये चांगल्या प्रकारे काम करणारा नेता म्हणून विलासरावांची ख्याती आम्ही ऐकली होती. युथ काँग्रेसमध्ये त्यांनी चांगल्या प्रकारचे काम केले होते. 1985 मध्ये आम्ही जेव्हा निवडून आलो होतो त्यावेळेस कै. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. 1985 मध्ये आमच्या तरुण आमदारांनी माननीय विलासरावांना मुख्यमंत्री करा अशी मागणी केली होती. खरे म्हणजे त्यांच्या तरुण नेतृत्वातून पक्षामध्ये तरुण नेतृत्व पुढे यावे अशी आम्हा तरुणांमध्ये भावना होती. त्यांच्याकडे जेव्हा जेव्हा कोणत्याही विभागाचे काम आले ते त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पूर्ण केले होते. त्यांच्याकडे ज्या ज्यावेळेस काम आले त्या त्यावेळेस त्यांनी प्रशासकीय दृष्टिकोनातून, समाजाला जास्तीत जास्त फायदा कसा मिळेल यासाठी त्यांनी निर्णय घेतले होते. ते नेहमी सगळयांशी संपर्क ठेवत असत.

कै.विलासरावांवाकडे आपले काही काम आहे म्हणूनच आमदार जात होते असे नाही तर काम नसतांना सुध्दा त्यांचे विचार ऐकण्यासाठी आम्ही सर्व जात असू. कै.विलासरावांनी आपल्या कार्यकाळात जेवढया खात्यांची जबाबदारी सांभाळली होती तेवढया खात्यांची जबाबदारी क्वचितच दुसऱ्या कोणी सांभाळली असेल.

कै.विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले होते तेव्हा त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले होते. विलासराव हे एक वेगळे व्यक्तिमत्व होते. पक्षाच्या माध्यमातूनच कै.विलासराव देशमुख मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचू शकले होते. त्यांचा सहवास सर्वांना हवाहवासा वाटायचा, ते सर्वांची स्तुती करीत असत. त्यांनी कधीही कोणाला दुखवले नव्हते. विरोधकांवर टिका टिपणी करीत असतांनाही विरोधक दुखावणार नाहीत याची काळजी ते नेहमी घेत असत. विलासरावांच्या निधनामुळे काँग्रेस पक्षाचे फार मोठे नुकसान झालेले आहे. लातूर जिल्हयाचे त्यांनी युथ काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम केले होते तसेच त्यांनी राज्यात काँग्रेस अधिक मजबूत करण्याचे काम केले होते. मी स्वत: युथ काँग्रेसचा अध्यक्ष असतांनाही अनेक वेळेला युवक काँग्रेस कशी चालवली पाहिजे, काँग्रेस पक्ष मजबूत करण्याच्या दृष्टीने कार्यक्रम कसे घेतले पाहिजे यासंदर्भात त्यांनी सातत्याने मार्गदर्शन केले होते, मी युथ काँग्रेसचा अध्यक्ष असतांनाही त्यांचे मार्गदर्शन मला लाभत होते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

अनेक विभाग सांभाळत असतांनाही पक्ष संघटनेकडेत्यांचे बारकाईनs लक्ष रहात असे. मी जेव्हा काँग्रेस प्रदेश अध्यक्ष झालो त्यावेळेस कार्यक्रमाची आखणी करणे, कार्यकर्त्यांमध्ये उत्साह कसा वाढेल याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले होते. मी प्रदेश काँग्रेसचा अध्यक्ष असतांना पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टिकोनातून मला त्यांचे फार सहकार्य मिळाले होते.

सर्व विभागामध्ये अंतिम निर्णय घेते वेळी कै.विलासरावांचे मत विचारल्याशिवाय कोणतेही निर्णय घेतले जात नव्हते. त्यामुळे राज्यात सर्वात मोठे प्रशासकीय दृष्टीने योगदान असलेले, संघटनेमध्ये मोठे योगदान मिळणारे नेतृत्व आपल्यातून निघून गेले. त्यांच्या जाण्याने सदनातील प्रत्येक सदस्याला दु:ख झालेले आहे. शेवटच्या क्षणात त्यांची प्रकृती अशा प्रकारे बिघडून ते आपल्यातून अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्यावेळी राज्यातील सर्व जनतेला दु:ख झाले. प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यांमध्ये त्यांचा अस्थिकलश उपलब्ध करून देण्यात आला होता. विविध पक्षाचे कार्यकर्ते त्यांची शोकसभा केव्हा आहे आम्हाला सुद्धा शोकसभेत सहभागी व्हायचे आहे अशा प्रकारची विचारणा करीत होते. श्री.विलासराव देशमुख यांचे नेतृत्व संपूर्ण राज्यामध्ये मान्यता प्राप्त होते. त्यांच्या अचानक जाण्याने राज्याची तसेच देशाची हानी झाली असून त्याचे दु:ख सर्वांना आहे. श्री.विलासराव देशमुख यांच्या जाण्याने महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर सामाजिक व राजकीय हानी झाली आहे. अशा या थोर नेतृत्वाला मी आदरांजली वाहतो.

कै.बाबासाहेब कुपेकर हे सन 1995 मध्ये विधानसभेवर पहिल्यांदा निवडून आले. ते सन 1995 ते 2009 असे सलग चार वेळा विधानसभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी सुरूवातीला राज्यमंत्री म्हणून देखील काम केले. त्यानंतर ते विधान सभेचे अध्यक्ष झाले. कै.बाबासाहेब कुपेकर यांचे सहकार क्षेत्रात काम करणारे, सर्वांना चांगल्या प्रकारे मदत करणारे असे व्यक्तिमत्व होते.

अभ्यासू लोकप्रतिनिधी, कुशल प्रशासक, उत्कृष्ट संसदपटू व सामान्य जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सतत आग्रही असणारा नेता निघून गेल्याचे दु:ख आम्हा सर्वांना आहे. त्यांच्या दु:खद निधनानिमित्त मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.शंकरराव चिमाजी जगताप हे देखील विधान सभेचे अध्यक्ष होते. त्यापूर्वी ते विधानसभेचे उपाध्यक्ष होते. त्यांनी शेवट पर्यंत कॉंग्रेस पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून काम केले. शेवटी, शेवटी त्यांची तब्येत त्यांना साथ देत नव्हती. पण अशा परिस्थितीत देखील ते कॉंग्रेस पक्षाच्या कुठल्याही कार्यक्रमाला उपस्थित रहात असत. टिळक भवन मध्ये वरच्या मजल्यावर कार्यालय आहे. त्यांना जिने चढता येत नसताना देखील ते जिने वर चढून येत असत व तशा परिस्थितीत त्या कार्यक्रमात सर्व कार्यकर्त्यांना सूचना करीत असत. त्यांच्या निधना पूर्वी 8 दिवस अगोदरच ते माझ्या कार्यालयात येऊन चर्चा करून गेले होते. कॉंग्रेस पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून त्यांनी शेवट पर्यंत काम केले. त्यामुळेच ते विधान सभा अध्यक्ष या पदा पर्यंत पोहोचले.

कै.शंकरराव जगताप हे पाच वेळा विधान सभेवर निर्वाचित झाले होते. त्यांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रामध्ये फार मोठे काम केले होते. अशा या थोर नेत्याच्या दु:खद निधना निमित्त मी शोक व्यक्त करतो आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

शिवसेना प्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वभावाचे सविस्तर वर्णन सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी केले आहे. त्यांनी कशा प्रकारे शिवसेना एक मजबूत पक्ष म्हणून निर्माण केला हे सांगितले आहे. त्यांचे नेतृत्व, विचारांची शैली, सर्वांना सर्वश्रूत आहे. एक व्यंगचित्रकार म्हणून ते देशा पुढे आले. मराठी माणूस व हिंदूत्व हा मुद्दा त्यांनी सातत्याने लावून धरला होता. त्यांनी शिवसेनेचे नेतृत्व खंबीरपणे केले हे संपूर्ण देशाला माहीत आहे. अशा या थोर नेत्याच्या दु:खद निधनानिमित्त मी शोक व्यक्त करतो व त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

कै.कन्हैयालाल गिडवाणी यांच्याबाबत सांगावयाचे झाले तर साखरेच्या व्यवसायासंबंधी त्यांना फार खोलवर माहिती होती. आपल्या राज्यातील साखर उद्योगांना कशा प्रकारे फायदा होईल यासंबंधाने ते सातत्याने केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करीत असत. त्यांचे व्यक्तिमत्व आपणा सर्वांना माहिती आहे. अशा या सदस्यांच्या दु:खद निधना निमित्त मी शोक व्यक्त करतो आणि त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

सभापती महोदय, श्री.सदाशिवराव शिंदे हे दोन वेळा विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केलेली आहे.

सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी या ठिकाणी जे शोक प्रस्ताव मांडले त्या सर्वांबद्दल मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी या ठिकाणी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल बोलताना मी एवढेच सांगू इच्छितो की, "मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी झगडणारी शिवसेना" या घोषवाक्याने शिवसेना प्रमुखांनी 1966 साली शिवसेना पक्षाला जन्म दिला. शिवसेना प्रमुखांचा जन्म झाला नसता तर शिवसेना जन्माला आली नसती आणि शिवसेना जन्माला आली नसती तर माझ्यासारखा एक सर्वसामान्य कार्यकर्ता या सभागृहात आपणास दिसला नसता. मुंबईतील कांदिवली भागातील अल्फा झोपडपट्टीत राहणारा रामदास कदम हा विधानसभेचा विरोधी पक्ष नेता होऊ शकतो असा चमत्कार फक्त शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरेच करु शकतात.

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुख यांच्या सोबत मागील 45 वर्षापासून आम्ही काम करीत आहोत. त्यांच्या अनेक लढाया आम्ही पाहिल्या आहेत. त्यांची अनेक भाषणे आम्ही शिवतीर्थावर ऐकली आहेत. शिवतीर्थावर माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत बसण्याचा योग येईल, एवढेच नव्हे तर त्यांच्या सोबत शिवतीर्थावर भाषण करण्याची संधी मिळेल असे मला स्वप्नात देखील वाटले नाही.

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे हे व्यंगचित्रकार असताना देखील ते वाघा सारखे जगले. दैनिक "सामना" हे वृत्तपत्र सुरु होण्यापूर्वी शिवसैनिकांनी नेमकी कोणती भूमिका घ्यावी याचे संदेश साप्ताहिक "मार्मिक" मधून आम्हाला मिळत होते. आणीबाणीच्या काळात देखील आम्हाला असे संदेश मिळत होते.

सभापती महोदय, 1993 मध्ये मुंबई शहरात जी दंगल झाली त्यावेळी शिवसेना नसती तर काय परिस्थिती झाली असती याचे चित्र डोळ्यासमोर उभे करता येत नाही. मला त्या विषयावर भाष्य करायचे नाही. पण माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या जाण्याने मराठी माणसाचा कणा गेला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही असे मला वाटते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुखांनी महाराष्ट्रात मराठीची आणि हिंदुस्थानात हिंदुत्वाची भूमिका घेतली. मुस्लिांच्या विरोधात त्यांची भूमिका कधीही नव्हती. मुस्लिमांच्या विरोधात त्यांची भूमिका असती तर श्री.साबिर शेख सारख्या कडव्या मुस्लिमास त्यांनी कधीही मंत्री केले नसते. ज्या मुस्लिमांना या देशाबद्दल ममत्व नाही, आपलेपणा नाही, ते मुस्लिम आमचे दुष्मन आहेत अशी त्यांची भूमिका होती. परंतु त्यांच्या या वक्तव्याचा अन्वयार्थ लावून काहींनी मतासाठी त्याचा उपयोग करुन घेतला.

सभापती महोदय, राज्यातील सर्व शिवसैनिक माननीय शिवसेना प्रमुखांकडे एक कुटुंब प्रमुख म्हणून पाहत होते. मला या निमित्ताने शासनाला एक विनंती करावयाची आहे. खरे म्हणजे माननीय शिवसेना प्रमुखांच्या स्मारकाचा वाद उपस्थित होताच कामा नये. शिवाजी पार्क मैदानावर आम्हाला शिवसेना प्रमुखांचे स्मारक बनवावयाचे नाही. शिवसैनिकांच्या भावना एवढ्याच आहेत की, ज्या ठिकाणी माननीय शिवसेना प्रमुखांचा अत्यंविधी झाला ती जागा तशीच ठेवावी. ज्या प्रमाणे परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले त्या ठिकाणी लाखो भाविक तेथे आपले मस्तक ठेवण्याकरिता येतात त्याप्रमाणे राज्यातील शिवसैनिक आपले मस्तक ठेवण्यासाठी तेथे येतील, एवढाच एकमेव उद्देश होता. त्या ठिकाणी स्मारक करणे हा विषयच नव्हता. परंतु वेगवेगळ्या नेत्यांनी वेगवेगळी भूमिका घेऊन अकारण वाद निर्माण केला त्याचे मला निश्चितपणे दु:ख आहे. माननीय शिवसेना प्रमुखांच्या अत्यंयात्रेस लोटलेला जनसागर आपण सर्वांनी पाहिला आहे. जवळपास 25 ते 30 लाख शिवसैनिक उपस्थित होते. जिकडे पहावे तिकडे लोकच लोक दिसत होते. प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रू येत होते. तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदय माझे भाषण ऐकत असतील तर त्यांना माझी विनंती आहे की,आपण याचा विचार करावा.

सभापती महोदय, मी, मातोश्री बंगल्यावर पाच दिवस होतो. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना भेटावयास अनेक पक्षातील मोठमोठे नेते येत होते. त्या शिवाय विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती भेटावयास येत होत्या. माननीय राज्यपाल, माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेब असे अनेक मान्यवर माननीय शिवसेना प्रमुखांना भेटण्यास येत होते.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

तेव्हा माननीय शिवसेना प्रमुख यांचा अंत्यविधी करण्यासाठी जो चौथरा बांधण्यात आला होता तो तसाच तेथे ठेवावा, जेणेकरुन आम्हा शिवसैनिकांना तेथे जाऊन मस्तक ठेवता येईल. तेव्हा माझी माननीय मुख्यमंत्री व या सभागृहाचे नेते यांना विनंती आहे की, आमचे श्रध्दास्थान असलेला तो चौथरा तेथून हलवू नये, आम्हाला तेवढी 8X10 ची जागा द्यावी.

यानंतर श्री.सरफरे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

छत्रपती शिवाजी महाराजांची उंची आम्हाला चांगली माहीत आहे, परंतु त्या विषयाला वेगळे फाटे फोडले जात आहेत. माननीय श्री. बाळासाहेबांच्या स्मारकांसाठी वेगळी जागा निश्चित करण्यासाठी आपण एकत्र बसून चर्चा करु. परंतु या बाबतीत तरी शासनाने थोडा सहानुभूतीने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत माननीय श्री. छगन भुजबळ असू देत, माननीय श्री. नारायण राणे साहेब असू देत, माननीय श्री. भास्कर जाधव साहेब असू देत, माननीय श्री. गणेश नाईक असू देत, माननीय सदस्य श्री. राम पडांगळे असू देत, माननीय सदस्य श्री. किरण पावसकर असू देत या सर्व मंडळींना त्या चार-पाच दिवसामध्ये आम्ही पाहिले आहे. सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुख एक वाघासारखा जगणारा नेता होता, पाकिस्तान हा देश माननीय शिवसेना प्रमुखांना घाबरत होता, अतिरेक्यांच्या मुखी नेहमीच शिवसेनाप्रमुखांचे नाव असावयाचे. ते नेहमीच पोलिसांच्या गराडयात असल्यामुळे व्यक्तिगत आयुष्य कधीच जगले नाहीत. देशासाठी लढणारा एकमेव नेता अशाप्रकारचे शिवसेनाप्रमुखांचे व्यक्तिमत्व होते. त्यामुळे ते नेहमी म्हणत मी एकदा बोललो म्हणजे बोललो. बाबरी मशीद पाडण्यात आली त्यावेळी अनेक नेत्यांनी सांगितले की, आमचे लोक त्या ठिकाणी नव्हते. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांनी सांगितले की, त्या ठिकाणी तुमचे कुणीही नसतील व ते काम माझ्या शिवसैनिकांनी केले असेल तर त्याचा मला गर्व आहे. एकदा बोललो ते बोललो त्यामुळे मी हे बोललोच नव्हतो असे सांगून त्यांनी कधीही आपले शब्द मागे घेतले नाहीत. असा एक द्रष्टा नेता आमच्यामधून निघून गेलेला आहे, त्यांचा आदर्श आम्ही निश्चितपणे ठेवून काम करणार आहोत, त्याबद्दल कुणाचेही दुमत नाही. तरीदेखील सरकारने टोकाची भूमिका न घेता लाखो मराठी माणसांच्या भावनांचा विचार करुन माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी योग्य तो निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

आमच्या सारख्यांच्या कौटुंबिक विषयाची अनेक उदाहरणे देता येतील. माझी पत्नी आजारी असतांना त्यांनी स्वत: जसलोक हॉस्पिटलमध्ये येऊन व बाजूला बसून तेथील सर्व डॉक्टर्सची एक बैठक घेऊन त्यांना लागेल तो खर्च मी देईन परंतु उपचारामध्ये हयगय होता कामा नये असे सांगितले. अशाप्रकारे माझ्या पत्नीच्या बाबतीत आणि अनेक कार्यकर्त्यांच्या कौटुंबीक अडचणीमध्ये स्वत: लक्ष घालणारा असा हा नेता आज आमच्यामधून निश्चितपणे निघून गेला आहे. मी लाखो शिवसैनिकांच्या वतीने आणि मराठी बांधवांच्या वतीने माननीय शिवसेनाप्रमुखांना श्रध्दांजली वाहतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, मी विधानसभेमध्ये विरोधी पक्ष नेता होतो त्यावेळी माननीय श्री. विलासरावजी देशमुख हे मुख्यमंत्री होते. सभागृहामध्ये आम्ही नेहमी एकमेकांविरुध्द भांडत असतो. परंतु सभागृहाबाहेर पक्षीय भिंतीच्या पलीकडे देखील मैत्री असू शकते. ज्याप्रमाणे माननीय श्री. गोपीनाथ मुंडे साहेबांचे त्यांच्याबरोबर संबंध होते त्याप्रमाणे माझे देखील माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांबरोबर घनिष्ठ संबंध होते. या विधानपरिषद सभागृहामध्ये आल्यानंतर ज्यावेळी माझे पहिले भाषण झाले त्यावेळी संध्याकाळी दिल्लीहून माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांचा मला फोन आला. मी त्यांना विचारले की, माझे चांगले भाषण झाले हे तुम्हाला कसे समजले? ते म्हणाले की, माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी मला सांगितले. म्हणजे पक्ष बाजूला ठेवून आपल्या मित्राने केलेल्या भाषणाची दखल घेऊन त्याला फोन लावून त्याचे अभिनंदन करण्याचा मनाचा मोठेपणा दाखविला जाऊ शकतो. हे उदाहरण माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्या बाबतीत आपण पाहिले आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर यांचे देखील निधन झाले असल्यामुळे त्यांच्या बाबतीत मला बोलणे आवश्यक वाटते. मी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता असतांना ते विधानसभेचे अध्यक्ष होते. माझा स्वभाव थोडा तापट असल्यामुळे आमची अनेक वेळा भांडणे होत असत, पेल्यातील वादळाप्रमाणे थोडयाच कालावधीपुरती असावयाची. त्यांच्याशी माझे अगदी कौटुंबीक असे संबंध आले. विशेषत: बेळगाव सीमा प्रश्नाच्या बाबतीत देखील त्यांनी मला दोन वेळा त्या ठिकाणी पाठविले. त्याचे आणखी उदाहरण द्यावे लागेल ते म्हणजे राजीव गांधी जीवनदायी योजनेच्या माध्यमातून मुंबईतील सर्व हॉस्पिटल्सना आपण अनेक प्रकारच्या सुविधा दिल्या. परंतु त्या ठिकाणी गरीब माणसाला त्या सुविधा दिल्या जात नाहीत. अशा हॉस्पिटलची यादी त्यांनी मला दिली व सांगितले की, तुम्ही हा विषय सभागृहामध्ये मांडा त्यावर मी अध्यक्ष म्हणून आदेश देतो. अशाप्रकारे गरीब माणसाच्या अनेक प्रश्नासंबंधी अतिशय बारीक लक्ष ठेवून त्यांना न्याय देण्याचे काम माननीय श्री. बाबासाहेब कुपेकर यांनी केले. अशाप्रकारे या सर्व दिवंगत नेत्यांना मी माझ्या वतीने आदरांजली वाहून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव या सभागृहामध्ये मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी फक्त दोन नेत्यांच्या दु:खद निधनाबद्दल बोलणार असून प्रथम माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांबद्दल बोलणार आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MMP पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:35

श्री.सुभाष चव्हाण . . . .

माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या कालखंडामध्ये राज्यपालांनी नियुक्त केलेले सदस्य म्हणून मी प्रथम सदनामध्ये आलो, आमदार झालो. त्यापूर्वी 15-20 दिवस अगोदर मला आमदारकी मिळावी यासाठी त्यांच्याकडे गेलो होतो.त्यावेळी मी त्यांना माझ्यातर्फे एक निवेदन देऊन सांगितले की, माननीय मुख्यमंत्री महोदय, मला 2004 मध्ये धारावी या राखीव मतदार संघामधून तिकीट देण्यात आले होते. मात्र शेवटचा एक तास राहिला असताना मला ए.बी.फॉर्म दिला. मात्र माझे तिकीट कापण्यात आले.त्यामुळे माझ्यावर मोठा अन्याय झालेला आहे. त्यावेळी त्यांनी असे उत्तर दिले की, श्री.सुभाष चव्हाण तू माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांचा माणूस आहेस. पण मी ज्यावेळी मॅडमकडे राऊंड साठी येईन तेव्हा मी एक वाक्य म्हणेन की, "You are an eligible candidate." आणि त्यांच्या बॉडी लॅग्वेज मधून मला तेव्हाच असे वाटले की, त्यांनी मला आमदारकी दिली आहे. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे आणि त्यांची खास परम मैत्री होती. जणूकाही "दो हंसो का जोडा" त्यामुळे मला त्यांच्या जवळ जाण्याची संधी मिळाली.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये साडेपाच वर्षे युतीचे सरकार होते.त्यानंतर राज्याभिषेक झाला आणि माननीय श्री.माधवराव सिंधिया यांनी पक्षाचा नेता म्हणून जी घोषणा केली त्यानुसार आमचा राजा म्हणून श्री.विलासराव देशमुख विराजमान झाले.पीसीसी कार्यालयामध्ये आम्ही दिवस-रात्र काम करीत होतो. माननीय श्री.विलासराव देशमुख यांची निवड व्हावी म्हणून आम्ही अगोदरच बोर्ड लावले होते आणि त्याप्रमाणे आमचा राजा त्या पदावर विराजमान झाला. त्यांच्या मृत्यूच्या पूर्वी साधारणपणे 15-20 दिवस अगोदर मी त्यांची अपॉईंटमेंट घेऊन त्यांना भेटलो आणि त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. मी त्यांना विचारले की, साहेब, आपली तब्येत कशी आहे? त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझी तब्येत एकदम उत्तम आहे, ठणठणीत आहे. त्यांनी शेवटपर्यंत आपल्या आजारपणाचे कधीही भांडवल केले नाही आणि आपण आजारी आहोत असे दाखविले नाही अशा प्रकारचा नेता आपल्या तब्येतीबरोबरच समाजासाठी देखील झुंजत राहिला. अशा नेत्याला मी माझी आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, यानंतर मला माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत सांगावयाचे आहे. महाराष्ट्रामध्ये अशा काही व्यक्ती आहेत की त्यांचे व्यक्तिमत्व पाहिले किंवा छायाचित्र पाहिले की आपण त्यांच्याकडे टक लावून पहावे असे आपल्याला वाटते आणि यामध्ये छत्रपती शिवाजी ....

. . . .2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . . .

महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यानंतर माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा समावेश आहे.मी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांची सर्व भाषणे स्वत:टी.व्ही.वर नेहमी ऐकत होतो. त्यांच्या शब्दांमध्ये एक प्रकारची धार होती. ते जे बोलत होते तेच घडत होते. आज मुंबई शहरामध्ये मराठी माणूस ठामपणे उभा आहे याचे संपूर्ण श्रेय माननीय कै.श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे आहे.

सभापती महोदय, त्यांची आणि माननीय केंद्रीय गृहमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांची खूप दोस्ती होती. त्यामुळे माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे मला चांगल्या प्रकारे ओळखत होते. महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे व्हावेत हे त्यांचे स्वप्न होते.युती सरकारच्या काळामध्ये त्यांनी माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांना आमच्याकडे यावे यासाठी पाचारण केले होते आणि मी तुम्हाला ताबडतोब राज्याचा मुख्यमंत्री करतो असेही सांगितले होते.पण काँग्रेस पक्षाकडून ते मुख्यमंत्री झाल्यानंतर दोन्ही सभागृहांमध्ये एकमताचा ठराव आणण्याचे धाडसही माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी केले. मी त्यांना ओळखत होतो.

सभापती महोदय, माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्याकडे सलग नऊ वर्षे वित्त विभाग होता. त्यावेळी मोठ्या नेत्यांना रिकाम्या बॅगा दिल्या जात होत्या. त्यावेळी मी अर्थसंकल्पाचे वाचन झाल्यानंतर मी माननीय कै.बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे बॅग घेऊन जात असे. त्यावेळी कै.बाळासाहेब ठाकरे म्हणावयाचे की,"सुभाष, रिकामी बॅग काय घेऊन आलास, भरुन आणली पाहिजे असे ते मला थट्टेने म्हणत असत. ते अतिशय प्रेम करावयाचे.माझा को-ऑपरेटीव्ह बेसिसवर लेदर गारमेंटचा एक मोठा कारखाना होता.त्यावेळी माननीय श्री.गणेश नाईक हे नवी मुंबईतील एक पॉवरफूल व्यक्ती होते आणि अजूनही आहेत. मात्र ते मला थोडा त्रास देऊ लागले. त्यावेळी माननीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पाठविले आणि त्यांनी माझ्या पत्रावर "जय महाराष्ट्र, कृपया गणेश सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्या केसालाही स्पर्श करु नको. त्याचे सगळे काम कर. त्यांनी अजूनही ते पत्र संग्रही ठेवलेले आहे असे माननीय कै.बाळासाहेब ठाकरे यांना मनापासून आदरांजली वाहतो आणि मला शोक प्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.अजितदादा पवार यांनी मांडलेल्या शोक प्रस्तावावर बोलण्यासाठी आणि माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी आपल्यासमोर उभा आहे.

सभापती महोदय, 2012 या वर्षामध्ये आपल्याला काहीतरी गमवावे लागणार आहे अशा प्रकारचे वर्ष म्हणून त्याची इतिहासात नोंद केली जाईल. आज आपण याठिकाणी महाराष्ट्रातील आणि देशातील 8 उत्तुंग अशा व्यक्तिमत्वांना शोक प्रस्तावाव्दारे श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

मी सहज म्हणून या आठही दिवंगतांच्या जन्मतारखा पाहिल्या. श्री. इंद्रकुमार गुजराल यांचा जन्म 1919 सालातील आहे. या सर्व नामावलीमध्ये सगळ्यात तरुण असलेले श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांची जन्मतारीख 1949 मधील आहे. या सर्वांच्या जन्म तारखा पाहिल्या तर त्या 1919, 1923, 1924, 1926, 1927, 1942, 1945,1949 या सालातील आहेत. साधारणपणे विसाव्या शतकाचा उत्तरार्ध हा या व्यक्तिमत्वांनी एक इतिहास रचलेला काळ म्हणून निश्चितपणे सगळीकडे नोंद केला जाईल. तसे बघितले तर ही सर्वच माणसे आपापल्या परीने वेगवेगळ्या क्षेत्रात अतिशय मनापासून काम करणारी होती. यापैकी अनेकांचा स्वातंत्र्य लढ्यामध्ये सक्रिय सहभाग होता. त्यामध्ये त्यांनी फार मोठे योगदान दिलेले होते. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधान परिषद अशा अनेक ठिकाणी त्यांना काम करण्याची संधी मिळाली होती. श्री. इंद्रकुमार गुजराल साहेबांना तर पंतप्रधान पदावर जाण्याची संधी उपलब्ध झाली. ते अत्यंत अभ्यासू, विचारवंत, उत्कृष्ट संसदपटू होते.

या सर्वांच्या चरित्राकडे बघताना एक गोष्ट निश्चितपणे लक्षात येते की, राजकारणामध्ये राहून सुध्दा या प्रत्येक व्यक्तींनी त्यांचा जो विषय असेल त्या विषयातील अभ्यास आणि त्या अभ्यासाचा ध्यास अखेरपर्यंत कायम ठेवलेला होता. आता आपण एकविसाव्या शतकामध्ये कामाला सुरुवात केलेली आहे त्यामुळे आपल्या देशाचे पंतप्रधान कोणकोण होऊन गेले यांची नोंद बऱ्याच लोकांना कदाचित फक्त इतिहासाचा पेपर सोडविताना द्यावी लागेल. बाकी त्यांच्या बद्दलची फारशी माहिती पुढच्या पिढ्यांना उपलब्ध होणार नाही. पण त्यांचे जे योगदान आहे, मग ते स्वातंत्र्य लढ्यातील असेल किंवा त्यानंतरचे असेल, ते योगदान म्हणजे या सर्वांनी एक प्रकारची देशसेवा केलेली आहे.

या आठ जणांची आपापसात कोठे राजकीय नाती जुळतात का हे मी सहज म्हणून बघितले. जर ती नाती जुळली असती तर कदाचित वेगळ्या पध्दतीने इतिहास लिहावा लागला असता. आदरणीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून उमेदवारी मिळाल्यानंतर श्री. विलासराव देशमुख जर या सभागृहाचे सदस्य झाले असते तर विलासरावांचा आणि महाराष्ट्राचा इतिहास बदलला असता किंवा कायम वसंतदादांना साथ देणारे गिडवाणी साहेब जर विरोधी पक्षाकडून आमदार झाले नसते तर सहकारामधील सुध्दा एक वेगळा अध्याय या निमित्ताने लिहिला गेला असता.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. हेमंत टकले .....

श्री. विलासराव देशमुख हे एक अतिशय उमदे व्यक्तिमत्व होते. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांची प्रवृत्ती होती. देशात किंवा राज्यामध्ये मुख्यमंत्री पदाचा कारभार करीत असताना एक प्रकारची सामाजिक जाण आणि सांस्कृतिक भान सातत्याने जपणारा असा हा एक लोकमान्य मुख्यमंत्री महाराष्ट्राने बघितला. त्यांची कारकीर्द अतिशय चांगली होती. ते लोकांमध्ये जाऊन काम करणारे होते. खरे म्हणजे कॉंग्रेस पक्षासाठी निवडणुकांच्या वेळेला राजकारणामध्ये किंवा लोकसभेच्या, विधानसभेच्या निवडणुकांमध्ये हमखास सभा गाजविणारा म्हणून ज्यांचा उल्लेख केला जाईल त्या पहिल्या फळीतील एक नेतृत्व या निमित्ताने आज काळाच्या पडद्याआड गेलेले आहे.

श्री. बाबासाहेब कुपेकर यांचा परिचय आपणा सगळ्यांना वेगवेगळ्या माध्यमातून झालेला आहे. मला त्यांचा परिचय एक अतिशय चांगले वाचक म्हणून झाला होता. केवळ मराठीच नाही तर सर्व भाषांमधील पुस्तके कायम त्यांच्या संग्रही असावयाची. ते संदर्भ वेगवेगळ्या लेखकांचे, वेगवेगळ्या साहित्यातील असावयाचे. ते संदर्भ केवळ मनोरंजनाचे किंवा करमणुकीचे नव्हते. जे साहित्य वेगवेगळ्या समाजाचे चित्रण करणारे असेल, जी कविता वेगळ्या संदर्भातील असेल ती आठवणीने आपल्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करणारे असे आगळेवेगळे व्यक्तिमत्व म्हणून श्री. बाबासाहेब कुपेकर यांचा या ठिकाणी उल्लेख करावा लागेल.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

श्री. शंकरराव जगताप असतील, श्री विठ्ठलराव दिकोंडा असतील, श्री. सदाशिवराव शिंदे असतील या सर्वांच्या बाबतीत आपल्याला हे म्हणता येईल. पण मला आज या ठिकाणी अधिकचे बोलावेसे वाटते ते शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल. मला वाटते जेव्हा महाराष्ट्राचा इतिहास लिहिला जाईल त्यावेळी त्या इतिहासातील अनेक पाने ही गेल्या 50 वर्षात बाळासाहेब ठाकरे यांनी बजावलेल्या भूमिकेबद्दलचे विश्लेषण असेल, त्यावर टीका असेल, एका निष्ठेने आणि प्रामाणिकपणाने मराठी माणसाला मान उंच करुन चालता यावे यासाठी आपल्या आयुष्याचा यज्ञ केलेला एक महान यज्ञकर्मी म्हणून बाळासाहेब ठाकरे यांचा शंभर टक्के इतिहासात उल्लेख होईल. त्यांची संगळी कारकीर्द आपण पाहा. मुळामध्ये प्रबोधनकारांचा वारसा त्यांना लाभला. घरातील हा वारसा. त्या काळामध्ये महाराष्ट्रामध्ये जी आवर्जून 4-5 नावे घेतली जात होती त्या सामाजिक परिर्वतनाच्या चळवळतील एक महत्वाचे नेते म्हणून प्रबोधनकारांचे नाव महाराष्ट्राला शंभर टक्के परिचित होते. समाजपरिवर्तनाचे मोठे समाजकार्य ते करीत होते. वृत्तीने ते साहित्यिक होते, चित्रकार होते, संगीताची त्यांना जाण होती. म्हणून हा चित्रकलेचा वारसा प्रबोधनकारांकडून बाळासाहेबकांकडे चालत आला.

आपण सर्वांनी मध्यंतरी दूरचित्रवाहिनीवर एक कार्यक्रम पाहिला असेल. त्या कार्यक्रमामध्ये एका संस्थेने व्यंगचित्रकार म्हणून बाळासाहेब यांचा गौरव केला. त्या कार्यक्रमामध्ये या देशातील दोन मोठे व्यंगचित्रकार एक आर.के.लक्ष्मण आणि दुसरे बाळासाहेब ठाकरे हे एकत्र बघायला मिळाले. आर.के. लक्ष्मण यांना बोलता येत नव्हते आणि बाळासाहेब ठाकरे हे त्यांच्याशी काही संवाद साधू इच्छित होते. त्यावेळचे एक चित्र अजूनही माझ्या डोळयासमोर आहे. आर.के.लक्ष्मण यांनी माननीय बाळासाहेबांचा हात हातात घेतलेला आहे. ज्या दोन हातातील दोन कुंचल्यांनी या देशाची आणि राज्याची राजकीय व्यंगचित्रे करोडो माणसापर्यंत पोहाचविली ते दोन हात एकत्र आल्यानंतर काय भावना व्यक्त झाल्या होत्या हे आपण बघितले. त्यावेळी बोलताना बाळासाहेबांनी अनेक आठवणी सांगितल्या. त्या आठवणी माझ्या मनामध्ये वेगळया प्रकारे घर करुन राहिलेल्या आहेत.

दुस-या एका व्यंगचित्रकाराचे नाव मला आता या ठिकाणी नीटसे आठवत नाही. त्यांनीही त्यांच्या आठवणी सांगितल्या. त्यांनी बाळासाहेबांना विचारले की, शिवसेना प्रमुख एवढ्या मोठ्या पदापर्यंत तुम्ही पोहोचल्यानंतर तुम्हाला काही गोष्टी करता आल्या नाहीत याची खंत वाटते काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

फ्री प्रेसमध्ये असताना बाळासाहेब लोकलने प्रवास करीत होते. फ्री प्रेस मध्ये असताना ते आर.के.लक्ष्मण आणि बाकीच्या सहका-यांबरोबर चौपाटीवर जाऊन भेळ खात होते. फ्री प्रेसमध्ये असताना कोणत्याही रस्त्याच्या कट्टयावर ते गप्पांचा फड रंगवित होते. ते सांगत होते "मी जसजसा वरच्या पदावर गेलो तस तसे इतक्या छोट्या गोष्टीतील सुख माझ्यापासून दूर गेले. ते म्हणाले, "चौपाटीवर भेळ खायची असेल तर ती चौपाटीवरील वाळूत जाऊनच खाल्ली पाहिजे. कोणी ती मला पॅक करुन घरी आणून दिली तर मला गोडी वाटणार नाही. त्यांच्या बद्दलची एक गोष्ट लोकांना फारशी माहीत नसेल. व्यंगचित्रकारांना जसे जगभरातील व्यंगचित्राबद्दल अतिशय वेगळे आकर्षण असते तसे बाळासाहेबांना डिस्ने लॅण्डचे आकर्षण होते. डिस्ने लॅण्डला 25 वर्षे पूर्ण झाली त्यावेळी अमेरिका बघण्यासाठी नाही तर डिस्ने लॅण्ड बघण्यासाठी बाळासाहेबांमधील व्यंगचित्रकार हा देश सोडून अमेरिकेला गेला होता. कारण ती व्यंगचित्रांची ताकद होती. राजकारण, समाजकारण, संस्कृती, कला, क्रीडा या सर्वांना आपलेसे करुन घेणारे हे व्यक्तिमत्व होते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ D/ प्रथम श्री. शिगम 12:50

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, मला गंमत वाटावयाची की, कोणी तरी राष्ट्रीय पातळीवरील क्रीडापटू एखाद्या खेळाचे पदक घेऊन मुंबई येथे येतो. तो खेळाडू मुंबईमध्ये आल्यानंतर शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेबांची थाप माझ्या पाठीवर पडावी अशी अपेक्षा व्यक्त करतो. इतके मोठे पद राजकारणात कोणालाही कधीही मिळणार नाही, परंतु समाजकारणाला सुध्दा स्वत:चे अढळ स्थान निर्माण करणारा एक प्रचंड धीरोदत्त, आग्रही, प्रसंगी कटू बोलणारा पण सगळयांना जवळ करणारा असा हा लोकोत्तर महापुरुष होता. अनेकांना वाटते की, "शिवसेना" आणि "मार्मिक" ही नावे माननीय बाळासाहेबांनी ठेवलेली होती काय ? त्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. सदरचे नामकरण हे प्रबोधनकार ठाकरे यांनी केलेले होते. परंतु त्यांनी प्रबोधनकारांना शब्द दिलेला होता की, मी हे नामकरण निश्चित सार्थ करुन दाखवीन.

सभापती महोदय,मराठी माणसांसाठी त्यांनी लढा देण्यास सुरुवात केली, त्यावेळी त्यांची "मार्मिक" मध्ये या बाबतची व्यंगचित्रे असावयाची, पण त्याकाळी त्यांनी "मार्मिक"मध्ये मुंबईतील टेलिफोनच्या डिरेक्टरची पानेच्या पाने छापली आणि त्यांनी खाली लिहिले की,यात मराठी माणूस शोधा वाचून स्वस्थ बसू नका. वाचा आणि जागे व्हा. मराठी माणसाला जाग आणण्याचे जागल्याचे काम महाराष्ट्रातील पुढील पिढयांसाठी माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी केले. ते काम करुन महाराष्ट्रातील पुढील पिढीसाठी एक चांगला संदेश त्यांनी दिला आहे. समाजकारणातून राजकारणाकडे वळलेली शिवसेना ही त्यांची संघटना होती. सर्वसामान्य माणसांच्या ज्या काही अडचणी आहेत, जे काही प्रश्न आहेत ते सुटावेत, सर्वसामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यासाठी एक व्यासपीठ असावे म्हणून त्यांनी शिवसेना पक्षाच्या शाखांची सर्व ठिकाणी निर्मिती केली. त्यांची एकूणच राजकारणाकडे बघण्याची जी दृष्टी होती, ती कुठल्याही पठडीत बसणारी नव्हती. दुसरा कोणी करतो आहे म्हणून आपण त्याचे अनुकरण केले पाहिजे अशा प्रकारचा कोणतीही भावना त्यांच्यामध्ये कधीही नसावयाची. त्यांची भूमिका अतिशय रोखठोक असल्यामुळे उत्तरोत्तर ती कटू वाटू लागली. टोकाची वाटावयास लागली. तरीही आपल्या भूमिकेवर शेवटपर्यंत ठाम राहणारा माणूस म्हणजे बाळासाहेब ठाकरे हे आपल्याला निश्चितपणे सांगता येईल.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

बाळासाहेब ठाकरे हे वादळी व्यक्तिमत्व होते हे नक्कीच, पण जे कलंदर पणाचा एक फार मोठा वारसा त्यांना लाभला होता. राजकारणामध्ये वावरणाऱ्या सगळयांना समाजकारणाचे भान कधी सुटू नये, कलेशी कधीही नाते तोडू नये, संस्कृतीची जपणूक करण्याचा वसा कधी सोडू नये ही त्यांची शिकवण होती. समाजात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लहान-मोठया माणसांपासून ते अतिशय मोठ्या माणसांपर्यंत सगळयांची एकत्र गुंफण करणारा असा एक मराठी माणूस म्हणून त्यांच्या बद्दलचे आदराचे स्थान आजही आणि भविष्यकाळात इतिहासातही कायम स्मरणात राहील असा मला विश्वास वाटतो. या शोकप्रस्तावाच्या निमित्ताने बाळासाहेब ठाकरे व इतर सर्व दिवंगतांना मी मनापासून श्रध्दांजली अर्पण करतो.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स.व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप,माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी शोक प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय,दुर्देवाने माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आज आपल्यात नाहीत. परंतु आजच्या सभागृहाच्या कार्यक्रम पत्रिकेतील शोक प्रस्तावारील नावांचा क्रम पाहिला असता तर त्यांनी आमची हजामपट्टी केली असती. बाळासाहेबांची जी भूमिका होती, ती कठोर, तीव्र आणि प्रत्येक गोष्टींबद्दल उत्कटतेने, प्रामाणिकपणाने, प्रखरपणे विरोध करणे आणि स्वत:ची भूमिका ठामपणे मांडणे हे त्यांच्या स्वभावधर्माचे खरे वैशिष्ट्य होते. आपण विधान परिषदेच्या चौकटीमध्ये बसवून हा शोक प्रस्ताव मांडला आहे व त्या प्रस्तावावर बोलण्यासाठी वेळ उपलब्ध करुन दिला त्याबद्दल मी माननीय सभापती महोदयांचे तसेच माननीय गटनेत्यांचे विशेष आभार मानते. माझ्या दिवंगत ज्या व्यक्तींशी माझा परिचय होता, त्यांच्या बाबतीत मी या शोक प्रस्तावाच्या निमित्ताने बोलणार आहे. माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे दिनांक 17 नोव्हेंबर, 2012 रोजी निधन झाले....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ MMP/ KTG/पूर्वी श्री.गिते 12:55

डॉ.नीलम गोऱ्हे.........

त्याच्या अगोदर काही दिवस जे बाळासाहेबांचे प्रेमी आहेत त्यांच्यासमोर एक दु:खद स्वप्न सातत्याने उभे रहावे अशा पध्दतीने महाराष्ट्रामध्ये वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. आमच्या मनाला फार क्लेश होत होते. साहेब हयात असताना सातत्याने साहेब गेले का? अशा पध्दतीचा प्रश्न सगळीकडे निर्माण करुन लोकांच्या जखमेवरील सालटी काढण्याची प्रवृत्ती समाजामध्ये दिसून आली.

सभापती महोदय, शिवसेनाप्रमुख या थोर व्यक्तिमत्वाबद्दल अनेकांनी महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडले आहेत. परंतु त्यांच्या काही वैशिष्ट्यांचा या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक आहे असे मला वाटते. 1969 साली सीमा प्रश्नासाठी तीन महिने त्यांनी कारावास भोगला होता. या कारावासाच्या आठवणीला ज्या ज्यावेळी बेळगावचे सीमावासीय त्यांच्या भेटीला यायचे त्यावेळी आवर्जून उजाळा दिला जायचा. हा प्रश्न माझ्या हयातीत कसा सुटेल याबद्दल सातत्याने बाळासाहेबांच्या मनामध्ये तगमग दिसून यायची. 17 नोव्हेंबर, 2012 रोजी मोठ्या साहेबांचे निधन झ ाले. प्रबोधनकारांचे सुध्दा 20 नोव्हेंबर या तारखेला निधन झाले होते.

सभापती महोदय, स्वत:कडे कोणतेही पद न घेता आपल्या अनुयायांना शिस्तीच्या चौकटीमध्ये ठेवून त्यांच्याकडून समाजकारण आणि राजकारण करुन घेणे यासाठी ते सातत्याने रिमोट कंट्रोल वापरीत होते. काही वेळेला या रिमोट कंट्रोलबद्दल टीका झाली असली तरी आम्हाला तो रिमोट कंट्रोल म्हणजे फार मोठे मार्गदर्शन आणि मानसिक, वैचारिक आधार वाटत होता.

सभापती महोदय, गेली 46 वर्षे एकच मैदान, एकच वक्ता आणि एकच झेंडा अशा प्रकारचे त्यांचे योगदान होतेच. परंतु विन्स्टन चर्चिल यांच्या जीवनावरील पुस्तकामध्ये व्यंगचित्राचा समावेश झालेले ते देशातील एकमेव व्यंगचित्रकार आहेत. कित्येक वेळेला त्यांना भेटण्याची व त्यांच्याशी बोलण्याची मला संधी लाभली. साहेब, भाषणांमधून तुम्ही जे मांडले तो प्रकार तुम्हाला कसा वाटला? अशा प्रकारचा प्रश्न विचारल्यानंतर लहान मुलाला समजेल अशा पध्दतीने दिलेले त्यांचे उत्तर म्हणजे शारदेचे, सरस्वतीचे, महालक्ष्मीचे वक्तव्य असायचे. भाषण करण्यास उभे राहिल्यानंतर ते कधी नोट्स घेत नव्हते. लेखी भाषण करणे त्यांना मान्य नव्हते. जसे मैदान तसे विचार स्फुरतात आणि मी विचार मांडतो असे ते म्हणायचे. साहेबांची अनेक ऐतिहासिक भाषणे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

झाली. त्या आधी आणि नंतर त्यांच्याबद्दलचा प्रतिसाद आणि बोलणे ऐकायला मिळत असे. त्यांच्याकडून आम्हाला खूप शिकायला मिळत असे. 15 ते 20 वेळा साहेबांना शुभेच्छा देणे, आशीर्वाद घेणे यासाठी त्यांची भेट घेण्याची मला संधी मिळाली. जणूकाही जगातील तपमान कळावे अशा पध्दतीने साहेब दोन-चार वाक्ये बोलायचे. त्यामधून आम्हाला पक्षातील बरेच संकेत मिळायचे. पुढील दीड दोन महिन्यात पक्षात काय होणार हे त्या आधारे आम्ही समजून घेऊन वागत होतो. उदाहरण द्यायचे झाले तर 2005 साली रंगशारदा सभागृहातील बैठकीत अनेक कठोर निर्णय बाळासाहेबांनी घेतले होते. त्यावेळी पक्षाबाहेरच्या लोकांकडून टीका केली गेली. अमुकांनी सांगितले म्हणून निर्णय घेतला असे सांगितले गेले. परंतु शिवसेनाप्रमुख स्वत: त्या क्षणी तो निर्णय घ्यायचे. आमदारांशी बोलताना आम्हाला चार शब्द देखील त्यांनी सुनावले असतील.

सभापती महोदय, पक्षाची प्रवक्ता म्हणून काम करीत असताना माझ्या मनामध्ये भीती असायची. काही चुकले तर साहेब काय म्हणतील? एका बाबतीत मी निश्चितपणे कायम कृतज्ञता व्यक्त करु इच्छिते. ज्या ज्यावेळी साहेबांना मी फोन केला त्या त्यावेळी त्यांनी कौतुक केले. श्री.प्रशांत भूषण यांनी काश्मीरच्या प्रश्नावर विचार मांडले त्यावेळी आम्ही संभाजीनगरमध्ये होतो. साहेबांशी संपर्क साधल्यानंतर सात-आठ मिनिटे काय बोलले पाहिजे ते त्यांनी समजावून सांगितले. त्यांनी आमच्यामध्ये आत्मविश्वास जागृत केला. रामटेक मतदारसंघातील पोटनिवडणूक, मुंबई महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक असेल, त्या बाबतीत माननीय सदस्य ॲड.अनिल परब, माननीय सदस्य श्री.विनायक राऊत, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना कल्पना आहे, प्रत्येकाचे कौतुक त्यांनी केले आहे.

नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, काम करीत असतांना कोणाला कशा पध्दतीने समजावयाचे हे बाळासाहेबांना चांगले माहीत होते. मी 14 वर्षापासून शिवसेनेमध्ये काम करीत आहे. परंतु सुरुवातीच्या काळात मला त्यांची प्रचंड भीती वाटत असे. परंतु हळू हळू साहेबांनी मला खूप गोष्टी समजाऊन सांगितल्या.

प्रबोधनकार हिंदुत्व म्हणजे काय ? याबाबत मला साहेबांनी तीन उदाहरणे दिली होती ती माझ्या कायम लक्षात राहिलेली आहेत. प्रबोधनकारांचा हुंडा पध्दती व बालविवाहाला तीव्र विरोध होता. याबाबत आम्हाला साहेबांनी अनेक वेळा उदाहरणे दिली होती. मांढरादेवी येथील दुर्घटनेमुळे जेव्हा अनेक लोकांचे मृत्यू झाले त्यावेळेला पशू हत्या थांबली पाहिजे म्हणून अनेक लोक शिष्टमंडळ घेऊन साहेबांना भेटावयास आले होते. त्यावेळेसही शिवसेना प्रमुखांनी दैनिक सामना मधून स्पष्टपणे सांगितले होते की, ज्या प्रथा-परंपरा अयोग्य आहेत त्या सर्वांच्या संदर्भात आपण भूमिका घेऊ शकतो.

अलीकडच्या काही दिवसांमध्ये कोल्हापूर येथील अंबाबाईच्या देवळाच्या गाभाऱ्यात महिलांना प्रवेश देऊ नये याबाबत वांदग माजला होता. त्याच वेळेस उद्धव साहेबांच्या "पहावा विठ्ठल"या पुस्तक प्रकाशनाच्यावेळेस साहेबांनी जाहीरपणे सांगितले होते की, सर्व माता, भगिनींना, स्त्रियांना अंबाबाईच्या देवळाच्या गाभाऱ्यात प्रवेश मिळालाच पाहिजे. अंबाबाईच्या देवळात महिलांना अडवणारे तुम्ही कोण ? असे त्यांनी ठणकावून सांगितले होते.

अनेक लोक वेगवेगळया जाती प्रथेवर बोलत असतात. परंतु वेगवेगळया पध्दतीच्या जाती-पोटजाती बाजूला सारुन त्यांना निवडणूक प्रक्रियेमध्ये, पक्षामध्ये स्थान देणारे नेते म्हणून शिवसेना प्रमुखांचे आगळे वेगळे स्थान आहे.

माझ्या मागे महात्मा फुले, आंबेडकरांचा विचार होता तरी सुध्दा तुम्ही कोणत्या जातीमध्ये जन्माला आला आहात, कोणत्या धर्मामध्ये जन्माला आला आहात त्यानुसार पश्चिम महाराष्ट्रात स्थान ठरत असते. परंतु अशाही परिस्थिती शिवसेना प्रमुखांनी मला शिवसेना प्रवक्ता म्हणून तसेच विधान परिषद सदस्या म्हणून संधी दिली.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सन 2003 पासून कार्यकारी प्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे यांचे जे जे कार्यक्रम होत, जे जे दौरे होत त्याकडेही साहेबांचे मोठया प्रमाणात सातत्याने लक्ष राहत असे.

साहेबांचे 17 तारखेला निधन झाल्यानंतर अंत्यदर्शनासाठी जो जनसागर लोटला होता त्यातील थोडया लोकांशी मला बोलण्याची संधी मिळाली होती. त्यातील अनेकांनी सांगितले होते की, साहेबांनी आम्हाला अमुक अमुक साली मदत केली होती परंतु आम्हाला माहिती नसतांना त्यांनी गुप्तपणे मदत केलेली होती. अशा प्रकारे लाखो लोक साहेबांच्या अंत्यदर्शनामध्ये सहभागी झाले होते.

साहेबांना रडणारी माणसे कधीही आवडत नसत. त्यामुळेच आम्ही आमच्या अश्रूंना आवर घातला होता. ज्यावेळेस माननीय शिवसेना प्रमुखांना सर्व जण "बाळासाहेब परत या, बाळासाहेब परत या" अशी साद घालीत होती त्यावेळेला माननीय उद्धवसाहेबांनी सांगितले की, "बाळासाहेब परत या" ही आपली साद साहेबांनी ऐकली आहे, खरे म्हणजे बाळासाहेब गेलेलेच नाहीत, ते जनतेच्या श्वासा श्वासात आणि "शिवसेना" या चार अक्षरात आहेत. अशा प्रकारे दिलासा देण्याचे काम आपण सर्व जण करीत आहोत.

सभागृहात वैचारिक मतभेद असणाऱ्यांनी साहेबांबद्दल चार शब्द चांगले व्यक्त केलेले आहेत. फसवणारे लोक साहेबांना अजिबात आवडत नसत. ते अशा लोकाबाबत आमच्या समोर बोलले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जन्म होण्याच्या काही आठवडे पहिले साहेबांनी भाकीत केले होते की, श्री.शरद पवार हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून नवा पक्ष काढणार आहेत. त्यांच्या भाकितानुसारच सर्व काही घडत गेले होते. हे सर्व साहेबांच्या आणि पवार साहेबांच्या मैत्रीमुळे घडले असेल परंतु शिवसेना प्रमुखांची ज्यांच्या ज्यांच्यांशी मैत्री होती ती मैत्री मैत्रीच्या जागी व राजकारण राजकारणाच्या जागी अशा प्रकारचे संस्कार साहेबांनी आमच्यावर केलेले आहेत. तसेच स्वतःच्या शब्दाला इमान ठेवून व्यक्तींच्या अडचणीच्या काळात साहेब प्रत्येक वेळी धावून गेले होते.

माननीय शिवसेना प्रमुखांना श्रध्दांजली व्यक्त करण्याची वेळ आयुष्यात आमच्यावर येईल असे आम्हाला कधीही वाटले नव्हते त्यामुळे आम्ही याबाबतीत स्वतःला दुर्दैवी मानतो. त्यामुळे साहेबांना अंतःकरणपूर्वक श्रध्दांजली व्यक्त करते.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

माजी पंतप्रधान कै.इंद्रकुमार गुजराल यांनाही श्रध्दांजली अर्पण करते.

कै.विलासराव देशमुखांचा परिचय सर्वांना आहे परंतु 1993 च्या लातूरच्या भूकंपात आम्हाला त्यांचा चांगला परिचय झाला होता. लातूर-उस्मानाबाद येथील भूकंपग्रस्तांबाबत जे काम त्यांनी केले होते त्याची कायमस्वरुपी दखल आपत्कालीन व्यवस्थापनमध्ये घेतली जाईल.

कै. बाबासाहेब कुपेकरांनाही मी श्रध्दांजली अर्पण करते. तसेच इतर मान्यवरांचे जे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

------

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच, सर्वश्री विठ्ठलराव दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी, सदाशिवराव शिंदे यांच्या दु:खद निधना निमित्त सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यास माझ्या पक्षाच्यावतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी पहिल्यांदा श्री.विलासराव देशमुख यांना पहिल्यांचा MSC बँकेच्या कुलाबा येथील गेस्ट हाऊसवर भेटलो. त्यावेळी माझे वडील बँकेचे संचालक होते. त्यावेळी महाराष्ट्राच्या राजकारणातील श्री.वसंतदादा पाटील यांच्यासह सर्व मंडळी MSC बँकेच्या गेस्ट हाऊसवर मुक्काम करायची. त्यामध्ये सर्वात तरूण श्री.विलासराव देशमुख हे होते. माझे वडील देखील फटकळ स्वभावाचे होते. असे असताना श्री.विलासराव देशमुख यांची माझ्या वडिलांशी मैत्री जमली. त्या बँकेच्या संचालक मंडळामध्ये श्री.विलासराव देशमुख हे सर्वात तरूण होते. पण नंतरच्या पाच सहा वर्षामध्ये श्री.विलासराव देशमुख यांच्या बद्दल मला आकर्षण का निर्माण झाले हे मी आपणास सांगू इच्छितो. त्यावेळी मराठवाड्यामध्ये विदर्भाप्रमाणे सहकार रूजत नव्हता. पहिल्यांदा मराठवाड्यामध्ये सहकार रूजविण्याचे काम यशस्वीरित्या कोणी केले असेल तर ते म्हणजे श्री.विलासराव देशमुख यांनी केले आहे. त्यावेळी श्री.विलासराव देशमुख यांनी मांजरा सहकारी साखर कारखाना काढला व तो यशस्वी देखील केला. त्यामुळेच त्यांच्या बद्दल माझ्या मनात एक वेगळे आकर्षण निर्माण झाले. या दोन बंधूपैकी माझी श्री.दिलीपराव देशमुख यांच्याशी जास्त मैत्री होती. मी नेहमी त्यांच्या समोर श्री.दिलीपराव देशमुख यांचे कौतुक करायचो की, ते फार अभ्यासू आहेत. तेव्हा श्री.विलासराव देशमुख म्हणायचे की, तुमची त्यांच्याशी मैत्री असली तरी आपण माझ्या बरोबर देखील मैत्री ठेवावी. श्री.विलासराव देशमुख यांचे एक वेगळे व्यक्तिमत्व होते.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, माझा पक्ष लहान आहे, याची मला जाणीव आहे. पण गरज पडली की, राजकीय लोक आमच्याकडून सहकार्याची अपेक्षा करतात. परंतु, श्री.विलासराव देशमुख ही अशी व्यक्ती होती की ते कोणतीही गोष्ट कधी विसरत नव्हते. त्यांना राजकारणात पहिल्यांदा लातूर पंचायत समितीचे उप सभापती करण्याचे काम माझ्या पक्षाने केले. ते श्री.उद्धवराव पाटलांकडे आले. सन 1980 साली मी लहान होतो. पण हा विषय आमच्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीमध्ये चर्चेला गेला. त्यावेळी श्री.विलासराव देशमुख यांना उप सभापती पदासाठी आमच्या पक्षाने पाठिंबा दिला. त्यावेळी मराठवाड्याचे आणि पक्षाचे प्रमुख श्री.उद्धवराव पाटील हेच होते. त्यामुळे त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. ते पण स्पष्ट वक्ते होते. त्यांनी मध्यवर्ती समितीमध्ये चर्चा सुरू असताना उठून सांगितले की, मी श्री.विलासराव देशमुखांना पाठिंबा दिला आहे. हा मुलगा पुढे मोठा होणार आहे. त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे. त्यावेळी त्यांचे आणि श्री.उद्धवराव पाटील यांचे काय संबंध होते हे मला माहीत नाही. त्यावेळी या विषयावर पक्षामध्ये कुठेही चर्चा झाली नाही. तशीच परिस्थिती पुन्हा पक्षावर आली.

सन 1999 मध्ये केवळ सहा मतावर सरकार स्थापनेची वेळ आली. त्यावेळी त्यांनी माझ्या वडिलांना फोन केला की, मला संधी मिळण्याची शक्यता आहे, आपल्या मदतीची गरज आहे. आम्ही कुठलीही अट न घालता त्यांना पत्र दिले. अकरा जणांचा पाठिंबा असल्याचे पत्र आम्ही त्यांना दिले. त्यावेळी कक्ष क्रमांक 316 वर सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई आणि श्री.संजय दत्त आले होते. हे सर्वजण आले असताना आम्ही कुठलीही मागणी न करता त्यांना पत्र दिले होते. दुर्दैवाने 15 महिन्यांनी मतभेद झाले. आघाडी सरकार असल्यामुळे त्यांना दबावाखाली काही निर्णय घ्यावा लागला होता. त्यामुळे आम्ही पाठिंबा काढून घेतला होता. महाराष्ट्रामध्ये 8-10 दिवस मोठे वादळ निर्माण झाले होते. हा पाठिंबा काढण्यामध्ये माझा पुढाकार मोठ्या प्रमाणावर होता. त्यानंतर श्री.विलासराव देशमुख यांनी फोन केला व सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त माझ्याकडे आले. त्यांनी मला सांगितले की, श्री.विलासराव देशमुख आपणास भेटू इच्छितात. आपण याल काय ? मी सांगितले, येणार नाही. ते म्हणाले की, श्री.विलासराव देशमुख हे आपणाकडे येत आहेत. ते कक्ष क्रमांक 316 वर आले. 15 ते 20 मिनिटेच चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी जे जे शब्द दिले होते ते ते कायम ठेवले व मैत्री देखील कायम ठेवली. मी कधीच त्यांच्याकडे वैयक्तिक कामासाठी गेलो नाही. मी सहसा कोणाकडे गेलो नाही आणि मी जात देखील नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

पण श्री.विलासराव देशमुख फोन करुन वेगवेगळ्या विषयावर माझ्याशी चर्चा करायचे. श्री.विलासराव देशमुख यांना ज्यांनी ज्यांनी मदत केली वा त्यांचे जे मित्र होते त्यांना ते कधीही विसरले नाहीत. श्री.धनाजी साठे व श्री.उल्हासदादा पवार हे त्यांचे कॉलेजचे मित्र होते, परंतु ते त्यांना कधीही विसरले नाहीत, त्यांना त्यांनी मोठे केले. श्री.विलासरावांच्या गरिबीच्या काळात त्यांना ज्यांनी साथ दिली, त्यांना सन्मान देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. असे ते एक वेगळे व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख हे माझ्या वडिलांचे मित्र होते. एकदा ते माझ्या वाढदिवसाला आले त्यावेळी त्यांनी माझ्या सर्व संस्था पाहिल्या, तेथील कामकाज पाहिले आणि माझी पाठ थोपटून मला म्हणाले की, "जयंतराव, अशी कामे आपल्या सारखी प्रामाणिक माणसेच करु शकतात." मी अगोदर सांगितल्याप्रमाणे आम्ही त्यांच्या पक्षाला दिलेला पाठिंबा काढून टाकल्यानंतर त्यांच्याशी संपर्क वाढला. ते दरवर्षी मला वाढदिवसाला फोन करायचे आणि दरवर्षी माझ्यावर स्वत: एक लेख लिहायचे.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख केंद्रात मंत्री झाल्यावर दिल्लीत गेले. मी दिल्लीला त्यांच्याकडे गेल्यावर माझी दोन-तीन तास सुटका होत नसे. त्यांचे दिल्लीमध्ये कधीच मन रमले नाही. त्यांना महाराष्ट्राची खूप ओढ होती आणि ते तसे बोलून देखील दाखवावयाचे. दिल्लीत आपले काम नाही. तेथे कोणी भेटायला येत नाही. संध्याकाळ झाली की मी बैचेन होतो. मी माणसामधील माणूस आहे असे ते मला नेहमी सांगायचे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे ते कधीही कार्यकर्त्यांचा फोन घेण्यास टाळाटाळ करीत नसत. ते स्वत: कार्यकर्त्यांचे फोन घेऊन त्या कार्यकर्त्यांची चौकशी करुन त्याच्याकडे गावाकडील माहिती घेत असत.

सभापती महोदय, मी दरवर्षी ऑगस्ट महिन्यात परदेशी जातो. परदेशी जाण्यापूर्वी मी त्यांना न चुकता फोन करीत असे. यावेळी देखील मी त्यांना फोन केला व सांगितले की, मी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

परदेशी जात आहे. परत आल्यानंतर आपणाशी तीन-चार विषयांवर मला चर्चा करायची आहे. पण आपण आपल्या प्रकृतीकडे लक्ष द्यावे. आपण आपल्या प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे. आपण कमी फिरले पाहिजे असे डॉक्टरांचे मत आहे. त्यावर ते मला म्हणाले की, "जयंत, माझ्या तब्बेतीला कोणी हात लावू शकत नाही. आपण काळजी करु नका."

सभापती महोदय, मांजरा कारखान्यासाठी त्यांना 50 कोटी रुपयांची गरज होती. एमएससी बँक नियमाप्रमाणे त्यांना एवढी रक्कम देऊ शकत नव्हती. तेव्हा आपण मला तेवढी रक्कम द्यावी असे विलासरावांनी मला सांगितले. मी त्यांना सांगितले की, कायद्याने मला 20 कोटी रुपये देता येतील. त्या पुढील रक्कम दिल्यास मी अडचणीत येईन. त्यावर ते मला म्हणाले की, "मी, विलासराव देशमुख बोलत आहे, मी आपणास कधीच अडचणीत आणणार नाही. सर्व जबाबदारी मी घेईन. आपण तेवढी मदत करा." मी ताबडतोब 50 कोटी रुपये दिले आणि त्यांनी ते मुदतीपूर्व फेडले. ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, तत्कालीन सदस्य श्री.उल्हासदादा पवार हे विलासरावांबद्दल अनेक किस्से विधानपरिषदेच्या लॉबीमध्ये सांगायचे. श्री.विलासराव हे हजरजबाबी होते. श्री.विलासरावांचे निधन झाले त्यावेळी मी परदेशी होतो. त्यांच्या अत्यंयात्रेस जनसागर लोटला होता. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे नुकसान झालेले आहेच, परंतु त्यापेक्षाही जास्त नुकसान मराठवाड्याचे झाले आहे असे मला वाटते. श्री.विलासरावांच्या दु:खद निधनाने त्यांच्या परिवारावर आणि मित्र परिवारांवर जे दु:ख कोसळले आहे त्या दु:खात माझा शेतकरी कामगार पक्ष सहभागी आहे.

सभापती महोदय, सदनाचे सदस्य नसताना देखील ज्यांच्या बाबतचा शोक प्रस्ताव या सदनात आला अशा काहीच ठरावीक व्यक्ती आहेत.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

या सभागृहाचे सदस्य नसतांना देखील त्यांना आपण शोकप्रस्तावाचा मान देत आहोत. या महाराष्ट्रामधील थोर नेत्यांमध्ये कै. पु.ल. देशपांडे यांच्यासारख्या अनेक महनीय व्यक्तींना आपण हा मान दिल्याबद्दल मी आपल्या दालनामध्ये आपणास भेटून या बाबत हरकत सुध्दा घेतलेली आहे. जी व्यक्ती या सभागृहाची सदस्य नाही त्यांच्याबद्दल सभागृहात शोकप्रस्ताव मांडला तर वेगळी प्रथा निर्माण होईल असे आपल्याला सांगितले आहे. त्यावेळी अशा काही व्यक्ती समाजामध्ये आहेत की, ज्या या सभागृहाच्या कामकाजाच्या पलीकडे असतात त्यामुळे आपण त्या बाबत कुठेही हरकत घेऊ नका असे आपण मला समजावून सांगितले. परंतु माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर केवळ या राज्याच्या विधानसभा आणि विधानपरिषदेने त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला नाही तर या देशाच्या लोकसभेने, राज्यसभेने आणि हिंदुस्थानच्या सर्व राज्यातील विधानसभांमध्ये देखील शोक व्यक्त करण्यात आला आहे. हा मान केवळ माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनाच या देशामध्ये मिळाला आहे.

सभापती महोदय, माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल मला एक वेगळी आपुलकी आणि आकर्षण कां आहे? सत्तेमध्ये सामील न होता सत्तेच्या खुर्चीमध्ये दुसऱ्यांना बसवून त्यांच्याकडून काम करुन घेणारी व्यक्ती म्हणून मला त्यांच्याबद्दल खूप आकर्षण आहे. तसेच स्वत: नाहीतर त्याचबरोबर आपल्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिला त्यांनी सत्तेच्या खुर्चीमध्ये कधीही बसविले नाही. सत्तेसाठी तडफडणारे अनेक लोक आपण पहातो, सत्ता नसेल तर लोक बेचैन होत असतात. परंतु माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे हे सत्तेच्या जवळ देखील कधी गेले नाहीत. त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाने आणि लेखणीने राज्यामध्ये सत्ता आणण्याचे काम जरुर केले. परंतु सत्तेत सामील न होण्याचा एक वेगळा इतिहास माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी या राज्यात घडविला. सभापती महोदय, या सभागृहाचे सदस्य आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय श्री. नितीन गडकरी साहेबांनी माझ्याशी अनेक वेळा वाद घातला व चर्चा केली. ते म्हणाले की, तुम्ही कसले पुरोगामी, तुम्ही कसले मार्क्सवादी? खरा मार्क्सवादी आणि पुरोगामी, सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करणारा नेता कोण असेल तर ते माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे. तुम्ही या पध्दतीने राजकारणामध्ये वागले पाहिजे असे ते मला नेहमी सांगत असतात. या राज्यात वेगवेगळया लोकांनी एकत्र येऊन अनेक पक्ष स्थापन केले आहेत, एकत्र येऊन त्या पक्षाला उभारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

दिली आहे. परंतु शिवसेना हा एकमेव पक्ष आहे की, जो एका माणसाने स्थापन केला, एका माणसाने घडविला. त्या पक्षाला सत्तेपर्यंत नेण्याचे काम माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी केले.

सभापती महोदय, माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांची शोकसभा षण्मुखानंद हॉलमध्ये घेण्यात आली होती त्यावेळी मी भाषण केले होते. त्यांच्या कुटुंबाचे आणि आमचे तीन पिढयांचे संबंध आहेत. कै. प्रबोधनकार ठाकरे यांनी आमच्या घरी आमच्या आजोबांबरोबर अनेक बैठका घेतल्या आहेत. त्यावेळी रायगडमध्ये तीन नाना होते. एक म्हणजे नाना टिपणीस, दुसरे नाना पुरोहित आणि तिसरे नाना पाटील अशा तीन नानांचा दबदबा होता. त्यावेळी कै. प्रबोधनकार ठाकरे आमच्याकडे येत असत. त्या काळात आमचे गाव हे सेंटर प्लेस होते, धरमतर खाडीवर पूल बांधण्यात आला नव्हता म्हणून ते होडीमध्ये बसून येत असत. आम्ही आमच्या घराच्या खिडकीमध्ये बसून बघत होतो. ज्यावेळी घरामध्ये मोठी माणसे येतात त्यावेळी त्यांच्यासमोर जायचे नाही ही त्या काळात आमच्या घरातील पध्दत होती. त्या काळात मला त्यांना अगदी जवळून पाहण्याचा योग आला. माझ्या वडिलांबरोबर त्यांचे व्यक्तिगत असे नाते होते. त्यांचे आणि माझ्या काकांचे थोडे मतभेद होत असत, परंतु वडिलांशी त्यांची मैत्री होती. तेव्हापासून त्यांचे आणि आमचे कौटुंबिक संबंध आले. राजकारणामध्ये ठाकरे कुटुंबीयांचे वेगवेगळे विचार असले तरी आम्ही वैयक्तिक संबंध कायम ठेवले. माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनामुळे शिवसेनेच्या सर्व नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर ओढवलेल्या दु:खद प्रसंगामध्ये मी आणि माझा पक्ष सहभागी आहे. तसेच, अन्य माननीय सदस्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर मी आदरांजली व्यक्त करुन माझे विचार संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी या देशाचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल, या राज्याचे माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री आदरणीय श्री. विलासरावजी देशमुख, विधानसभेचे माजी अध्यक्ष आदरणीय श्री. बाबासाहेब कुपेकर, माजी अध्यक्ष श्री. शंकरराव जगताप, माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी, सदाशिवराव शिंदे, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे.

सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये एकूण आठ दिवंगत व्यक्तींबद्दल शोक व्यक्त करीत आहोत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत, त्यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करीत आहोत. त्यापैकी माजी पंतप्रधान माननीय श्री.इंद्रकुमार गुजरालजी यांच्याबरोबर मला प्रत्यक्षपणे काही काम करता आले नाही. परंतु ते जेव्हा भारताचे परराष्ट्र मंत्री होते तसेच पंतप्रधान होते, त्यावेळी मात्र मी विधान सभेचा सदस्य होतो. केवळ कै.विठ्ठलराव सायन्ना दिकोंडा यांच्याबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली नाही बाकी सर्वच दिवंगत नेत्यांबरोबर मला थोडीफार काम करण्याची संधी मिळाली.1999 मध्ये जेव्हा माजी मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख हे या राज्याचे मुख्यमंत्री झाले.त्यावेळी मी विधानसभेचा आमदार म्हणून विरोधी पक्षामध्ये काम करीत होतो. तत्पूर्वी माननीय श्री.विलासराव देशमुख साहेबांबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली नव्हती. कारण 1995 ते 1999 पर्यंत ते या सदनामध्ये नव्हते.तसेच मी सदनामध्ये असताना समोरच्या व्यक्तीने कोणतेही वक्तव्य केले तर त्यावर कॉमेंटस् करणे, त्यावर कोटी करणे हा माझा हातखंडा होता. परंतु एखाद्या माणसाच्या शब्दामध्ये किती ताकद असू शकते आणि अशा वेळी कोणाच्याही भावना न दुखावता एका वाक्याने एखाद्या माणसाचे विचार किंवा मन परिवर्तन कशा प्रकारे होऊ शकते याचा उत्तम अनुभव मला आलेला आहे. मी सातत्याने अशा प्रकारच्या कॉमेंटस् करीत असे, कोट्या करीत असे आणि संपूर्ण सभागृह जोरजोरात हसत असे आणि टाळ्या वाजवित असे. अशा प्रकारच्या माझ्या कोटी असावयाच्या.

सभापती महोदय, एकदा माननीय श्री.विलासरावजी देशमुख काही बोलण्यासाठी उभे राहिले आणि मी त्यांच्या वक्तव्यावर कोटी केल्यावर संपूर्ण सभागृहाने टाळ्या वाजविल्या आणि सभागृहातील सन्माननीय सदस्य खो-खो हसत होते.मात्र तेव्हा श्री.विलासरावजी देशमुख हे आपल्या जागेवर शांतपणे उभे राहिले, मला काहीही बोलले नाहीत. सर्व सभागृह शांत झाल्यावर श्री.विलासराव देशमुख साहेबांनी सांगितले की, भास्करराव, आम्ही गेली 30-40 वर्षे राजकारणा मध्ये आहोत. आता आम्ही पहिल्या फळीचे नेतृत्व करीत आहोत. तुम्ही विरोधी पक्षामध्ये असला तरी मी तुमच्यातील जे काही गुण पहात आहे किंवा जे गुण हेरत आहे त्यामुळे मला असे वाटते की, तुम्ही सुध्दा एक ना एक दिवस महाराष्ट्र राज्यामध्ये उच्च पदावर चांगल्या प्रकारचे काम करु शकाल अशा प्रकारची गुणवत्ता आणि क्षमता तुमच्यामध्ये आहे. ती क्षमता वाढवावयाची की अशा प्रकारच्या कोट्या करावयाच्या याबाबत तुमचा तुम्हीच विचार करावा आणि या एका वाक्याने माझ्या

. . . .2सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

संपूर्ण स्वभावामध्ये बदल घडवून आणला. माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्याबरोबर मला फार काम करण्याची संधी मिळाली अशातला भाग नाही. त्यावेळी मी शिवसेनेमध्ये काम करीत होतो आजचे माननीय उद्योग मंत्री श्री.नारायणरावजी राणे त्यावेळी सभागृहाचे नेते होते.त्यावेळी माननीय श्री.विलासरावजी देशमुख पुढच्या बाकावर येऊन बसत असत. त्यांच्या बाजूला माननीय श्री.छगन भुजबळसाहेब असावयाचे आणि माननीय श्री.नारायण राणेसाहेब जोरजोराने, जोरजोराने आपला विषय मांडण्याचा प्रयत्न करीत असत आणि माननीय श्री.विलासराव देशमुख साहेब हे एकदा इकडे मान कर, एकदा तिकडे मान कर किंवा एकदा मागे बघ, एकदा पुढे बघ असे करीत असत. परंतु सन्माननीय श्री.नारायण राणेसाहेब काय म्हणत आहेत याकडे ते बिलकूल लक्ष देत नसत.

सभापती महोदय, नंतरच्या काळामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये गेल्यानंतर मला जेव्हा माननीय श्री.विलासराव देशमुखसाहेब यांच्याकडे जाण्याची वेळ आली तेव्हा त्यांच्यातील गांभीर्य, त्यांचा अभ्यास आणि त्यांची विचारांची खोली केवढी मोठी होती हे माझ्या लक्षात आले. एखाद्या व्यक्तीने हातामध्ये पत्र दिल्यानंतर असे म्हटले जावयाचे की, श्री.विलासराव देशमुखसाहेब पत्र वाचत नाहीत. पण त्यांच्या हातामध्ये पत्र दिल्यानंतर ते पटकन वर पहावयाचे आणि आपल्या हाता मध्ये पत्र देणारा माणूस कोण आहे, त्याचा पत्रातील विषय काय असेल ते त्यांना पूर्णपणे माहिती असे आणि मग ते एका क्षणामध्ये त्यावर एन्डॉसमेंट करीत असत आणि त्यांना जे काही म्हणावयाचे असेल ते तत्काळ लिहून पाठवित असत. समोरचा माणूस कोण आहे, त्याच्या पत्रामध्ये काय असेल मग ते पत्र बदलीच्या संदर्भातील आहे की विकास कामाच्या संबंधातील आहे याबाबतीत ज्याला उभे वाचन म्हणतात तसे वाचन करण्याची त्यांची क्षमता होती. त्यावेळी ते काँग्रेस पक्षामध्ये होते आणि मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होतो.

सभापती महोदय, ज्यावेळी ते चिपळूणमध्ये सभेसाठी आले होते, त्यावेळच्या सभेला मी उपस्थित नव्हतो. परंतु माणसाच्या मनाचा मोठेपणा किती असावा याबाबत सांगावयाचे तर मी त्यावेळी ते राज्याचे माननीय मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांचे स्वागत केले आणि काँग्रेस पक्षाचा मेळावा सुरु झाला म्हणून माझ्या कामाला निघून गेलो. माझ्या पक्षाचा मेळावा नसल्याने मला त्याठिकाणी उपस्थित रहाणे शक्य नव्हते.परंतु त्या मेळाव्यामध्ये सुध्दा त्यांनी जाहीरपणे त्यांनी माझे भरभरुन कौतुक केले. अशा प्रकारची नेतृत्वे रोज उदयाला येत नाहीत. अशी नेतृत्वे ही दिवसा-

. . . .2 सी-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . . .

गणिक बहरली आणि त्यासाठी आपण सर्वांनी पाठबळ दिले पाहिजे हे जाहीरपणे सांगण्याचा मनाचा मोठेपणा सुध्दा त्यांच्याकडे होता.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

दुर्दैवाने मला त्यांच्या अंत्यविधीला जाता आले नाही. कारण 14 ऑगस्टला त्यांचे निधन झाले आणि 15 ऑगस्टला स्वातंत्र्य दिन होता. मी रत्नागिरी जिल्ह्याचा पालकमंत्री असल्यामुळे त्या ठिकाणी झेंडावंदनाकरिता थांबलो होतो. आमचे नेते आदरणीय दादांनी आमच्याकरिता खास विमानाची सोय केली होती परंतु मी रत्नागिरीहून त्या ठिकाणी पोहचू शकत नव्हतो. कारण मला रस्ते मार्गाने येण्याशिवाय दुसरे साधनच नव्हते. त्यामुळे मला पोहोचता आले नाही.

या सभागृहाचे नेते दादांनी या सभागृहाची प्रथा म्हणून अनेक वेळा अनेकांना श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. परंतु दादा कधी भावनाविवश होत नाहीत. दादांना सर्वजण कठोर समजतात, राकट समजतात, रागीट समजतात. कारण ते कधी भावनाविवश होत नाहीत. पण ज्या ज्या वेळी विलासरावांचा विषय आला त्या त्या वेळी मी दादांना भावनाविवश होताना पाहिले आहे. मंत्रालयात त्यांना अर्पण केलेली श्रध्दांजली असेल, विधानसभेत त्यांना अर्पण केलेली श्रध्दांजली असेल, ती पाहिल्यानंतर त्यावेळी मी दादांना भावनाविवश होताना पाहिलेले आहे. विलासरावांबद्दल प्रत्येकाच्या मनामधील इतके ओतप्रोत प्रेम ते गेल्यानंतर दिसून आले. एक खूप मोठे उमदे नेतृत्व आपल्यातून गेले आहे. माननीय सभापती महोदय, आपण आणि त्यांनी एकत्र काम केले आहे. आपल्याशी चर्चा करताना आपल्या तोंडून मी विलासरावांच्या नेतृत्वाबद्दलचे अनेक किस्से ऐकलेले आहेत. कारण आपले संबंध तसे होते हे सुध्दा मी ऐकलेले आहे. श्री. विलासराव देशमुख यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री. बाबासाहेब कुपेकर आज आपल्यामध्ये नाहीत. विधानसभेमध्ये आता मी ज्या ठिकाणी बसतो त्याच्या मागच्या बाजूला बाबासाहेब कुपेकर आणि आमच्या पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. मधुकरराव पिचड साहेबांची बसण्याची जागा आहे. एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर दिल्यानंतर किंवा एखादा विषय समोर आल्यानंतर सातत्याने ते भरभरुन कौतुक करीत असत. एखाद्या विषयाची सोडवणूक कशी करुन घ्यावी, वनाचा प्रश्न असेल किंवा जंगली श्वापदांपासून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान असेल, त्या संदर्भामध्ये कशा प्रकारच्या उपाययोजना कराव्यात याबाबत सातत्याने मार्गदर्शन करणारे बाबासाहेब कुपेकर आता आमच्या पाठीमागे बसणार नाहीत हे सांगत असताना दु:ख तर वाटतेच. त्यांना देखील मी आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, माजी विधानसभाध्यक्ष श्री. शंकररावजी जगताप हे मी आमदार असताना

...2...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

आमदार होते. त्यांची जी शेवटची भेट झाली त्याबाबत सांगावयाचे म्हणजे 22 ऑक्टोबर, 2009 ला विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल लागला. साधारणपणे मी मतदारसंघातच फिरत असतो. 30 ऑक्टोबरला आदरणीय पवार साहेबांना भेटण्याकरिता मी सिल्वर ओक येथे गेलो. मी जाण्यापूर्वीच त्या ठिकाणी श्री. शंकररावजी जगताप बसलेले होते. मी साहेबांना बुके देऊन नमस्कार केला आणि निघालो. त्यावेळी साहेबांनी मला परत बोलावले आणि यांना ओळखता का असे मला विचारले. मी सांगितले की, साहेब, विधिमंडळामध्ये पहिले भाषण केल्यानंतर जाहीरपणे कौतुक करणारे जर कोणी असतील तर ते श्री. जगताप साहेब आहेत. अत्यंत थोडक्या शब्दामध्ये पण मार्मिक बोलण्यामध्ये कोणी त्यांचा हात धरु शकणार नाही. त्यांनी पवार साहेबांसमोर सांगितलेला एक किस्सा मला आठवतो. त्यांनी सांगितले की, कोकणातील अनेक माणसे आपल्याला मोठी झालेली दिसतात. त्यामध्ये लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, साने गुरुजी तसेच अनेक कवी आणि लेखकांची नावे घेता येतील पण त्यातील एकही माणूस कोकणामध्ये मोठा होऊ शकला नाही. तो कोकणाच्या बाहेर आला आणि मग त्याचे मोठेपण देशाला दिसले. अशा प्रकारचा किस्सा त्यांनी सांगितला. त्या दिवशी त्यांची शेवटची भेट झाली होती. त्यानंतर त्यांची भेट होऊ शकली नाही आणि पुन्हा आता त्यांची भेट होणार नाही. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केल्याशिवाय मला पुढे जाता येणार नाही. मी 1984 पासून 2004 पर्यंत म्हणजे 17 सप्टेंबर, 2004 पर्यंत आदरणीय बाळासाहेबांबरोबर काम केले. साहेबांबरोबर मी 1984 सालापासून काम करीत होतो परंतु 1989 सालापर्यंत आम्ही साहेबांना प्रत्यक्षपणे कधी भेटलो नाही. माझ्या संपूर्ण राजकीय जीवनामध्ये पाच किंवा कदाचित दहा वेळा साहेबांना प्रत्यक्ष भेटून चर्चा केली असेल. अनेक वेळा सभांमध्ये मी साहेबांना बघितले पण त्यांच्याशी प्रत्यक्षपणे पाच किंवा दहा वेळाच चर्चा झाली असेल. त्या व्यतिरिक्त त्यांना फार भेटता आले नाही. कारण आम्हाला आधीपासूनच नेत्यांबरोबर चर्चा करणे, नेत्यांबरोबर फोनवर बोलणे, त्यांच्या कडेला जाऊन बसणे किंवा आपण काही तरी केले आहे हे सातत्याने जाऊन सांगणे अशी शिकवण नाही आणि माझा व्यक्तिगत तो स्वभाव देखील नाही. आपण आपले काम करीत राहावयाचे, नेत्यांनी त्याचे परीक्षण करावयाचे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. भास्कर जाधव .....

मला साहेबांबद्दल बोलले पाहिजे. मी राजकारणामध्ये नवीन होतो. माझ्या घराण्याला कोणतीही राजकीय परंपरा नाही. माझ्या आईच्या घराण्यामध्ये किंवा वडिलांच्या घराण्यामध्ये कोणीही राजकारणात नव्हते. गणेश गल्लीतील ज्येष्ठ नगरसेवक श्री. नागेश पवार होते. त्यावेळी कोकणामध्ये शिवसेना वाढविण्याकरिता नागेशराव पवार, भाऊ सावंत, भाऊ पंडित, शंकरराव पवार, शिंदे, एकनाथ धाग, विजय शिर्के अशी मंडळी गेली.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

त्यांनी सांगितले की, मला जिल्हा परिषदेचा उमेदवार म्हणून शिवसेनेकडून शिवसेनाप्रमुखांनी घोषित केलेले आहे. त्यावेळी आमच्या कोकणाचे नेते श्री. दत्ताजी नलावडे हे होते आणि ते त्यावेळी मुंबई महानगरपालिकेचे महापौर होते. मला तेव्हा राजकारणाचा कोणताही गंध नसताना शिवसेनाप्रमुखांनी जिल्हा परिषदेचा उमेदवार म्हणून घोषित केले. मी फिरायला लागलो. त्यानंतर अशी बातमी आली की, मला उमेदवारी न देता ती पंडित गुरुजींना देण्यात येईल. त्यावेळी पंडित गुरुजींनी कॉंग्रेसकडे उमेदवारी मागितली होती. कॉंग्रेसने त्यांना उमेदवारी दिली नाही तर शिवसेनेकडून त्यांना उमेदवारी दिली जाईल आणि कॉंग्रेस पक्षाने त्यांना उमेदवारी दिली तर मला शिवसेनेकडून उमेदवारी दिली जाईल असे ऐकण्यात येत होते. माझा स्वभाव तामसी हे मी स्वत: मान्य करतो. मला हे समजल्या नंतर माझ्याकडील 1471 नंबरच्या बुलेटवर बसून आम्ही चौघेजण तडक जेथे श्री.दत्ताजी नलावडे रहात होते तेथे गेलो. त्यावेळी श्री. दत्ताजी नलावडे हे माजी खासदार श्री. गोविंदरावजी निकम यांच्या घरी रहात असत. तेथे गेलेले श्री. नलावडेसाहेबांना आवडत नसे. तरीही आम्ही तेथे गेलो.

शिवसेनेमध्ये अन्य चर्चेला थारा नसतो. तेथे फक्त निर्णय असतो. तेथे विचारायचे नसते, चर्चा नसते, कारणे सांगायची नसतात. मी नवखा असल्यामुळे ह्या गोष्टी मला माहीत नव्हत्या. 1986 सालची ही गोष्ट होती. त्यावेळी जिल्ह्याचे विभाजन झाले होते आणि निवडणूक देखील लागली होती. आम्ही श्री. दत्ताजी नलावडे साहेबांना दादा म्हणत असू. मी त्यांना सांगितले की, दादा, मला उमेदवारी देण्याऐवजी ती पंडित गुरुजींना देण्यात येणार आहे असे मी ऐकतो आहे. उमेदवारी कुणाला द्यायची आणि कुणाला नाही हा पक्षाचा अधिकार आहे. परंतु पंडित गुरुजींना कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवारी दिली गेली तर मला शिवसेनेकडून उमेदवारी दिली जाणार असेल तर ती उमेदवारी मी घेणार नाही. मी कुणाचेही उष्टे खात नाही आणि खाणार नाही असे मी त्यावेळी श्री. दत्ताजी नलावडे साहेबांना सांगितले. शिवेसनेमध्ये असे वाक्य उच्चारल्यानंतर मग तर सत्यानाशच म्हणायचा. असे वाक्य उच्चारल्या नंतर आमची हकालपट्टी झाली आणि आम्ही निघून आलो.श्री. दत्ताजी नलावडे साहेबांनी शिवसेना प्रमुखांकडे तक्रार केली.

मला आजही शिवसेना प्रमुखांबद्दल आदर आणि अभिमान वाटतो. आम्हाला त्यांनी घडवले. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाल्यानंतर त्याचे कसे सोने होते हे मी या ठिकाणी सांगत आहे. हे मी माझ्यासाठी सांगत नाही. त्यावेळी श्री. दत्ताजी नलावडे साहेबांनी शिवसेना प्रमुखांकडे तक्रार केली की, कोकणामध्ये पंडित गुरुजीसारख्या चांगल्या व्यक्तीला उमेदवारी देण्याचा निर्णय मी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

घेतला होता. परंतु भास्कर जाधव असा म्हणाला की, "द्यायची असेल तर आज मला उमेदवारी द्या, मी उपाशी राहीन पण कुणाचे उष्टे खाणार नाही." मी शिवसेना प्रमुखांचे आभार मानतो, त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी श्री. दत्ताजी नलावडे साहेबांना सांगितले की, हाच मुलगा खरा शिवसैनिक आहे. यालाच उमेदवारी द्या. तुमचे कोण ते पंडित गुरुजी, मला माहीत नाही. निवडणुका झाल्या नाहीत. त्या पुढे गेल्या.

त्यानंतर 1989 साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या.मी सहज अर्ज भरला आणि पहिल्यांदा मुलाखतीला गेलो. त्यावेळी शिवसेना प्रमुख ही व्यक्ती काय आहे मी सेनाभवनमध्ये पहिल्यांदा पाहिले. पहिल्याच मुलाखतीमध्ये मला शिवसेना प्रमुखांनी उमेदवारी दिली. परंतु मला फारसे पाठबळ नसल्यामुळे मला उमेदवारी नको म्हणून सांगण्यासाठी दत्ताजी साळवी यांच्या बरोबर मोतोश्रीवर गेलो. साहेबांनी मला हाकलून दिले. साहेबांचे शब्द असे होते, "बाळ ठाकरे एकदा निर्णय घेतो तो बदलत नाही. एक निर्णय बदलला तर महाराष्ट्रामध्ये अनेक निर्णय बदलावे लागतील. तुलाच निवडणूक लढवावी लागेल." मी निवडणूक लढविली नाही. मी काम केले.

1995 सालचा एक किस्सा मला येथे सांगायचा आहे. 12 नोव्हेंबर 1994 रोजी शिवसेना प्रमुख कोकणामध्ये गेले होते पहाटे 3.00 वाजता श्री. दत्ताजी साळवी यांच्या गावातील विठ्ठलाच्या मंदिरात दर्शनासाठी ते उतरले..मी शिवसेनेचा तालुका प्रमुख होतो. मी साहेबांच्या हातामध्ये हार दिला. साहेबांबरोबर माँसाहेब म्हणजे सौ. मीनाताई ठाकरे होत्या. साहेबांनी विठ्ठलाला हार घालताना माँ साहेबांना सांगितले की, हा भास्कर, याला मी उद्याची उमेदवारी देणार आहे. त्यावेळी असे काही घडेल हे माझ्या मनात देखील नव्हते. दुस-या दिवशी आम्ही सगळे बसलो. चर्चा सुरु झ ाली. त्यावेळी श्री. मनोहर जोशी हे आमचे नेते होते. साहेबांनी मला चर्चेला बोलावले. श्री. मनोहर जोशी यांनी त्यावेळी सांगितले की, रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 7 उमेदवार आहेत. 7 पैकी 4 शिवसेनेचे उमेदवार हे निवडून आलेले आहेत. दोन भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून आलेले आहेत. आता नुकतेच ज्यांचे निधन झाले ते ल.रं.हातणकर साहेब फक्त काँग्रेसचे होते. त्यांच्या समोर शिवसेनेने जाहीर केलेला उमेदवार हा मराठा समाजाचा आहे. भास्करची उमेदवारी जाहीर केली तर सर्वच्या सर्व उमेदवार हे मराठा समाजाचे होतील. जर आपण सगळेच्या सगळे उमेदवार हे मराठा समजाचे जाहीर केले तर निवडून आलेला ओबीसी समाजाचा एक उमेदवार आपण डावलला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

तर सगळे उमेदवार पडतील आणि आपली येणारी सत्ता जाईल. भास्कर जिल्हा परिषदेमध्ये व्यवस्थित काम करीत आहे. त्याचा आपण वेगळा विचार करु. मला साहेबांनी विचारले की परिस्थिती काय आहे ? मी सांगितले की, कोकणामध्ये असा प्रकार नाही. कोकणामध्ये पक्षीय राजकारण चालते. तरी देखील आपल्याला सत्ता घ्यायची आहे त्यामुळे आपण मला उमेदवारी देऊ नका. आपली सत्ता आली पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

सभापती महोदय, मी या सभागृहाचा आणखी दोन मिनिटे वेळ घेणार आहे. माननीय बाळासाहेबांनी माननीय श्री.मनोहर जोशी यांना विचारले की, भास्कर जाधव हा प्रामाणिक कार्यकर्ता आहे ना ? माननीय श्री.मनोहर जोशी यांनी सांगितले की, त्यात शंका नाही. त्यावेळी माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी जे उद्गार काढले ते संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेने ऐकले पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेने त्याची नोंद घेतली पाहिजे. या राज्यात मला सत्ता आणावयाची आहे. महाराष्ट्रात सत्ता आणावयाची आहे. भास्कर जाधव मराठा आहे आणि ओ.बी.सी.म्हणून निवडून आलेल्या आमदारास आपण डावलले तर सगळया सीट्स पडतील, म्हणून एखाद्या प्रामाणिक कार्यकर्त्यास डावलावयाचे असेल तर माझी सत्ता आली नाही तरी हरकत नाही. परंतु भास्कर जाधव यांची उमेदवारी मी संध्याकाळी जाहीर करणार असे उद्गार माननीय बाळासाहेबांनी दिनांक 12 नोव्हेंबर, 1994 काढले आहेत. त्यांनी पुन्हा असेही उद्गार काढले की, पंत निर्णय झाला. त्यानंतर मी दोन वेळा आमदार झालो.

सभापती महोदय,दिनांक 17 सप्टेंबर, 2004 साली दुर्देवाने मला शिवसेना सोडावी लागली. शिवसेना सोडताना माझे काय चुकले एवढे किमान विचारावे परंतु ती माहिती विचारण्याची संधी मला मिळाली नाही. नंतर माझा मंत्रिमंडळामध्ये समावेश झाला. बाळासाहेबांनी शेवटचा श्वास घेतल्याचे ज्यांनी जाहीर केले ते डॉ.परकार माझ्याकडे आले. त्या डॉक्टरांचे माझ्याकडे एक काम होते. बाळासाहेबांनी माझ्याकडे माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यामार्फत निरोप पाठविला होता. मी म्हटले की, साहेबांचे काम असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मी ते करेन. डॉ.परकार माझ्याकडे आले आणि अचानकपणे त्यांनी माननीय बाळासाहेबांशी संपर्क साधून दिला. त्यामुळे त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलण्याची संधी मिळाली. वास्तविक मी त्यांचा पक्ष सोडला होता. तिकिटासाठी मी पक्ष सोडलेला नाही. तिकीट कोणाला एकदा द्यावे, दोनदा, चार वेळा द्यावे हा अधिकार सर्वस्वी पक्ष प्रमुखाचाच असला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. तो पक्ष नेतृत्वाचा अधिकार असला पाहिजे. माझी लढाई राजकारणामध्ये तत्वाकरिता राहिलेली आहे. बाळासाहेबांनी मला मोठया मनाने दूरध्वनी केला आणि म्हणाले की, माझे एक काम कर. मी साहेबांच्या प्रकृती विषयी चौकशी केली. ते मला म्हणाले भास्कर, तुझ्यावर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

आमच्याकडून फार मोठा अन्याय झाला. तुझा माझ्या डोळयादेखत जो उत्कर्ष झालेला मी पाहतो आहे, मी तुला मनापासून आशीर्वाद देतो. तुझा याच्यापेक्षाही चांगला उत्कर्ष झाला पाहिजे. त्यांचा पक्ष मी सोडला होता, तरी देखील मनाचा एवढा मोठेपणा दाखविणारा माणूस आज आपल्यातून निघून गेला आहे.

महोदय,मी माननीय श्री.शरद पवार साहेब यांना बाळासाहेबांशी बोलण्याची झालेल्या कल्पना दिली. मला श्री. पवार साहेबांनी सांगितले की, बाळासाहेबांना ताबडतोब भेटा. परंतु कोकणामध्ये ते आले असताना माझी भेट त्यांच्याशी होऊ शकली नाही. 7 तारखेला मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना दूरध्वनी केला होता. श्री.सुभाष देसाई यांना मी दूरध्वनी केला होता. दसरा मेळाव्याच्या भाषणामध्ये बाळासाहेबांना धाप लागत असल्याचे मी अनुभवले होते. मला श्री.सुभाष देसाई यांनी स्वत: सांगितले होते की, बाळासाहेबांनी 20 तारखेची वेळ भेटीसाठी दिलेली आहे. बाळासाहेबांचे स्वीय सहाय्यक श्री.रवींद्र म्हात्रे यांनी देखील मला दूरध्वनी करुन 20 तारखेची वेळ निश्चित झाल्याचे कळविले होते. दुर्देवाने बाळासाहेबांची भेट काही होऊ शकली नाही. परंतु त्यांच्या एका दूरध्वनीमुळे मनावरचे प्रचंड ओझे उतरले गेले. या नेत्यासारखा सांब सदाशिव नेता दुसरा कोणी नाही. जात,पात,धर्म मानणारा हा नेता नव्हता. स्वत:च्या हयातभर त्यागी वृत्तीने वागणारा हा नेता होता. अशा या नेत्याला या ठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत असताना मी आपल्याला आणि सभागृहाच्या नेत्यांना मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती केली आणि अचानकपणे मी बोलायला उभा राहिलो.

त्याच बरोबर सर्वश्री विठ्ठलराव दिकोंडा, कन्हैयालाल गिडवानी व सदाशिवराव शिंदे या दिवंगत सदस्यांना आदरांजली अर्पण करतो आणि दोन शब्द संपवितो.

-----------

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख,माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर,वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे, त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. आपण आज 8 दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. त्यातील सहा व्यक्तींबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली.

सभापती महोदय, देशाचे माजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल हे पूर्वी केंद्रात परराष्ट्र मंत्री होते. इंद्रकुमार गुजराल हे 1997 ते 1998 या काळात देशाचे पंतप्रधान झाले. त्यावेळी लोकसभा सदस्य म्हणून त्यांचे समवेत काम करण्याची मला संधी मिळाली.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ D/ KTG/ पूर्वी श्री.गिते 13:40

श्री.पांडुरंग फुंडकर.....

माननीय इंद्रकुमार गुजराल यांचे व्यक्तिमत्व मी प्रत्यक्ष पाहिले. 1942 च्या चलेजाव आंदोलनापासून गांधीवादानुसार चालणारा नेता, अत्यंत संयमी, शांत, साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी या पध्दतीने जीवन जगणारा नेता त्या काळात त्यांच्या रुपाने आम्ही पाहिला. आपल्या पंतप्रधान पदाच्या कालखंडामध्ये त्यांनी अतिशय शांततेने आणि कोणताही अहंभाव मनात न बाळगता साधेपणाने ते पद भूषविले हे आम्ही पाहिले होते. मी त्यांच्या दु:खद निधनाबद्दल आदरांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, सरसेनापती बाळासाहेब ठाकरे हे या सभागृहाचे किंवा विधानसभेचे सदस्य नव्हते. लोकसभा किंवा राज्यसभेचे देखील सदस्य नव्हते. अशा या आगळ्यावेगळ्या नेत्याला आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. देशात कै.जयप्रकाश नारायण यांच्यानंतर सरसेनापती बाळासाहेब ठाकरे हे एक असे व्यक्तिमत्व आहे ज्या व्यक्तिमत्वाला कोणत्याही सार्वभौम सभागृहाचे सदस्य नसताना आपण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत. बाळासाहेब आपल्यातून 17 नोव्हेंबर, 2012 रोजी निघून गेले. त्यापूर्वीच्या 15 दिवसात शिवसेनेचा कार्यकर्ता असो, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असो, प्रत्येकाचा रक्तदाब कमी जास्त होत होता. याचे कारण असे की, शिवसेना-भारतीय जनता पक्ष गेली अनेक वर्षे एका कुटुंबाप्रमाणे मार्गक्रमणा करीत असल्यामुळे बाळासाहेबांनी वडिलधाऱ्याची भूमिका वठविली होती. बाळासाहेबांच्या निधनाने शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या युतीवरील वडिलधाऱ्याचे छत्र हरपले आहे. मराठी माणसांचा, हिंदुत्वाचा आधार गेला याचे दु:ख 17 नोव्हेंबरला जाणवले.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी 1989 मधील एका घटनेचा उल्लेख या ठिकाणी केला. ती घटना मला विसरता येणार नाही. 1989 मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. देशामध्ये हिंदुत्वाचे वातावरण निर्माण झालेले होते. अकोला मतदारसंघ कधीच शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या युतीने जिंकलेला नव्हता. स्वातंत्र्योत्तर काळापासून हा मतदारसंघ कॉंग्रेसच्या ताब्यात होता. निवडणूक जाहीर झाल्यानंतर हा मतदारसंघ शिवसेना पक्षाच्या वाट्याला गेला. त्या काळात मी त्या भागात माजी आमदार म्हणून काम करीत होतो. 1984 मध्ये अकोला मतदारसंघात लोकसभेची निवडणूक मी लढविली होती, त्या निवडणुकीमध्ये माझा पराभव झाला होता.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

1989 मध्ये निवडणूक जाहीर झाल्यानंतर स्व. प्रमोद महाजन यांनी सांगितले की, अकोला मतदारसंघाची निवडणूक भारतीय जनता पक्ष लढविणार नाही, शिवसेनेने या मतदारसंघाची निवडणूक लढवावी. त्यानुसार निवडणुकीकरिता शिवसेना पक्षाचे उमेदवार म्हणून श्री.गुलाबराव गावंडे यांचे नाव जाहीर झाले. या मतदारसंघाची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. अर्ज भरायला जात असताना राजकीय परिस्थिती बदलली होती. काही समीकरणे बदलली गेली. काँग्रेस पक्षाने श्री.अजहर हुसेन यांची उमेदवारी जाहीर केली होती. रिपब्लिकन पक्षातर्फे श्री.प्रकाश आंबेडकर हे त्या मतदारसंघाची निवडणूक लढविणार होते. या मतदारसंघात विजय मिळवायचा असेल तर श्री. गुलाबराव गावंडे यांच्याऐवजी श्री.पांडुरंग फुंडकर यांना उभे करा असा संदेश सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्यापर्यंत गेला. त्यांनी निरोप पाठवून मला मुंबईला बोलावून घेतले. माझ्या मनामध्ये खूप भीती निर्माण झाली होती. मी यापूर्वी कधीही बाळासाहेबांना भेटलो नव्हतो. मी मातोश्री बंगल्यावर गेलो. बाळासाहेबांनी मला जवळ बोलावून घेतले आणि सांगितले की, फुंडकर, अकोला मतदारसंघाची निवडणूक तुम्हाला लढवायची आहे. मी त्यांना कल्पना दिली की, प्रमोद महाजन यांनी हा मतदारसंघ शिवसेनेसाठी सोडला आहे असे आम्हाला कळविले आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

मी बाळासाहेबांना सांगितले की, ही जागा शिवसेनेला सोडण्यात आलेली आहे तसेच ही जागा जिंकून आणण्याची जबाबदारी मी तुमच्यावर टाकत आहे अशी माहिती प्रमोद महाजनांनी मला दिलेली आहे. त्यावेळेस बाळासाहेबांनी मला सांगितले की, प्रमोद महाजनांना मी सांगेन परंतु तुझा उमेदवारी अर्ज श्री. गुलाबरावांबरोबर डमी म्हणून भरला पाहिजे. बाळासाहेबांनी आदेश दिल्यामुळेच मी डमी अर्ज भरला होता. बाळासाहेबांनी नंतर प्रमोद महाजनांना सांगितले की, युतीमध्ये काही जरी ठरले असले तरी मी या जागेवर फुंडकरांना उभे राहावयास सांगितले आहे त्यामुळे तुमच्या पक्षाचा एबी फॉर्म फुंडकरांच्या नावाने द्या. बाळासाहेबांचा आदेश प्रमोद महाजनांना मान्य करावा लागला. त्यवेळेस मी निवडणूक लढलो. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा ही जागा शिवसेना-भाजपने जिंकली व ही जागा आजतागायत शिवसेना-भाजपकडेच आहे. यावरुन बाळासाहेब किती द्रष्टे होते हे दिसून येते. या मतदार संघातून मी 2-3 वेळेस जिंकलो आहे. मी विद्यार्थी दशेत असतांना मार्मिक साप्ताहिक वाचत असे. तेव्हा पासून बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव माझ्यावर होत आलेला आहे.

सभापती महोदय, बाळासाहेब जे काही बोलत होते ते तसेच करत असत. "बोले तैसा चाले तयाची वंदावी पाऊले" असा एक सुविचार आपल्याकडे आहे. 1995 मध्ये निवडणूक जाहीर झाली त्यावेळेस मी अकोला मतदार संघाचा खासदार होतो. त्यावेळेस विदर्भामध्ये बाळासाहेबांचा दौरा ठरला होता. त्यावेळेस बाळासाहेबांनी मला निरोप दिला की, फुंडकर, अकोला जिल्हयामध्ये माझी सभा आहे. परंतु ही सभा शहराच्या ठिकाणी घ्यायची नाही. त्यावेळेस बाळासाहेब ज्या ज्या जिल्हयात जात होते त्या त्या जिल्हयात बाळासाहेबांच्या सभा होत होत्या. त्यांनी सांगितले अकोल्यामध्ये सभा घ्यायची नाही तर ही सभा ग्रामीण भागात घ्यावयाची आहे. त्यामुळे आम्ही "चोहट्टा बाजार" या खेडयामध्ये बाळासाहेबांच्या सभेचे आयोजन केले होते. ग्रामीण भाग असतांनाही सभा फार मोठी झाली. सभेच्या ठिकाणापासून 5 कि.मी. अंतरावर गाडया पार्क करण्यासाठी जागा शिल्लक राहिली नव्हती. एवढी मोठी ती सभा "चोहट्टा बाजार" या खेडयामध्ये झाली होती. सभेच्या ठिकाणी मी बाळासाहेबांच्या बाजूलाच बसलो होतो. बाळासाहेबांनी मला विचारले की, या भागामध्ये कोणते पीक मोठया प्रमाणात घेतले जाते ? त्यावेळेस मी त्यांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

सांगितले की, या भागात मोठया प्रमाणात कापूस पिकवला जातो. या ठिकाणचा कापूस उत्पादक शेतकरी भंयकर अडचणीमध्ये आहे. त्यांनी मला विचारले की, आता कापसाला काय भाव दिला जातो ? त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, 1350 ते 1400 रुपये प्रती क्विंटल कापसाला भाव दिला जात आहे. आपले राज्य आले तर कापसाला काय भाव दिला पाहिजे असे त्यांनी विचारल्यानंतर मी त्यांना सांगितले की, साहेब आपण जो जाहीरनामा तयार केलेला आहे त्यामध्ये कापसाला 2100 रुपये भाव दिलेला आहे.

बाळासाहेबांनी भाषणाला सुरुवात करतांनाच सांगितले की, माझ्या शेतकरी बांधवानो, कापूस उत्पादक शेतकऱ्यांनो, भगव्याचे राज्य आले तर तुमच्या कापसाला 2100 रुपयाचा भाव दिला जाईल. हे वाक्य ऐकल्यानंतर प्रचंड टाळयांचा कडकडाट झाला. महाराष्ट्रामध्ये युतीचे राज्य आले. मी लोकसभेत काम करीत असलो तरी त्यावेळी पणन महासंघाची जबाबदारी माझ्यावर आली. बाळासाहेबांनी मला बोलावून सांगितले की, पणन महासंघाची जबाबदारी तुम्हाला सांभाळावीच लागेल. त्यावेळी माननीय रावते साहेबांकडे सहकार खाते होते. बाळासाहेबांनी माझ्यावर पणन महासंघाची जबाबदारी सोपविल्यानंतर आठ दिवसानी माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी कापसाचा भाव 1500 रुपये जाहीर केला. मी लागलीच मातोश्रीवर गेलो, बाळासाहेबांच्या पाया पडलो आणि सांगितले की, बाळासाहेब तुमचा शब्द जर खोटा होत असेल तर मी पणन महासंघाचे अध्यक्षपदी राहणार नाही. आपल्या शासनाने कापसाचा भाव 1500 रुपये जाहीर केलेला आहे. त्याच क्षणी बाळासाहेबांनी माननीय मुख्यमंत्र्यांना फोन लावून सांगितले की, मी महाराष्ट्राच्या जनतेला कापसाला 2100 रुपये भाव देण्याचा शब्द दिलेला आहे त्यामुळे कापसाला 2100 रुपयेच भाव दिला गेला पाहिजे आणि दुसऱ्याच क्षणाला कापसाला 2100 रुपये भाव जाहीर करण्यात आला व हा भाव पाच वर्षे राहिला. शेतकऱ्यांना कापसाचे पैसे रोखीने दिले पाहिजे असे मी बाळासाहेबांना सांगितले होते व त्यामुळे शेतकऱ्यांना रोखीने पैसे देण्याचे बाळासाहेबांनी आदेश दिले. त्यामुळे बोले तैसा चाले असे आपल्याला म्हणता येईल. आपण जे काही बोलतो त्या प्रमाणे आपण कृती केली पाहिजे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, त्यानंतर मी प्रदेश अध्यक्ष झालो, विरोधी पक्ष नेता झालो. मी अनेकदा श्री.बाळासाहेबांचे आशीर्वाद घ्यायला गेलो. वडिलांचा आशीर्वाद घ्यावा अशा प्रकारचे व्यक्तिमत्व मला त्यावेळी जाणवत होते. त्यांनी देखील तेवढेच प्रेम माझ्यावर केले. असा एक आधार, छत्र आमच्यातून निघून गेले आहे. खरे म्हणजे ही पोकळी कधीच भरून निघणार नाही.

. सभापती महोदय, मी अनेकांच्या अत्यंयात्रा पाहिल्या. पंतप्रधानांसह अनेक मोठमोठ्या व्यक्तिंच्या अत्यंयात्रा मी पाहिल्या. परंतु, एवढी मोठी अंत्ययात्रा मी आयुष्यात कधीच पाहिली नाही आणि भविष्यात ती पाहण्यास देखील मिळणार नाही. एवढी माणसे मुंबईच्या रस्त्यावर आली होती.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, श्री.बाळासाहेब जन्माला आले नसते तर शिवसेना जन्माला आली नसती, शिवसेना जन्माला आली नसती तर आपण येथे विरोधी पक्ष नेता म्हणून बसला नसता. हे खरे आहे. श्री.बाळासाहेब जन्माला आले नसते तर श्री.अण्णाभाऊ कराडे सारखा कोर्टात काम करणारा चपराशी आमदार झाला नसता. श्री.गुलाबराव गावंडे सारखा दुधाचा कॅन वाहणारा एक माणूस आमदार झाला नसता, मंत्री झाला नसता. दाळू गुरुजीसारखा एक शिक्षक आमदार म्हणून येथे येऊन बसला नसता. अशी असंख्य माणसे बाळासाहेबांनी उभी केली व स्वत: त्यागाची मूर्ती म्हणून जगले. असे व्यक्तिमत्व महाराष्ट्रात पुन्हा होणे नाही ही सूर्यप्रकाशा इतकी स्पष्ट गोष्ट आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे देखील नुकसान झाले आहे. होय, बाबरी मशिद आम्ही पाडली असे अभिमानाने ठणकावून सांगणारा वाघ देशात दुसरा कुठलाही जन्माला आलेला नाही. अशा अनेक गोष्टी येथे सांगता येतील. मी आपला अधिक वेळ घेणार नाही.

मी श्री.विलासराव देशमुख यांच्या बद्दल एक-दोन मिनिटे बोलणार आहे. माझा व श्री.विलासराव देशमुखांशी 1980 साली संबंध आला. 1980 साली मी व श्री.विलासराव देशमुख निवडून आलो होतो. श्री.गोपीनाथ मुंडे देखील निवडून आले होते. त्यावेळेपासून माझे श्री.विलासराव देशमुखांशी घनिष्ट संबंध होते. 1985 पर्यंत मी विधानसभेत काम केले. नंतर मी पार्लमेंटमध्ये गेलो. पार्लमेंटमधून पुन्हा विधान परिषदेमध्ये आलो. श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना माझ्यावर पक्षाने विरोधी पक्षाची जबाबदारी टाकली. तेव्हा श्री.विलासराव देशमुख यांनी मला चिठ्ठी पाठविली व माझे अभिनंदन केले. त्यांनी लिहिले होते की, मित्रा पुन्हा एकदा तू आणि मी या सभागृहात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

एकत्र आलो आहोत. आमचे अतिशय मैत्रीचे नाते होते. श्री.विलासराव देशमुख हे काँग्रेसचे सच्चे व कर्मठ कार्यकर्ते होते. माझा त्यांच्याशी व्यक्तिगत संबंध होताच. पण श्री.गोपीनाथ मुंडे यांच्याशी त्यांची अधिकची मैत्री होती. श्री.गोपीनाथ मुंडे आणि माझी मैत्री होती. त्यामुळे आम्हा तिघांच्या एकत्रित बैठका अनेक वेळा व्हायच्या.

काँग्रेसचा सच्चा कार्यकर्ता कुणाला म्हणायचे याचे एक उदाहरण मी आपल्याला देतो. मी विरोधी पक्ष नेता असताना सभागृहात सावकारी प्रकरणे उपस्थित केली. त्यावेळी सभापती महोदय, आपण देखील येथे होता. तेव्हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर सुरू होत्या. सावकारीमुळे या आत्महत्या होत होत्या. तो विषय देखील आम्ही सभागृहात मांडला होता. अशाच एका सावकारावर 40 केसेस झाल्या. त्या सावकारावर पोलिसांनी मला विचारल्या शिवाय कारवाई करू नये अशा प्रकारचा एक फोन माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या कार्यालयातून तेथील पोलीस ठाण्याला गेला. तो फोन श्री.विलासराव देशमुख यांनी केला नव्हता. तो फोन त्यांच्या पी.ए.ने केला होता. अमुक अमुक सावकारावर आम्हाला विचारल्याशिवाय केसेस दाखल करण्यात येऊ नयेत, याची नोंद तेथील पोलीस अधिकाऱ्याने पोलीस डायरीमध्ये करून ठेवली होती. श्री.विलासराव देशमुख यांच्या कार्यालयातून असा असा फोन आला होता. हा विषय अनेकदा आम्ही सभागृहामध्ये मांडला. पक्षाचा एक कार्यकर्ता आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभा राहतो आहे, त्याला वाचविले पाहिजे म्हणून श्री.विलासराव देशमुख हे त्याच्या पाठीमागे उभे राहिले. ते पक्षनिष्ठेसाठी उभे राहिले, मित्रत्वासाठी उभे राहिले.

आम्हाला विधान मंडळामध्ये न्याय मिळत नाही असे लक्षात आले त्यावेळी मग आम्ही उच्च न्यायालयात गेलो, सर्वोच्च न्यायालयात गेलो. सर्वोच्च न्यायालयाने स्ट्रिक्चर पास केल्यानंतर देखील माझ्यामध्ये आणि श्री.विलासराव देशमुख यांच्यामध्ये कटुता आली नाही. त्यांनी सांगितले की, श्री.फुंडकर तुमचे आणि माझे व्यक्तिगत संबंध आहेत. परंतु, मला पक्षासाठी, पक्षनिष्ठेसाठी माझ्या पक्षाच्या कार्यकर्त्याच्या पाठीमागे उभे रहावे लागले हे त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले. ते जाण्याच्या तीन महिन्यापूर्वी मी श्री.मुंडे साहेबां सोबत दिल्लीला गेलो होतो. त्यावेळी आम्ही त्यांच्या घरी गेलो. तेव्हा मला त्यांची तब्येत ठीक वाटली नाही. त्यावेळी मी त्यांना विचारले की, विलासराव आपली तब्येत कशी आहे ? तेव्हा ते म्हणाले की, माझी तब्येत चांगली आहे. तब्येतीची काहीही काळजी नाही. मी सध्या फीट आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

श्री.विलासराव देशमुख हे एक दिलखुलास व्यक्तिमत्व होते. एक दिलखुलास चर्चा करणारे व्यक्तिमत्व, दिलदार माणूस, सच्चा व निष्ठावान कार्यकर्ता अशी अनेक विशेषणे त्यांना लावता येतील. अशा कार्यकर्त्याच्या जाण्याने महाराष्ट्रात आणि पक्षात एक पोकळी निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राला एक दिशा देणारा नेता आपल्यातून निघून गेलेला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री.शंकरराव जगताप यांच्याबद्दल बोलावयाचे झाल्यास ते विधानसभेचे उपाध्यक्ष असताना त्यांचा मला सहवास लाभला. ते पाच वेळा विधानसभेवर निवडून आले होते. ते काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. अशा ज्येष्ठ गांधीवादी, अभ्यासू, विचारवंत, उत्तम प्रशासक व ज्येष्ठ समाजसेवकाचे दिनांक 25 ऑगस्ट 2012 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

श्री.कन्हैयालाल गिडवानी आमच्या बाजूला बसत होते. श्री.गिडवाणी यांनी भारतीय अन्न विकास महामंळाचे सदस्य, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे संचालक तसेच महानगर टेलिफोन निगमचे सल्लागार सदस्य म्हणून कार्य केले होते. अशा या समाजसेवकाचे दिनांक 27 नोव्हेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झाले. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि सभागृहाच्या नेत्यांनी मांडलेल्या या शोक प्रस्तावाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी आठ दिवंगत व्यक्तीचा शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आज या सदनात ज्या व्यक्तींचे शोक प्रस्ताव आले आहेत त्या प्रत्येक व्यक्तीने मागील 30-40 वर्षात महाराष्ट्रात तसेच देशात आपला ठसा उमटविलेला आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही.

सभापती महोदय, श्री.इंद्रकुमार गुजराल यांच्याशी कधी व्यक्तीगत संबंध आला नाही. परंतु मी त्यांच्याबद्दल जे ऐकले वा वाचले आहे त्यावरुन त्या एक महान व्यक्ती होत्या असे मला वाटते. श्री.इंद्रकुमार गुजराल हे परराष्ट्र मंत्री होते. देशाचे परराष्ट्र विषयक धोरण आखले गेले त्यावेळी ते रशियामध्ये भारताचे राजदूत म्हणून काम करीत होते. रशियाचे विघटन झाले त्यावेळी जे धोरण आखले गेले त्यामध्ये परराष्ट्र नितीमध्ये श्री.इंद्रकुमार गुजराल यांचा मोठा वाटा होता हे आपणास विसरता येणार नाही.

सभापती महोदय, मागील तीन-चार महिन्यामध्ये महाराष्ट्राने दोन मोठे जनमहासागर पाहिले आणि हे दोन्ही जनसागर अत्यंयात्रेच्या निमित्ताने उसळावे यासारखे दुर्दैव नाही. त्यापैकी एक जनसागर लातूरमध्ये उसळला होता. राज्याचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री आणि आमचे नेते आणि मित्र श्री.विलासराव देशमुख यांच्या अत्यंविधीस तो जनसागर उसळला होता.

सभापती महोदय, युवक काँग्रेसमध्ये श्री.विलासराव देशमुख, तत्कालीन सदस्य श्री.उल्हासदादा पवार आणि मी काम केलेले आहे. त्यावेळी आम्हाला श्री.विलासराव देशमुख यांच्या स्वभावाचे वैशिष्टये समजली. ते नेहमी कोट्या करुन सर्वांना हसवावयाचे. श्री.विलासरावांचा प्रवास हा युवक काँग्रेस, लातूर पंचायत समितीचे उपसभापती, आमदार, विविध खात्यांचे मंत्री, मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असा झाला. नेतृत्वाच्या प्रती अत्यंत कडवट निष्ठा असणारे असे ते व्यक्तिमत्व होते. नेहरु आणि गांधी घराण्याशी त्यांची असलेली निष्ठा आम्ही जवळून पाहिलेली आहे. विलासरावांनी अंतर्गत संघर्ष् केल्याची अनेक उदाहरणे आम्ही पाहिलेली आहेत.

श्री.विलासराव देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री पद स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम त्यांनी राज्याला एक दिशा देण्याचे काम केले. राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

केली आणि त्यादृष्टीने निर्णय घेतले. राज्य प्रगतीपथावर असले पाहिजे याचाच ते सतत विचार करायचे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावे आणि ते ही त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला साजेसे असावे आणि ते स्मारक अरबी समुद्रात व्हावे यासाठी श्री.विलासराव देशमुख यांनी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याप्रमाणे आखणी करण्याचे काम केले हे आपणास विसरता येणार नाही.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक निर्णय घेतले. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे जवळपास 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांचा पाच एकर आणि पंधरा एकराचा विषय निघाला,

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/ KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:00

श्री.जयप्रकाश छाजेड . . . .

तेव्हा राज्याच्या निधीतून विदर्भातील शेतकऱ्यांना आणि कोरडवाहू शेतकऱ्यांची कर्ज माफ करण्याचा क्रांतिकारी निर्णय आदरणीय विलासराव देशमुख यांनी घेतला हे विसरता येणार नाही. शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या मनामध्ये सतत चिंता होती. म्हणून त्यांना कमी व्याजामध्ये कर्ज मिळाले पाहिजे. जर 4 टक्क्याचे असणारे अंतिम कर्ज शेतकऱ्याने वेळेवर फेडले तर त्याला राज्य शासनाने 2 टक्क्याचा रिबेट द्यावा असा ऐतिहासिक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना सावकाराच्या जाचातून मुक्त करण्याच्या बाबतीत कै.विलासराव देशमुख यांनी क्रांतिकारी प्रयत्न केला हे आपल्याला विसरता येणार नाही.

सभापती महोदय, कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीच्या कार्यक्रमासाठी आम्ही सगळेजण तेथे गेलो होतो. त्यावेळी तेथे अशी मागणी करण्यात आली की, ओबीसी समाजातील मुलांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. मग तेथेच माननीय मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री म्हणून घोषणा व जवळपास 76 कोटी रुपयांची शिष्यवृत्ती ओबीसी समाजाला देण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि ती परंपरा पुढे चालत असल्याचे पहात आहोत. सामाजिक न्याय विभागामार्फत प्रत्येक राज्यामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये लोकांना सामाजिक न्यायाच्या बाबतीत विश्वास देणारे सामाजिक न्याय भवन उभारले पाहिजे. याचा पाया देखील आदरणीय कै.विलासराव देशमुख यांनी घातला होता. त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या काळामध्ये आपल्या राज्यामध्ये प्रथमच स्वतंत्र अल्पसंख्याक विभाग निर्माण केला. त्यासाठी स्वतंत्र मंत्रालय, स्वतंत्र खाते आणि स्वतंत्र मंत्री अशी रचना करण्यात आली.

सभापती महोदय, एमएमआरडीए मार्फत मुंबईचे शांघाय करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले की ज्याची यापूर्वी आपण कल्पनाही केली नव्हती. परंतु मुंबईमध्ये जशी रेल्वे आहे त्याप्रमाणे आता मोनो रेल, मेट्रो रेल आणि वाहतुकीसाठी विविध पूल या माध्यमातून मुंबईचा विकास केल्याशिवाय, आर्थिक राजधानीचा दर्जा वाढविल्याशिवाय, एक आंतरराष्ट्रीय शहर केल्याशिवाय येथील विकास होणार नाही आणि परदेशातील इन्व्हेस्टमेंट डायरेक्ट आपल्या राज्यामध्ये येणार नाही, यासाठी करावे लागणारे प्रत्येक काम त्यांनी राज्याचे माननीय मुख्यमंत्री असताना त्यांनी केलेले आहे. तसेच त्यांनी पक्ष संघटनेमध्ये युवक काँग्रेसपासून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यापर्यंत काम केले आहे. तसेच नवीन येणाऱ्या माणसाला विश्वास देऊन त्यांनी त्यांच्याकडे नेतृत्व देखील

. . . .2 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड . . . .

दिलेले आहे. त्यामुळे आज माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांच्या बाबतीत धाडसी निर्णय घेतला की, या राज्यामध्ये काँग्रेस पक्षाला पुढे न्यावयाचे असेल तर तरुण अध्यक्ष असले पाहिजेत आणि त्यांनी आम्हाला सर्वांना सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे आपल्या पक्षाचे अध्यक्ष असतील आणि आजही माननीय श्री.माणिकराव ठाकरे हे पक्षाचे अध्यक्ष आहेत आणि हे पक्षाचे धोरण आहे. आज देखील माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आपण पहात आहोत की, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात काँग्रेस पक्षाची वाढ होत आहे. मात्र याबाबत माननीय कै.विलासराव देशमुख यांनी त्या काळामध्ये निर्णय घेतलेला आहे हे आपल्याला विसरता येणार नाही. त्यांची पक्षाच्या नेतृत्वावर निष्ठा होती.तसेच श्रीमती सोनिया गांधी, कै.राजीव गांधी यांच्यावर त्यांचा विश्वास आणि प्रेम होते. परंतु दुर्दैवाने ते आपल्यातून निघून गेले.

सभापती महोदय, आदरणीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत सांगावयाचे तर गेल्या 40 वर्षाच्या काळात अनेक माणसे राजकारणामध्ये आली, तसेच तरुण वर्ग देखील राजकारणामध्ये आला आहे. मी पहिल्यापासून कॉंग्रेस पक्षामध्ये असलो तरी मनामध्ये एक कप्पा असा होता की, जे आम्ही बोलू शकत नाही ते माननीय कै.बाळासाहेब ठाकरे बोलतात म्हणून आनंद वाटत असे. आम्हाला त्यांच्याविषयी नेहमी आदरच वाटला आहे. 1980 मध्ये इंदिरा गांधी यांच्या आणीबाणीच्या निर्णयाला त्यांनी पाठिंबा दिला आणि 1980 च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसला शिवसेनेने पाठिंबा दिल्याचे मला आठवते.मी नाशिक शहरामध्ये काँग्रेस पक्षातर्फे उमेदवार होतो.त्यावेळी श्री.बाळासाहेब ठाकरे नाशिक येथे आल्यानंतर मी त्यांना भेटावयास गेलो आणि त्यांना सांगितले की, आपण माझ्या सभेला यावे. त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय किडकिडीत होते. मात्र ते करारी पध्दतीने बसले होते. त्यांनी मला माझे नाव,गाव सर्व काही विचारले. त्यानंतर ते एवढेच बोलले की, मी तुझ्या सभेसाठीच आलो आहे. पण मी आजारी असल्याने सभा घेऊ शकणार नाही.

सभापती महोदय, मला माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे एका गोष्टीबद्दल कौतुक वाटले.नाशिक येथील दलित समाजातील, चर्मकार समाजातील शाहिरी पोवाडे गाणाऱ्या एका कार्यकर्त्याला शिवसेनेमध्ये घेऊन त्याला या राज्याचा कॅबिनेट मंत्री केले.जेव्हा-जेव्हा कोणी त्यांच्या विरुध्द बोलले तेव्हा त्यांनी त्यांचे समर्थन केले आणि हे अनाकलनीय आहे.म्हणूनच मुंबईला त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी एवढा मोठा जनसागर उसळला होता.आणीबाणीच्या काळामध्ये काँग्रेसच्या

2 के-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड . . . .

अनेक घराण्यातील तरुण मुले ही श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या आकर्षणामुळे शिवसेनेमध्ये गेली. तसेच त्यानंतर शिवसेनेचे आमदार म्हणून निवडून आल्याचे देखील या राज्याने पाहिलेले आहे हे देखील विसरता येणार नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

सभापती महोदय, विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर आणि श्री. शंकरराव जगताप या दोघांशीही माझा पक्षाच्या कार्यक्रमामध्ये संबंध आला. दोघांचेही व्यक्तिमत्व मोठे होते. पण श्री. दिकोंडा हे व्यक्तिमत्व फार कमी लोकांना माहीत आहे. त्यांचे आणि माझे कौटुंबिक संबंध होते. ते माझ्या वडिलांचे मित्र होते. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या वेळेला पक्ष अडचणीत असताना त्यांच्या पाठीमागे उभे राहणारे ते एक व्यक्तिमत्व होते. म्हणूनच श्रीमती इंदिराजी गांधी यांनी श्री. दिकोंडा यांना विधान परिषदेमध्ये पाठविले. ही सर्व मोठी माणसे आपल्यातून निघून गेलेली आहेत. श्री. विलासराव देशमुख यांना या सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहण्याची वेळ येईल असे मला आयुष्यामध्ये कधी वाटले नाही. कारण माझा या सभागृहामध्ये जो प्रवेश झाला तो श्री. विलासराव देशमुख यांच्यामुळे झालेला आहे, हे मला या ठिकाणी नमूद केले पाहिजे. या सर्व दिवंगतांना मी माझ्या वतीने आणि पक्षाच्या वतीने आदरांजली अर्पण करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय अजितदादा पवार यांनी या ठिकाणी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या अनुषंगाने भारताचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल, आदरणीय श्री. विलासरावजी देशमुख, विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर, श्री. शंकरराव जगताप त्याचबरोबर शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे, श्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, श्री. कन्हैयालाल गिडवाणी व श्री. सदाशिवराव शिंदे या सर्व नेत्यांना आदरांजली वाहण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, श्री. आय.के.गुजराल यांच्या बाबतीत माझ्या सारख्या कार्यकर्त्याला कधी संधी मिळाली नाही परंतु माझ्या राजकीय जीवनामध्ये मी जी काही नेतृत्वे आणि जी काही राजकीय व्यक्तिमत्वे शिकण्याचा किंवा समजण्याचा प्रयत्न केला त्यातील श्री. आय.के.गुजराल यांचा पंतप्रधान पदाचा कालावधी जरी कमी असला तरी त्यांची खरी कारकीर्द ते देशाचे परराष्ट्र मंत्री असताना गाजली. एक अभ्यासक म्हणून मी ज्यावेळी त्यांच्या सगळ्या कारकिर्दीकडे पाहिले त्यावेळेला एक उच्च विद्याविभूषित, मितभाषी नेतृत्व देशासाठी काय करु शकते याचे एक मूर्तिमंत उदाहरण आपल्याला 1996-97 च्या काळामध्ये बघावयास मिळाले.

सभापती महोदय, श्री. विलासरावजी देशमुख हे एक मूर्तिमंत अष्टपैलू आणि चौफेर असे व्यक्तिमत्व होते. राजकारणाच्या बाहेर राहून स्वत:चे एक वेगळे अस्तित्व तयार करणारे जे लोकनेते आहेत त्यामध्ये विलासरावांचे नाव हे वरच्या स्थानावर येते, ही माझी स्वत:ची समजूत आहे. माझ्या राजकीय कारकिर्दीमध्ये मला जास्तीत जास्त सहवास हा विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाचा मिळाला. काँग्रेस एकत्र असताना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची निर्मिती झाल्यानंतर सुध्दा मला त्यांचा सहवास मिळाला. ते मुख्यमंत्री असताना कष्टकरी जनतेवर त्यांनी उपकारच केले असे म्हणावे लागेल. त्याची माहिती फार कमी लोकांना असेल. मी मुद्दाम या ठिकाणी सांगतो. त्यांच्या अनेक गुणांच्या बाबतीत आमच्या अनेक सहकाऱ्यांनी उल्लेख केला. आपल्या देशामध्ये महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की, ज्या ठिकाणी एमआरटीयू ॲक्ट आहे, युनियनच्या मान्यतेचा कायदा आहे आणि तो कायदा फक्त आणि फक्त विलासरावांमुळेच टिकून राहिला हे मला मुद्दाम या ठिकाणी सांगावेसे वाटते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप ....

मी विधानसभेत असताना काही उद्योगपतींनी विशेषत: फार्मास्युटिकल इंडिस्ट्रिजच्या काही उद्योगपतींनी एक पळवाट शोधून काढली. हे जाणून घेणे आवश्यक आहे कारण ही गोष्ट फार कमी लोकांना माहीत आहे. त्यांनी एक पळवाट शोधून काढली आणि असा प्रस्ताव आणला की, आमच्या फॅक्टरीज महाराष्ट्रात नाहीत, आमची हेड ऑफीसेस मुंबईत किंवा महाराष्ट्रात आहेत त्यामुळे आम्हाला यातून वगळण्यात यावे. असा प्रस्ताव आला आणि त्यावर शिक्कामोर्तब होण्याची पाळी आली. त्यावेळी जे कामगार मंत्री होते त्यांचे मी नाव घेत नाही. कारण तो आजचा विषय नाही. मी त्यांना भेटून सांगितले की, आपण स्वत: कामगार क्षेत्रामध्ये काम केले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

कामगारांच्या बाबतीत हे अतिशय वाईट घडणार आहे. ते मला म्हणाले की, आपण मुख्यमंत्र्यांना भेटू. त्यावेळी विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते. आम्ही त्यांना भेटलो. त्यांनी विचारले, काय अडचण आहे, तू सारखा भांडत असतोस. मी त्यांना सांगितले की, ही एक पळवाट आहे. पुढील अधिवेशनामध्ये हा एमआरटीयू ॲक्ट महाराष्ट्रातून काढून टाका असा प्रस्ताव येईल. त्यांनी सांगितले की, प्रस्ताव अडगळीत टाका. आजही तो प्रस्ताव अडगळीत आहे. आज देशामध्ये कोठेही एमआरटीयू ॲक्ट नाही, तो फक्त महाराष्ट्रामध्ये आहे. विलासराव देशमुख यांच्या सारख्या लोकनेत्याच्या सावलीखाली माझ्या सारख्या कार्यकर्त्याने खूप काही शिकण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, मी प्रत्येक वर्षी 1 मे रोजी कामगारांचा मेळावा मोठ्या मैदानावर घेत असतो. गेल्या 24 वर्षापासून हा मेळावा मी घेत आलो आहे. जेव्हा मी या कामगार मेळाव्यास सुरुवात केली त्यावेळी युती शासन होते. मी त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्रयांना पत्र दिले होते. परंतु अनेक कारणांमुळे ते येऊ शकले नाहीत. श्री. गोपीनाथ मुंडे साहेब हे त्यावेळी राज्याचे उप मुख्यमंत्री होते. ते त्या कार्यक्रमाला आले होते. त्यानंतर काँग्रेसचे सरकार आले. विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी 8 वर्षे मुख्यमंत्री म्हणून कामगार मेळाव्याला न चुकता हजेरी लावली. ही हजेरी लावण्याचे कारण मी नव्हतो. पण आंतरराष्ट्रीय कामगार दिन साजरा करीत असताना राज्याच्या प्रमुखांनी कष्टक-यांप्रती दाखविलेली संवेदना महत्वाची आहे. आजही ती परंपरा चालू आहे. विलासराव देशमुख यांच्या बद्दल अनेक गोष्टी आणि आठवणी सांगता येतील.

सभापती महोदय, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, नागपूर अशी जी म्हाडाची बोर्डस् आहेत त्या बोर्डाच्या अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा नव्हता. मला आठवते, मी दापोली मधून एक निवडणूक लढलो होतो. ती निवडणूक मी हरलो. त्यानंतर विलासरावांनी मला बोलावून सांगितले की "मी तुझ्याकडे म्हाडाच्या कोकण विभागाची जबाबदारी सोपवित असून तुझा दर्जा हा राज्यमंत्री पदाचा असेल." मला त्यावेळी कोणतीही कल्पना नव्हती. तेव्हा पासून म्हाडाच्या विभागनिहाय बोर्डाना राज्यमंत्री पदाचा दर्जा मिळालेला आहे.

मी त्यांना भेटण्यासाठी चेन्नईच्या हॉस्पिटलमध्ये गेलो. विलासरावांचे सर्व कुटुंबीय त्यांच्या सोबत होते. कोणालाही भेटण्यासाठी जाण्यास परवानगी मिळत नव्हती. ज्या लोकनेत्याच्या सावलीखाली मी वाढलो त्यांना भेटण्यासाठी माझा जीव तगमगत होता. विलासराव हे एक चालती बोलती युनिव्हर्सिटी होती. त्यांचे दर्शन होत नव्हते. मी रितेश जवळ हे बोललो. त्याने माझ्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

खांद्यावर हात ठेवून मला त्यांच्या कक्षाच्या बाहेर नेऊन सांगितले, "हे आपले साहेब". मला खरोखर अजूनही त्या दिवसाचा विसर पडत नाही. त्यांची तब्येत सुधारत आहे असे त्या दिवशी बुलेटीने आले होते. परंतु नंतर पुन्हा त्यांची तब्येत बिघडू लागली आणि त्यानंतर आज या ठिकाणी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याची पाळी आपणावर आलेली आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल अनेक नेत्यांनी, वक्त्यांनी, कार्यकर्त्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी दूरचित्रवाहिनीवरुन त्यांच्या बद्दलची एक गोष्ट सांगितली आणि आजही ती मला सांगाविशी वाटते. शिवसेना आणि आमचा कामगार विभाग यांच्यामध्ये काही तात्विक मुद्यावर लढाई लढत असताना टोकाचा संघर्ष झाला होता. मला बाळासाहेबांच्या जवळ जाण्याची संधी तशी कधी येणार नव्हती. दुर्दैवाने ते आजारी पडले. ते जेव्हा जेव्हा हॉस्पिटलमध्ये होते त्या त्या वेळी मी त्यांना आवर्जून भेटायला जात असे. मला मुद्दाम एक प्रसंग या ठिकाणी सांगावासा वाटतो.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

डॉ.मांडके यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे यांची बायपास केली होती त्यानंतरची ही गोष्ट आहे. त्यांची बायपास झाल्यानंतर चार ते पाच दिवसानंतर मी त्यांना भेटावयास गेलो. नेते मंडळी सोडली तर त्यांना कोणालाही भेटू देत नव्हते. मी त्यांना भेटलो, तशा अवस्थेतही ते हसत हसत मला म्हणाले मला तू खूप त्रास देतोस. मी त्यावेळी त्यांना सांगितले की, मी तुम्हाला त्रास देऊ शकेन एवढी बाळासाहेब माझी अवकातच नाही. त्यांनी दुसऱ्याच क्षणी मला सांगितले की, तू तुझे काम करीत रहा. तुझ्यामध्ये एक वेगळया प्रकारचा स्पार्क आहे. त्यावेळचे त्यांचे बोलणे म्हणजे मी एक आशीर्वादच समजतो. या महाराष्ट्राने, देशाने किंबहुना या जगाने अशी अंत्ययात्रा कधीही पाहिली नसेल अशी त्यांची अत्यंयात्रा होती. त्या अंत्ययात्रेत सर्व शिवसैनिकच होते असे समजण्याचे कारण नाही. ज्यांनी ज्यांनी नुसते बाळासाहेबांचे नाव ऐकले असेल, ज्यांनी ज्यांनी बाळासाहेबांचे नुसते लेख वाचले असतील, ज्यांनी ज्यांनी बाळासाहेबांचे फोटो पाहिले असतील अशी राज्यातील, देशातील माणसे त्यांच्या अत्यंयात्रेस होती, हेच त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होते असे मला वाटते.

सभापती महोदय, श्री.बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधानसभा यांचे देखील दु:खद निधन झालेले आहे, त्यांच्या बाबतीत मला आवर्जून या ठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. मी विधानसभा सदस्य म्हणून प्रथमच निवडून आलो. माझे प्रथम अधिवेशन नागपूर येथे होते व त्या अधिवेशनास मी उपस्थित होतो. मी पूर्वी विधान परिषद सदस्य म्हणून काम करीत होतो. विधानसभा सभागृहातील माझा पहिलाच दिवस होता, त्यामुळे तेथील कामकाज कसे चालते याची मला माहिती नव्हती.

महोयद,सभागृहात पहिल्या दिवशी दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करुन सभागृहाचे कामकाज तहकूब करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी सभागृहात बसलो, सभागृहात गोंधळ सुरु झाला. सभागृहात श्री. नारायण राणे सारखे दिग्गज नेते होते. त्यांनी त्यांच्या पध्दतीने सभागृहात गोंधळ सुरु केला. त्या गोंधळाच्या परिस्थितीत काय करावयाचे ते आम्हाला समजत नव्हते. समोर माननीय विलासराव देशमुख बसले होते. त्यांनी वळून मागे पाहिले. आम्ही मंडळी सभागृहातील वेलपर्यंत गेलो आणि तेथे थांबलो. गोंधळाची परिस्थिती शांत होण्यासाठी नेहमी प्रमाणे गटनेत्यांच्या बैठका झाल्या, त्यानंतर 15 ते 20 मिनिटांनी सभागृहाच्या नियमित कामकाजास सुरुवात झाली.

2...

श्री.भाई जगताप....

त्यावेळी सभागृहासमोर "मुंबई आणि मुंबईचे प्रश्न" हा विषय चर्चेला होता. या संदर्भात मी माननीय श्री.नारायण राणे यांचे भाषण ऐकले. त्यानंतर माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांचे भाषण ऐकले, काही अपक्ष सदस्यांची भाषणे ऐकली. मला त्या चर्चेसाठी फक्त पाच मिनिटांची वेळ मिळाली. त्या पाच मिनिटांच्या वेळेत मी झोपडपट्टी आणि कष्टकरी यांच्या बाबतीत बरेच मुद्दे मांडले व ठरवून दिलेल्या वेळेत खाली बसलो. त्यानंतर मला पीठासीन अधिकाऱ्यांकडून किप इट अप. अशी एक चिठ्ठी आली. तत्कालीन पीठासीन अधिकारी श्री.बाबासाहेब कुपेकर यांनी मला सांगितले की, या विषयावरील चर्चा संपल्यानंतर तुम्ही मला येऊन भेटा. मी त्यांना जाऊन भेटलो. तुम्हाला विषय कळतो, तुम्हाला विषयाचे ज्ञान आहे, परंतु भावना व्यक्त करण्याची पध्दत तुम्हाला अजूनही बदलता येईल असे त्यांनी मला सांगितले व काही कानमंत्र सुध्दा मला दिले. त्यांच्याकडून कानमंत्र मिळाल्यानंतर मी सभागृहात अनेक चर्चांमध्ये भाग घेतला. त्यांनी जे कानमंत्र दिले होते, त्या कानमंत्रांचा वापर सभागृहाचे कामकाज करताना निश्चितपणे होतो आहे. अशा कानमंत्र देणाऱ्या दिग्गज व्यक्ती आपल्यातून निघून गेलेल्या आहेत. मी माझ्या कुटुंबातर्फे, माझ्या पक्षातर्फे सर्व दिवंगत नेत्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष,विधानसभा, शंकरराव जगताप,माजी अध्यक्ष,विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा,कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिव शिंदे, माजी वि.व.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

या शोक प्रस्तावाच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या कामकाजाविषयी, त्यांच्या अनुभवाविषयी मते मांडली आहेत. देवाचे, आई-वडिलांचे, पक्षाच्या प्रमुखांचे आशीर्वाद असल्याशिवाय कोणीही व्यक्ती या सभागृहात सदस्य म्हणून येऊ शकत नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर........

आपणा सर्वांनाच त्यांचे आशीर्वाद असल्याशिवाय आपण या सदनामध्ये आलेलो नाही, सदस्य झालेलो नाही. या दोन्ही दिग्गजांविषयी दोन्ही सदनातील बाजूकडून जी स्तुतीसुमने उधळली गेली त्यांचे नुसतेच आशीर्वाद नव्हे तर ते खरोखर दैवीपुरुष होते. आम्हाला त्यांचे आशीर्वाद लाभले म्हणूनच आम्ही या सदनामध्ये आलो. ते दैवीपुरुष होते म्हणून एवढा वेळ मान्यवरांनी त्यांच्याविषयीचे आपले अनुभव मांडले.

सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख यांच्याविषयी मी एवढेच सांगेन की, महाराष्ट्र एका चांगल्या रसिक, उमद्या, हसतमुख आणि संवेदनशील नेत्याला मुकला आहे. त्यांचे लोभस आणि देखणे व्यक्तिमत्व, प्रसन्न चेहेरा हेच महाराष्ट्राचे खरे व्यक्तिमत्व आहे. व्यक्ती तेवढ्या वल्ली या उक्तीप्रमाणे काही लोकांचे व्यक्तिमत्व असे असते की, त्यांच्याकडून काम झाले नाही तरी चालेल परंतु त्या व्यक्तीला भेटले, त्याच्याशी हस्तांदोलन केले तरी आनंद वाटतो. त्यातील हे एक व्यक्तिमत्व. सामान्यातील असामान्य अशी त्यांची ख्याती होती. एक लोकविलक्षण माणूस, दिलखुलास आणि अष्टपैलू असे व्यक्तिमत्व होते. मुख्यमंत्री पदाच्या काळात मुंबईचा मेकओव्हर करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मेट्रो, मोनोरेल असे महत्वाकांक्षी प्रकल्प एमएमआरडीएच्या माध्यमातून राबविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मुख्यमंत्री पदाच्या काळात त्यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेतले. त्यातील एक महत्वाचा निर्णय म्हणजे माहितीचा अधिकार कायदा हा आहे.

सभापती महोदय, मी एक घटना या ठिकाणी मुद्दाम सांगू इच्छितो. 2008 साली मी विधानपरिषदेची पहिली निवडणूक लढविली होती. शिवसेना पक्षात असताना त्या पक्षाची सदस्य संख्या 17 होती आणि निवडून येण्यासाठी 29 मतांची गरज होती. ती निवडणूक जिंकल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी 8.00 वाजता मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी मला फोन केला आणि किरणजी मी तुमचे अभिनंदन करतो असे ते म्हणाले. मी त्यांना विचारले, तुम्ही माझे अभिनंदन का करीत आहात? आपल्या पक्षाचे उमेदवार श्री.सुधाकर गणगणे हे निवडणूक हरले. मी काय करावे? ते म्हणाले, असे काही वाटायची गरज नाही. पक्षाने त्यांना तिकीट देण्याचे काम केले. ते निवडून आले असते तर आनंद वाटला असता. तुम्हाला संधी मिळाली. तुम्ही कामाला सुरुवात करा. त्यांचे दोन्ही चिरंजीव श्री.अमित आणि श्री.रितेश यांच्याशी माझे मैत्रीचे संबंध असल्यामुळे अनेकदा त्यांच्या घरी जाण्याचा मला योग आला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:20

श्री.किरण पावसकर........

सभापती महोदय, 2011 साली दुसऱ्यांदा मी विधानपरिषदेची निवडणूक लढविली. शिवसेना पक्षाकडील सदस्यत्वाचा राजीनामा देऊन पुन्हा राष्ट्रवादी पक्षाकडून निवडणूक लढविली. निवडणुकीनंतर मी दिल्लीला माननीय श्री.शरद पवार यांची भेट घेण्यासाठी गेलो. लोकसभेचे कामकाज सुरु होते त्यामुळे ठरलेल्या वेळेला श्री.शरद पवार यांची भेट झाल्यानंतर श्री.विलासराव देशमुख यांना फोन केला. ते म्हणाले दुपारी 12.30 वाजता बंगल्यावर या. सभागृहातून घरी आले. त्यावेळी मी काँग्रेस पक्षाचा सदस्य नव्हतो. परंतु घरी आल्यानंतर त्यांची भेट झाली आणि त्यांनी जे काही सांगितले ते या ठिकाणी सांगण्याची ही वेळ नाही. व्यक्तिमत्व कसे असावे? राजकारणाच्या पलीकडे जाऊन समोरची व्यक्ती कोणत्या पक्षातील आहे हे न पाहता संबंध जोपासणारे हे व्यक्तिमत्व आहे. म्हणून मी म्हणालो की, ही दोन्ही व्यक्तिमत्वे दैवीपुरुष आहेत. अन्यथा त्यांच्याविषयी प्रत्येक वक्ता स्तुतीसुमने उधळणार नाही.

सभापती महोदय, दुसरे व्यक्तिमत्व शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे होते. खरे म्हणाल तर शिवसेनाप्रमुखांच्या नावापूर्वी स्वर्गीय हा शब्द लावावा लागेल आणि आपल्याला तो उच्चारावा लागेल असे मला कधीच वाटले नाही. ज्यांनी भाषणे केली त्यांच्याविषयी सांगेन, बाळासाहेब पूर्णपणे कळले असा दावा कोणी करणार नाही. असे व्यक्तिमत्व कळायला खूप काळ जावा लागेल. स्व.दत्ताजी साळवी, श्री.मनोहर जोशी, श्री.दिवाकर रावते, श्री.रामदास कदम हे जूने नेते आहेत. ते सांगू शकतील. शिवसेनाप्रमुखांनी तीन पिढ्यांवर अधिराज्य केले. त्यांच्या वयाची पहिली पिढी त्यांच्यावर प्रेम करायची, माझ्या वयाची दुसरी पिढी त्यांच्यावर प्रेम करायची आणि माझ ी मुले, ज्यांना कोणता नेता पाहिजे असे विचारले तर ते सांगतील की, शिवसेनाप्रमुख हवे आहेत.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

सभापती महोदय, माझा ठाकरे कुटुंबाशी पुष्कळ वर्षे घरोबा राहिला. 1980 सालापासून मी विद्यार्थी सेनेत काम करीत असून तेव्हा माजी खासदार मोहन रावले विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष होते. 1988 मध्ये मी स्वर्गीय दत्ताजी साळवी साहेबांबरोबर चिटणीस म्हणून सुरुवात केली व ते काम मी सन 2011 पर्यंत करीत राहिलो. परंतु हे सर्व काम करीत असतांना तुमचे प्रत्येक पैलू ओळखणारी व्यक्ती तुमच्या पाठीमागे असली पाहिजे. मला राजकारणाचा वारसा मिळालेला नाही. राजकीय वारसा नसतांनाही आम्हाला शिवसेना प्रमुखांनी जवळ घेतले व येथपर्यंत आणले. सरकारच्या कोणत्याही पदावर न राहता राजकारण करत राहणे हे काही साधे काम नाही. बाळासाहेबांनी शिवसेनेला जन्माला घातल्यानंतर त्यांनी नगरसेवक, आमदार, खासदार निवडून आणले. बाळासाहेबांना खऱ्या अर्थाने राजकारणी होते असे म्हटले तरी चालेल परंतु ते सरकार मान्य नव्हते तर ते लोकमान्य होते. अंत्ययात्रेची उपस्थिती बघता त्यांना सरकार मान्य व्हावे लागले नाही तर ते लोक मान्य होते हे दिसून येते. सभागृहाच्या प्रथे-पंरपरे प्रमाणे आमदार, खासदारांचाच शोक प्रस्ताव येथे मांडला जात असतो.

सभापती महोदय, आपण जेव्हा मोठया व्यक्तीच्या पाया पडतो किंवा शिवसेना प्रमुखांकडे गेल्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्यांचा चरणस्पर्श करीत असे. चरणस्पर्श केल्यानंतर शिवसेनाप्रमुख पाठीवर किंवा डोक्यावर हात ठेवत असे. मी 2005 मध्ये बाळासाहेबांच्या पाया पडलो त्यावेळेस त्यांनी डोक्यावर हात ठेवले व सांगितले की, "किरण तुझे केस जावयास लागले आहेत त्यामुळे वैद्याला भेट. वैद्य म्हणजे डॉक्टर नव्हे वैद्य म्हणजे वैद्यच." घरी गेल्यानंतर ही गोष्ट माझ्या आई वडिलांना सांगितली की, मी तुमच्याही पाया पडतो परंतु माझ्या डोक्यावरील केस जाऊ लागले हे तुम्हालाही कधी समजले नाही. शिवसेना प्रमुख केवळ आशिर्वाद द्यावयाचा म्हणून देत नसत तर ते खऱ्या अर्थाने आशीर्वाद देत असत. जवळून पाहण्याची दृष्टी केवळ बाळासाहेबानांच होती.

काही कारणामुळे मी सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर वारंवार बोललो आहे. शिवसेना प्रमुखांना दु:ख होईल असे कोणतेही कार्य मला करावयाचे नव्हते, त्यांना कोणताही त्रास द्यावयाचा नव्हता. परंतु घुटमळ होत होती म्हणून निघायचे होते. मी राजीनामा दिल्यानंतर माननीय शरद पवार साहेबांनी विचारले होते की, शिवसेनेतून जो कोणी बाहेर निघतो तेव्हा त्याच्यावर सामना वर्तमान पत्रातून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

टीका टिपणी केली जाते,टोपण नाव दिले जाते परंतु तुला आतापर्यंत कोणतेही टोपण नाव दिले नाही याचे कारण काय ? मी राजीनामा दिल्यानंतर बाळासाहेबांना जे पत्र दिले होते ते मी पवार साहेबांना वाचून दाखवले. मी त्या पत्रात लिहिले होते की, "बाळासाहेब आपण आमदार केले, भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस पद दिले ती दोन्ही पदे आपल्या चरणी अर्पण करुन, आपले आशीर्वाद व र्मादर्शनाची शिदोरी घेऊन मी जात आहे". राजीनाम्याचे पत्र देण्यासाठी मी मातोश्रीवर गेलो होतो परंतु बाळासाहेबांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये जावयाचे होते. राजीनाम्याचे पत्र बाळासाहेबांच्या हातात देऊ न शकल्यामुळे मी त्यांच्या पी.ए.ला सांगितले की, बाळासाहेब संध्याकाळी आल्यानंतर त्यांच्या हातात हे महत्वाचे पाकीट दे. हे पाकीट बाळासाहेबांनी मागितलेले असल्यामुळे मी आपल्याजवळ दिलेले आहे. नाही तर पुन्हा कोणी तरी ते काढून घ्यावयाचे ? रवी म्हात्रे यांनी बाळासाहेबांना माझे पत्र दिल्यानंतर त्यांनी संजय राऊत यांना सामन्यामधून किरणवर काहीही टीका टिपणी करावयाची नाही असे सांगितले. हे मला संजय राऊत यांनीच दुसऱ्या दिवशी फोन करुन सांगितले होते.

सभापती महोदय, बाळासाहेबांचे प्रेम मिळवणे फार कठीण होते परंतु बाळासाहेबांचे प्रेम मिळवल्यानंतर टिकवणे हे त्याहूनही अवघड होते.त्यांनी प्रत्येक शिवसैनिकाला अन्यायाविरुध्द लढण्याचे शिक्षण दिले होते.

सभापती महोदय, राजीनाम्याच्या संदर्भात मी आपल्याला भेटावयास आलो होतो त्यावेळेस आपणही मला सांगितले होते की, राजीनामा देऊ नका, विधान परिषदेत येण्यासाठी लोकांना किती त्रास घ्यावा लागतो, आपण का राजीनामा देता ? मी अजूनपर्यंत शिवसेना प्रमुखांशी बोललो नाही. परंतु मी तुझ्यासाठी शिवसेनाप्रमुखांशीही बोलेन.

सभापती महोदय, मनात अशी कल्पना चालू होती की, ज्या शिवसेना प्रमुखांकडे आपण काम केले, अन्याया विरुध्द लढण्यास शिकलो, शिवसैनिकांना अन्याया विरुध्द लढणारे सैनिक म्हटले जाते त्यांच्याकडून गेल्यानंतर आता जायचे तरी कोणाकडे? त्यामुळे मी बाळासाहेबांसारखे व्यक्तिमत्व शोधण्याच्या कामास लागलो.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

शिवसेना प्रमुखांमधील अरेला कारे म्हणणारे काही गुण आम्ही घेतले. त्याच वेळी आपल्याला जवळ घेऊन आपल्या विषयी बोलणारे व्यक्तिमत्व कोण असेल याचा विचार करून मी श्री.अजितदादा पवार यांना भेटलो. मी शिवसेनाप्रमुखांकडे अनेक वर्षे धडाडीने काम केले. त्यासाठी स्वत:वर किती पोलीस केसेस झाल्या हे कधीच बघितले नाही. आंदोलनाच्या केसेस झाल्या त्या कधी बघितल्या नाहीत. त्यांच्याकडे काम केल्यानंतर आपल्याकडे काम करायला आवडेल असे सांगितले. अशा पद्धतीने मी तिकडून निघून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कदाचित शिवसेना प्रमुखांना त्याचा त्रासही झाला असेल. त्यांना दु:खही झाले असेल, वाईटही वाटले असेल. पण जेवढे शिवसेना प्रमुखांना दु:ख झाले असेल त्यापेक्षा किती तरी पटीने श्री.नारायण राणे, श्री.छगन भुजबळजी, श्री.कालिदास कोळंबकर व माझ्यासह अनेकांना दु:ख झाले असेल. आम्ही कार्यकर्त्यांतून पदाधिकारी झालो. पदाधिकाऱ्यांमधून आमदारकी पर्यंत आलो. त्यानंतर आम्ही दुसरीकडे गेलो. शिवसेना प्रमुखांना दु:ख झाले आहे. त्या पेक्षा किती तरी पटीने माजी शिवसैनिक म्हणून आम्हाला देखील दु:ख झालेले आहे. या व्यक्तींबद्दल आम्ही मर्यादित कालावधीमध्ये बोलू शकणार नाही. शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना, श्री.विलासराव देशमुख यांना तसेच प्रस्तावातील दिवंगत सन्माननीय सदस्यांना पक्षातर्फे, माझ्या कुटुंबीयांतर्फे मी श्रद्धांजली अर्पण करतो.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री.अजित पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, श्री.विलासराव देशमुख, श्री.बाबासाहेब कुपेकर, श्री.शंकरराव जगताप, शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, श्री.विठ्ठलराव दिकोंडा, श्री.कन्हैयालाल गिडवाणी, श्री.सदाशिवराव शिंदे यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सर्वप्रथम मी सर्व दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, 1966 साली शिवसेना स्थापन झाली. त्यावेळी मी वडाळ्याला राहात होतो. तेव्हा मी नवव्या इयत्तेमध्ये शिकत होतो. त्यावेळी संबंध भागामध्ये चर्चा सुरू झाली होती की, मराठी माणसासाठी काही तरी चांगले घडत आहे. मराठी माणसांसाठी शिवसेना स्थापन झाली आहे. त्यावेळी आम्ही सर्व तरूण शिवसैनिक होऊ शकलो नाही तरी देखील शिवसेनेच्या पाठीमागे 'झिंदाबाद' च्या घोषणा देण्यासाठी जात होतो. त्यावेळी बाळासाहेबांना पाहण्याचा एक-दोनदा योग त्यांच्या सभेच्या निमित्ताने मला आला. त्यावेळी शाल घेतलेला 40 वर्षाचा तरूण मराठी माणसांसाठी उभा आहे असे चित्र पहायला मिळायचे. त्यावेळी जी काही आंदोलने झाली त्यावेळी आम्ही तरूण मंडळी झिंदाबाद म्हणण्याचे काम करायचो. नंतर महापालिकेच्या निवडणुका झाल्या. त्यावेळी पहिल्यांदा शिवसेनेचे नगरसेवक श्री.विजय पर्वतकर हे मी ज्या भागात राहात होतो तेथून निवडून आले. आम्ही सर्व मराठी लोकांनी त्यांना मतदान केले होते. त्या वयात देखील श्री.बाळासाहेबां बद्दल एक आत्मियता मनात निर्माण झाली होती. श्री.बाळासाहेब यांच्या जवळ बसण्याचा किंवा त्यांच्याशी बोलण्याचा आयुष्यात कधी प्रसंग येईल असे मला कधीच वाटले नव्हते.

सन 1971 मध्ये गोरेगावच्या निरलॉन कंपनीमध्ये मी कामगार म्हणून काम करीत होतो. त्यावेळी भारतीय कामगार सेनेची युनियन होती. आम्ही देखील त्या युनियनचे सभासद होतो. त्यावेळी श्री.धूप व श्री.दत्ताजी साळवी यांचे काही पटले नसल्यामुळे निरलॉन कंपनीच्या 6-7 कामगारांना काढून टाकले. आम्ही कामगारांची मिटींग घेतली व सर्व कामगारांनी आर.जे.मेहता यांची युनियन जॉईंट केली. सन 1971 मध्ये मी कांदिवली येथे रहायला होतो. काही तरी गडबड होईल, मारामारी होईल अशी भीती असल्यामुळे आम्ही 10-25 लोक रात्रभर जागत बसायचो. त्यावेळी विद्यमान सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे देखील आमच्या सोबत असायचे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

परंतु, अचानक 10-15 दिवसांनी एकाचा निरोप आला की, माननीय श्री.बाळासाहेबांनी तुला मातोश्रीवर बोलाविले आहे. त्यावेळी देखील मनामध्ये थोडी भीती होतीच. मी श्री.रामदासभाईंना विचारले की, श्री.बाळासाहेबांचा भेटण्यासाठी निरोप आला आहे, त्यांना भेटायला जाऊ काय ? भाईंनी सांगितले की, जा, काही चिंता करू नकोस, बाळासाहेब कधीच दगाफटका करीत नाहीत

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

मनामध्ये भीती असताना देखील मी त्यांना भेटायला गेलो. माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी मला सांगितले की, "राम, निरलॉनची कामगार युनियन पुन्हा भारतीय कामगार सेनेची झाली पाहिजे, हे काम तू करु शकतोस आणि तुला हे काम करायचे आहे." मी त्यांना सांगितले की, "साहेब, आम्ही ती युनियन सोडून गेलो आहोत आणि त्या युनियनमध्ये परत येणे शक्य नाही." त्यावर बाळासाहेबांनी सांगितले की, "कोणत्याही परिस्थितीत हे घडले पाहिजे." मी त्यांना सांगितले की, कामगारांचे काय ? त्यांनी मला सांगितले की, "कामगारांचा एकही प्रश्न शिल्लक राहणार नाही हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंचा शब्द आहे आणि तुझ्या संसारामध्ये देखील कधी काही कमी पडणार नाही." माननीय शिवसेना प्रमुखांचा शब्द मानून आम्ही कामगारांची एक मिटींग घेऊन सर्वजण भारतीय कामगार सेनेमध्ये रुजू झालो. परंतु कंपनीने मला कामावर घेतले नाही.

सभापती महोदय, सन 1980 साली मला विधानसभेचे तिकिट मिळाले. पुन्हा मला माननीय बाळासाहेबांनी बोलावून विचारले की, तुझे कसे काय चालू आहे, तुला काही अडचण् आहे काय ? मी त्यांना सांगितले की, काही अडचण नाही, सर्व कार्यकर्ते काम करीत आहेत. पण जोगेश्वरीमध्ये मला त्रास होईल असे मला वाटते. बाळासाहेबांनी मला सांगितले की, दोन दिवसानंतर मी जोगेश्वरीमध्ये येतो. त्यांनी जोगेश्वरीमध्ये जाहीर सभेमध्ये सांगितले की, "हा माझा वाघ आहे, जोगेश्वरीतील जनतेला मी आवाहन करतो की, याला निवडून आणण्याची जबाबदारी तुमची आहे. कांदिवलीमध्ये सर्व ताकद राम पंडागळेच्या मागे उभी करा असे श्री.रामदास कदम यांना देखील सांगितले. 1980 मध्ये मी आमदार झालो. सायंकाळी 7.00 वाजता मी निवडून आल्याचे घोषित करण्यात आले. मी रात्री 7.45 वाजता मातोश्रीवर बाळासाहेबांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो. बाळासाहेबांचे हृदय किती विशाल आहे हे त्यावेळी मला समजले. मी बाळासाहेबांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेलो त्यावेळी मीनाताई ठाकरे तेथे होत्या. त्यांनी मीनाताईंना सांगितले की, राम पंडागळे निवडून आले आहेत, त्यांना ओवाळून घ्या. त्यांच्या या कृतीने मला सौभाग्य प्राप्त झाले. असे क्षण हृदयात साठवून ठेवले आहेत ते आम्ही कधीही विसरु शकणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

सभापती महोदय, 1986 सालची गोष्ट आहे. त्यावेळी श्री.वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. विधानपरिषदेत एका विषयाच्या अनुषंगाने त्यांनी भाष्य केले की, मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग आहे आणि ती महाराष्ट्रापासून अलग होणार नाही." त्या वक्तव्यावर मुंबईभर एक वातावरण निर्माण झाले. 1986 मध्ये मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होती. त्या निवडणुकीस माझे सख्खे बंधू उभे होते. आमचे सर्व कुटुंब मतदानास गेले. आम्ही सर्वांनी ठरविले होते की, माझ्या भावास मतदान करायचे. मतदान करुन आम्ही घरी आल्यावर कोणी कोणास मत दिले असे विचारले असता मी सोडून माझ्या घरातील सर्व व्यक्तींनी शिवसेनेला मतदान केले होते. माझ्या पत्नीने मला सांगितले की, तुमच्यामध्ये मुंबई वाचविण्याची ताकद नाही, ही ताकद फक्त शिवसेनेकडेच आहे. आम्ही मुंबई वाचविण्यासाठी शिवसेनेला मतदान केलेले आहे. अशा तऱ्हेचा विश्वास बाळासाहेबांनी निर्माण केला होता.

सभापती महोदय, आज श्री.नारायण राणे हे मंत्री आहेत. परंतु युतीच्या काळात त्यांना मुख्यमंत्री करण्याचे काम बाळासाहेबांनी केले होते. श्री.रामदास कदम आणि मला आम्ही कधी नगरसेवक होऊ असे वाटले नव्हते. श्री.रामदास कदम हे आमदार झाले, राज्यमंत्री झाले, मंत्री झ ाले त्यानंतर विरोधी पक्ष नेते झाले.

श्री.बाबुराव माने हे सफाई कामगार म्हणून नोकरीस होते. बाळासाहेबांनी त्यांना विधानसभेचे तिकीट देऊन त्यांना आमदार केले. असे अनेक नेते आहेत.

नगर जिल्ह्यामध्ये एकाची वडापावची गाडी आहे. ज्याची वडापावची गाडी आहे ते पाचवेळा निवडून आलेले आहेत आणि आजही त्याची वडापावची गाडी आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी तरुणाला उभे करुने त्यास शक्ती देण्याचे काम केले. आपण बेल वाजवून भाषण आटोपते घेण्यास सांगितले असले तरी माननीय बाळासाहेबांचे स्थान आमच्या हृदयात कायम राहणार आहे. महाराष्ट्रातील जनतेमध्ये त्यांच्याबद्दल जे आदराचे स्थान आहे ते त्यांनी त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी दाखवून दिले आहे. माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना मी मन:पूर्वक आदरांजली वाहतो.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख यांच्याबद्दल दोन शब्द बोलण्यासाठी आपण मला वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर श्री.सरफरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे....

मी 1975-76 मध्ये युवक कॉंग्रेसचा अध्यक्ष झालो त्यावेळी माननीय श्री. विलासराव देशमुख देखील उस्मानाबाद जिल्ह्याचे युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. मी मराठवाडयाचा राहणारा असल्यामुळे माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्याबरोबर माझा संबंध आला. त्यानंतर हळू हळू आमची मैत्री वाढू लागली. 1980 मध्ये आम्ही दोघेही आमदार झालो. त्यावेळी माननीय श्री. विलासरावजी हे अडीच ते पावणे तीन वर्षे मंत्री झाले नाहीत. सभापती महोदय, आपण दोघेही एकाच वेळी गृह खात्याचे राज्यमंत्री झालात. त्यावेळी त्यांच्याबरोबर बसणारी आम्ही मंडळी होतो. त्यामध्ये माननीय श्री. भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे होते, आम्ही सर्व मंडळी त्यांना "विलासराव तुम्ही मुख्यमंत्री होणार आहात, तुम्ही मुख्यमंत्री झाल्यानंतर आम्हाला विसरु नका" असे म्हणालो होतो.

सभापती महोदय, त्यांच्या बाबतीत मी आणखी एक प्रसंग आपणास सांगतो. वरळीची हाऊसिंग सोसायटी निर्माण झाली. त्यावेळी मी आणि श्री. भाऊराव पाटील त्यावेळचे मुख्यमंत्री माननीय बॅ. ए.आर. अंतुले साहेबांना भेटायला गेलो व त्यांच्याकडे घरासाठी जागा मागितली. त्यांनी सांगितले की, तुम्हालाच का महाराष्ट्रातील सर्वच आमदारांसाठी आपण प्रयत्न करु. त्यामधून वरळीला आमदारांची सोसायटी स्थापन झाली. अशाप्रकारे त्या सोसायटीच्या स्थापनेची सुरुवात आम्ही केली. त्या संदर्भात घेण्यात आलेल्या एका बैठकीमध्ये मी नेहमीप्रमाणे बोललो म्हणून माझे नाव त्या सोसायटीमधून वगळल्यामुळे दुर्दैवाने मला व श्री. भाऊराव पाटील यांनाही घर मिळाले नाही. त्यानंतर माननीय श्री. विलासरावजींना मी फोन करुन सांगितले की, आम्ही सोसायटी स्थापन केली असतांना माझे नाव गाळण्यात आले हे बरोबर केले नाही. त्यावेळी मुख्यमंत्री माननीय श्री. शंकररावजी चव्हाण साहेब होते व महसूल मंत्री माननीय श्री.विलासरावजी देशमुख साहेब होते. परंतु या सोसायटीचे संपूर्ण कामकाज माननीय श्री. विलासरावजी पहात असत. त्यावेळी माननीय श्री. विलासरावजींनी माननीय श्री. गवई साहेबांना सांगितले की, "तुम्ही आहात म्हणून रामभाऊ गप्प बसले आहेत, त्या ठिकाणी मी असतो तर रामभाऊंनी सर्व तोडून फोडून टाकले असते, तुम्ही रामभाऊंना घर द्या". माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्यामुळे मला वरळी येथील सोसायटीमध्ये घर मिळाले. आज देखील माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांचा फोटो माझ्या घरामध्ये आहे. जर मला ते घर मिळाले नसते तर आमदार असतांना सुध्दा मी इतका मोडून पडलो होतो की, या सभागृहामध्ये पडांगळे उभा राहिलेला आपल्याला पहावयास मिळाला नसता. एवढे महान उपकार त्यांचे माझ्यावर आणि माझ्या कुटुंबावर आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे....

सभापती महोदय, मी जुलै महिन्यामध्ये माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांना तुम्हाला मला भेटावयाचे आहे याकरिता त्यांच्या घरी फोन केला. त्यांच्याकडून सकाळपासून संध्याकाळपर्यंत निरोप मिळाला नाही. त्यांचा मला फोन न आल्यामुळे माझे मन व्याकूळ झाले. मी संध्याकाळी साडे सहा वाजता त्यांच्या स्वीय सहाय्यकाला फोन करुन विचारले की, साहेबांनी मला फोन करुन बोलाविले कसे नाही? त्यावेळी त्या स्वीय सहाय्यकाने मला सांगितले कीश माननीय श्री. विलासराव हे सकाळपासून संध्याकाळपर्यंत चेक अप करुन घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेले होते, त्यांची शारीरिक परिस्थिती फार नाजूक आहे. राष्ट्रपती पदाकरिता निवडणूक असल्यामुळे ते दिल्लीला गेले, त्या काळात आठ दिवस त्यांनी आपल्या तब्येतीकडे लक्ष दिले नाही. माननीय श्री. विलासराव देशमुख साहेब मुंबईला आले त्यानंतर त्यांना प्रणाम करण्यासाठीच आम्ही गेलो. अशाप्रकारे आमच्या मनामधून न जाणारे विलासराव, इतक्या कमी कालावधीत त्यांच्याबद्दल श्रध्दांजली वाहण्याचा योग येईल असे न वाटणारे माननीय श्री.विलासराव देशमुख हे महाराष्ट्राच्या जनतेमध्ये त्यांच्या विचाराचा, त्यांच्या कामाचा कायमचा पगडा ठेवून गेले. त्यांना मी माझ्या वतीने अभिवादन करतो, आणि आपण मला दोन मिनिटे अधिक बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार यांनी या ठिकाणी मांडलेल्या शोकप्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आठ दिवंगत नेत्यांबद्दल आपण या सभागृहामध्ये शोकप्रस्तावाच्या माध्यमातून आपल्या भावना मांडीत आहोत. त्यामुळे त्या सर्वांना व्यक्तिश: माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षातर्फे एका अर्थाने श्रध्दांजली वहात आहे. सभापती महोदय, माझा या सदनातील आजचा पहिला दिवस आहे. या आठ लोकांपैकी सहा लोकांबरोबर मी काम केले नाही. मी मुंबई महानगरपालिकेमध्ये काम करीत या सदनामध्ये आलो. ज्या दोन व्यक्तिबरोबर खऱ्या अर्थाने काम करण्याची किंवा त्यांना जवळून पाहण्याची मला संधी मिळाली. त्यांच्याबद्दल मी दोन शब्द बोललो नाही तर मी त्यांच्या प्रती असलेली माझी कृतज्ञता व्यक्त केली नाही अशी असे होईल माझी भावना असल्यामुळे मी फक्त दोन मिनिटे बोलणार आहे.

सभापती महोदय, माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्यासंबंधीची अनेक उदाहरणे प्रसंग रुपाने आपल्यासमोर मांडण्यात आली. राजकीय क्षेत्रामध्ये आपण काम करणारी सर्व मंडळी कुणाकडून काही ना काही तरी शिकत असतो. त्यापैकी आपण काही प्रसंग थेट पहात असतो तर काही प्रसंग आपण ऐकत असतो. त्यामधून आपल्या मनामध्ये अनेक गोष्टी साचत जातात.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR पूर्वी श्री.सरफरे . . . . 2.45

ॲड.आशिष शेलार . . ..

त्या मतातून एक राजकीय व्यक्तिमत्व निर्माण होत असते. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे व्यक्तिमव आणि त्यांच्यामध्ये असलेल्या सर्व गुणांच्या संबंधातील माहिती अगोदरच्या वक्त्यांनी सांगितली आहे. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल मला दोन गोष्टी प्रामुख्याने मांडावयास पाहिजेत, त्या माझ्यासाठी ऐकीव आहेत. पण या गोष्टी ज्यांच्याकडून ऐकल्या त्या ऑथेन्टीकच आहेत आणि याबाबतचा पूर्ण पुरावा माझ्याकडे असल्यामुळे मी याबाबत बोलत आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.राज ठाकरे यांच्याबरोबर माझी असलेली मैत्री ही मुंबईतील बऱ्याच लोकांना माहिती आहे. त्यामुळे मला त्यांच्याकडून एक प्रसंग कळला त्यावरुन मला असे वाटते की, महाराष्ट्राच्या राजकारणात एका अर्थाने असा नेता जो प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा, जादूटोणा या सगळया गोष्टींच्या पुढे जाऊन विचार करुन स्वत:च्या परिवारापासून ते समाजाच्या परिवर्तनापर्यंत विचार करतो अशा वेगळया पैलूने माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे पहाण्याचा माझा दृष्टीकोन होता.

माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे नुकतेच लग्न झाले होते.त्यानंतर माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे नवीन घरामध्ये मीनाताईंबरोबर शिफ्ट झाले होते. एक दिवस माननीय श्री. प्रबोधनकार ठाकरे त्यांचा कार्यक्रम संपवून घरी आल्यानंतर दरवाजामध्ये माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे त्यांना रिसीव्ह करण्यासाठी आले. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या पत्नीला श्री.प्रबोधनकार ठाकरे हे "सरु" या नावाने हाक मारत असत. त्यांनी माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांना विचारले की,"सरु कुठे आहे?" त्यावर माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले की, जर तुम्ही पाठीमागे जाऊन पाहिले तर ती काय करीत आहे हे तुम्हालाच कळेल. मग श्री.प्रबोधनकार ठाकरे बंगल्याच्या मागे गेल्यावर त्यांना असे दिसले की, मीनाताई तेथे भरलेल्या जेवणाचे ताट समोर ठेऊन कावळा येण्याची वाट पहात होत्या. कावळा अन्नाला शिवल्यानंतरच घरातील बाकीचे लोक जेवतील म्हणून त्या कावळ्याची वाट पाहत होत्या. या राज्यामध्ये अशी प्रथा-परंपरा मानणारे बरेच लोक आहेत. ते पाहिल्यावर श्री.प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळासाहेबांना असे विचारले की, या सर्व प्रथा-परंपरांबाबत तुझे मत काय आहे? त्यावेळी माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी श्री.प्रबोधनकार ठाकरे यांच्याकडून त्यांना जे शिकावयास मिळाले, तेच त्यांनी त्यांच्या पत्नीला सांगितले. जर अन्नाला कावळा शिवल्यानंतर जर काही गोष्टी घडत असतील तर आपण

. . . .2 टी-2

श्री.आशिष शेलार . . ..

एक कावळा पकडून पिंजऱ्यामध्ये ठेऊ या आणि मग हा तुझा काका, मामा असे सगळयांना सांगता येईल आणि अशा प्रकारच्या प्रथा परंपरा महाराष्ट्रामध्ये सुरु होतील. खरे म्हणजे आज समाजातील गोष्टी बाजूला टाकल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, महाराष्ट्रातील लोकांना प्रबोधनकारी हिंदुत्व समजले पाहिजे, जाणले पाहिजे अशा प्रकारचे दिशानिर्देशन करणारा नेता माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्यारुपाने महाराष्ट्राने पाहिला. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्राला, देशाला माहिती होतेच. पण ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे देखील होते आणि त्याचा एका ठिकाणी ओझरता उल्लेख झाला. जेव्हा विन्स्टन चर्चिल यांची ऑटो बायोग्राफी करण्याचा निर्णय झाला आणि त्या वेळी संपूर्ण जगभरातील कार्टूनिस्टची निवड करण्याची वेळ आली, त्यावेळी संपूर्ण भारतातून एकमेव कार्टूनिस्ट निवडला गेला आणि ते माननीय श्री.बाळासाहेब होते. त्यांनी विन्स्टन चर्चिल यांची तीन कार्टून काढली आणि ती आजही विन्स्टन चर्चिल यांच्या पुस्तकामध्ये आहेत. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी चित्रकारिता आणि विशेषत:कार्टून विषयी डेव्हीड लो नावाच्या कार्टूनिस्टला गुरुचे स्थान दिले होते आणि डेव्हीड लो यांची ताकद एवढी होती की, हिटलर देखील त्यांच्या कार्टूनमुळे रिॲक्ट व्हावयाचा आणि तो जेव्हा-जेव्हा जिंकत गेला तेव्हा तो असे सांगत असे की, डेव्हीड लो यांना प्रथम अटक करावी. अशा प्रकारची ताकद त्या माणसाच्या कार्टूनमध्ये होती. त्या डेव्हीड लो ने सुध्दा विन्स्टन चर्चिलची व्यंगचित्रे काढली आणि त्याच पुस्तकामध्ये माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांना व्यंगचित्र काढावयास मिळाले एवढा मोठा सन्मान माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांना कार्टूनिस्ट म्हणून मिळालाच पण त्याचबरोबर भारताचे नाव जगभराच्या नकाशावर कार्टूनिस्ट म्हणून आणण्याचे काम श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी केले हे सुध्दा अतिशय महत्वाचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी थोडक्यात माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्याबद्दल बोलणार आहे. मी मुंबई महानगरपालिकेमध्ये असताना एमएमआरडीचा सदस्य होतो आणि माननीय श्री. विलासराव देशमुख हे अध्यक्ष होते. माझा मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संबंध आहे आणि या असोसिएशनचे श्री.विलासराव देशमुख हे शेवटपर्यंत अध्यक्ष होते. त्यांच्याबाबतीत दोन गोष्टी विसरता न येण्याजोग्या आहेत. ज्याचा उल्लेख माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांनी

. . . .2 टी-3





असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

केला आहे. माननीय श्री.शरद पवार साहेब आणि माननीय श्री.विलासराव देशमुख हे जर नसते तर मुंबई क्रिकेट असोसिएशनचा वर्ल्डकप आणि वर्ल्डकपची फायनल होऊ शकली नसती. परंतु माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी दोन दिवसामध्ये मुंबई युनिर्व्हसिटी आणि रेल्वेची एन.ओ.सी. या गोष्टी केल्या हे देशातील कोणताही माणूस विसरु शकणार नाही. कोणताही क्रीडाप्रेमी ही गोष्ट नाकारु शकणार नाही हे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी एमएमआरडीएचा सदस्य होतो आणि राजकीय जीवनामध्ये आपण बऱ्याच गोष्टी शिकत असतो.त्यानुसार मी माझ्या आयुष्यामध्ये एक गोष्ट शिकलो आहे की, आपल्याला राजकीय क्षेत्रामध्ये काम करताना खूप आंदोलने करावी लागतात आणि ती करावीच लागतील. पण रेल्वे रोको किंवा रेल्वेची तोडफोड करुन चालणार नाही.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार....

किंबहुना तशी कोणतीही तोडफोड चालणार नाही. पण रेल्वेबद्दल मला विशेष गोष्ट शिकण्याची संधी मिळाली. श्री. विलासराव देशमुख एमएमआरडीएचे अध्यक्ष असताना त्यांनी मुद्दाम एक शिष्टमंडळ विदेशात जर्मनीला पाठविले. मी एमएमआरडीएवर जास्त बोलतो, योग्य बोलतो असे त्यांना वाटले असेल म्हणून त्यांनी त्या शिष्टमंडळाचे प्रमुखपद माझ्याकडे दिले. आम्ही सिमेन्सच्या त्या लोकोमोटीव्ह बनणाऱ्या फॅक्टरीला भेट देण्यासाठी जर्मनीला गेलो. रेल्वेचा एक डबा, एक लोकोमोटीव्ह किंवा एक मेट्रो रेल्वे बनविण्याचे काम बाळंतपणापेक्षा कठीण असते हे पाहण्याची संधी माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्यामुळे मिळाली. ते पाहिल्यानंतर जेव्हा मी भारतात परत आलो त्यावेळी मी आमच्या राष्ट्रीय अध्यक्षांना पत्र लिहिले की, सगळी आंदोलने करु पण रेल्वे जाळणे किंवा रेल्वे तोडण्याचे आंदोलन करु नये, अशा पध्दतीचे माझे मत आहे. मला असे वाटते की, श्री. विलासराव देशमुख यांनी एमएमआरडीएमध्ये या सर्व बाबतीत नवनवीन राजकीय नेते निर्माण करण्यासाठी आणि अनुभव देण्यासाठी जी गोष्ट माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्या रुपाने केली त्यांना तसेच श्री. बाळासाहेब ठाकरे आणि इतर सर्व दिवंगतांना मी श्रध्दांजली अर्पण करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनायक राऊत ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदरणीय शिवसेनाप्रमुख या लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये आज शोक प्रस्तावाच्या रुपाने अवतरले आहेत. या सभागृहामध्ये असलेल्या माझ्यासारख्या अनेक सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम शिवसेनाप्रमुखांनी कसे केले हे यापूर्वी ज्या सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली त्यांच्या भाषणातून स्पष्ट होते. शिवसेनाप्रमुखांनी सध्याच्या बाजारु राजकारणामध्ये कार्यकर्ता शोधण्याचे काम सातत्याने केलेले आहे. लोकशाहीमध्ये जातीपातीचे राजकारण कसे चालते, सत्ता मिळविण्यासाठी किती संपत्ती असावी लागते, याची कल्पना सर्वांना आहे. त्यातून आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना या लोकशाहीचे सेवक बनण्याचे जे सदभाग्य लाभले ते केवळ शिवसेनाप्रमुखांमुळेच लाभले आहे. त्यांच्यासारखा द्रष्टा नेता झाला नाही, आजही नाही, किंबहुना होणारही नाही. शिवसेनाप्रमुखांच्या अनेकविध अंगांचे किंबहुना त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे गुणगान किंवा त्यांच्या अनेक प्रकारच्या विचारांबद्दलची माहिती आज या सभागृहामध्ये देण्यात आली.

सभापती महोदय, माझ्यासारखा एक कार्यकर्ता आणीबाणीच्या काळामध्ये शिवसेनाप्रमुखांच्या संपर्कात आला. मी शासकीय नोकरीमध्ये मराठी लघुलेखक होतो. त्यावेळी मार्मिकच्या अग्रलेखाचे डिक्टेशन घेण्याच्या निमित्ताने मी त्यांच्याकडे गेलो आणि ज्या पहिल्या अग्रलेखाचे मी डिक्टेशन घेतले तो अग्रलेख स्व. इंदिराजी गांधी यांना आणीबाणीमध्ये पाठिंबा देण्याच्या विषयाच्या संदर्भात होता. राजकारणामध्ये प्रवाहाच्या विरोधात पोहण्याचे धाडस कोणी करु नये असे म्हणतात पण शिवसेनाप्रमुख हे एकमेव व्यक्तिमत्व असे निघाले की, ज्यांनी नेहमीच्या प्रवाहाच्या विरोधात पोहण्याचे धाडस केले आणि किनारा सुध्दा गाठला. प्रसंगी त्यामुळे त्यांना फार मोठे नुकसान सोसावे लागले. आणीबाणीला पाठिंबा देत असताना किंबहुना पाठिंबा दिल्यानंतर झालेल्या राजकीय उलथापालथीमध्ये शिवसेनाप्रमुखांना अनेक प्रकारचे मानसिक क्लेश सहन करावे लागले. केवळ राजकीय स्वार्थ साधण्यासाठी वाहत्या गंगेमध्ये उडी मारावयाची असे शिवसेनाप्रमुखांनी कधीही केले नाही. प्रवाहाच्या विरुध्द पोहावयाचे आणि किनाराही गाठावयाचा आणि मी जो विचार ठेवलेला आहे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनायक राऊत ....

त्या विचारावर आजही ठाम आहे, तो विचार किती दूरदृष्टीचा आहे हे जगाला दाखवून द्यावयाचे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

सभापती महोदय, संत ज्ञानेश्वरांनी पसायदान लिहून त्या पसायदानाच्या माध्यमातून ईश्वराकडे संपूर्ण जगातील पामरांसाठी वरदान मागितले आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत ...

संत ज्ञानेश्वरानंतर माननीय शिवसेना प्रमुखांनी स्वत:साठी काही मागितले नाही. परंतु या महाराष्ट्रातील अनेक प्रामाणिक कार्यकर्त्यांना सत्तेचे स्थान प्राप्त व्हावे अशी मागणी त्यांनी केली. सभापती महोदय, एका संताने जे सांगितलेले आहे ते राजकीय क्षेत्रामध्ये काम करणा-या प्रत्येक कार्यकर्त्याने लक्षात ठेवले पाहिजे. त्यांनी सांगितलेले आहे की, हे मानवा तू जन्माला येशील त्यावेळी तू रडशील आणि जग हसेल. पण तू असे कार्य कर की, ज्यावेळी तुझा मृत्यू होईल त्यावेळी तू हसशील आणि जग रडेल. त्याप्रमाणे या महामानवाच्या अंत्ययात्रेमध्ये सहभागी झालेल्या करोडो लोकांच्या डोळयातील अश्रू पाहिल्यानंतर संतानी सांगितलेल्या या उक्तीचा बोध होतो. शिवसेना प्रमुखांचे विराट दर्शन तेव्हा पहायला आणि अनुभवायला मिळाले.

सभापती महोदय, त्या शिवतीर्थावर शिवसेना प्रमुखांच्या रुपाने एक शक्तिस्थान निर्माण झालेले आहे. हे शक्तिस्थान केवळ शिवसैनिकांचेच नाही तर महाराष्ट्रातील आणि हिन्दुस्थानातील ज्या ज्या लोकांनी शिवसेना प्रमुखांवर प्रेम केलेले आहे त्या सर्वांचे ते एक भक्तिस्थान झालेले आहे. किमान या सभागृहाने देखील तशी भावना व्यक्त करावी अशी मी विनंती करतो आणि माननीय शिवसेना प्रमुख यांना श्रद्धांजली वाहून माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनी या सभागृहामध्ये जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काँग्रेसमध्ये अनेक मोठे नेते झाले, आजही मोठे नेते आहेत. अनेक मुख्यमंत्री झाले. पण विलासराव देशमुख यांच्या सारखा लोकप्रिय मुख्यमंत्री या महाराष्ट्राला लाभलेला नाही हे त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी जमलेल्या विराट जनसमुदायावरुन म्हणता येईल. विलासराव देशमुख यांच्या सारखे अत्यंत लोभस आणि लोकप्रिय व्यक्तिमत्व महाराष्ट्राने गमावलेले आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आणि माझी 1973 पासून ओळख होती. अलीकडेच मी आणि माझ्या पक्षाचे नेते श्री. रामदास आठवले आम्ही दोघेही त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गेलो. त्यावेळी सहाजिक बाळासाहेब म्हणाले, "सुमंतराव ब-याच दिवसानंतर तुम्ही माझ्याकडे आलात,

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 15:00

श्री.सुमंत गायकवाड....

काय विशेष आहे ? बाळासाहेब, आज तुमचा वाढदिवस आहे, तुम्हाला शुभेच्छा देण्यासाठी मी आलेलो आहे. माननीय बाळासाहेबांनी मला सांगितले की, माझी 1973 पासूनची इच्छा आहे की, शिवशक्तीच्या जोडीला भीमशक्ती आली पाहिजे. शिवशक्तीच्या जोडीला भीमशक्ती जरुर येईल असे मी व आमचे नेते श्री.रामदास आठवले यांनी त्यांना सांगितले. त्यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्रातील 2014 च्या निवडणुकीत महाराष्ट्रात शिवशक्ती आणि भीमशक्तीचे राज्य आले पाहिजे. त्यांनी व्यक्त केलेली इच्छा तुम्ही, आम्ही पूर्ण केली तरच बाळासाहेबांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली ठरेल. सध्या शिवसेना,भारतीय जनता पक्ष आणि आर.पी.आय.या पक्षांची महायुती झालेली आहे. ही महायुती बाळासाहेबांचे स्वप्न निश्चितपणे पूर्ण करील.

या सर्व दिवंगत नेत्यांना रिपब्लिकन पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो व माझे मनोगत पूर्ण करतो.

-------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या शोक प्रस्तावावर बोलण्यासाठी माझ्याकडे जी नावे देण्यात आली होती, त्यातील दोनच सदस्यांची नावे शिल्लक राहिलेली आहेत. या शोक प्रस्तावावर गेल्या चार तासापासून चर्चा सुरु आहे. परंतु अजूनही काही सन्माननीय सदस्यांनी यावर बोलण्याची इच्छा माझ्याकडे व्यक्त केलेली आहे. त्या सदस्यांना मी प्रत्येकी दोन मिनिटांचा वेळ उपलब्ध करुन देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत ही दोन नावे माझ्याकडे उपलब्ध असलेल्या यादीतील आहेत. त्यांनी या शोक प्रस्तावावर भाष्य केलेले नाही. ज्यांनी या शोक प्रस्तावावर बोलण्याची इच्छा व्यक्त केली आहे, त्यात सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले, श्री.विक्रम काळे, श्री.जयदेव गायकवाड, नरेंद्र पाटील यांचा समावेश आहे. मी या सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी दोन-दोन मिनिटांचा वेळ उपलब्ध करुन देत आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.शिगम 15:00

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष,विधानसभा, शंकरराव जगताप,माजी अध्यक्ष,विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा,कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिव शिंदे, माजी वि.व.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्या प्रस्तावाच्या बाबतीत माझ ी सहवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आदरणीय शिवसेना प्रमुख हे शिवसैनिकांचे आदरस्थान आहे. माझ्या भाग्याने गेली 20 वर्षे शिवसेनाप्रमुखांच्या सतत संपर्कात राहण्याचा मला योग दिला. अगदी शेवटच्या क्षणापर्यत, त्यांच्या ह्रदयाचा शेवटचा ठोका ऐकेपर्यंत मी बाळासाहेबांसोबतच होतो. म्हणून मी दोन मिनिटे बोलण्याचा आपणाकडे अट्टाहास केला. मी या सभागृहात फक्त श्रीमती प्रमिलाताइ टोपले यांच्या निधनाबद्दलच्या शोकप्रस्तावावर बोललो आहे. त्यानंतर आज मी शोक प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात शिवसेना प्रमुखांचे अनेक पैलू आपण ऐकले. सत्ताधारी व विरोधी पक्ष सदस्यांची यासंदर्भात भावना सारखीच आहे. शिवसेना प्रमुख हे चतुरस्त्र व्यक्तिमत्व होते. त्यांची या देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय ख्याती होती. इंटरनॅशनल हेरॉल्डने देखील शिवसेना प्रमुखांच्या बाबतीत फ्रंट पेजवर न्यूज देऊन एक मोठा नेता गेल्याची नोंद घेतली ही गोष्ट सर्वांना खूप महत्वाची आहे. आजारपणातील शेवटचे आठ दिवस त्यांच्या सोबत राहण्याची परवानगी माननीय श्री. उद्धव ठाकरे यांनी दिली होती.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वैद्यकीय ज्ञानाबाबत कोणीही सदस्यांनी या ठिकाणी माहिती दिली नाही, ती माहिती मी या ठिकाणी देतो. त्यांना आजाराविषयी अथवा मेडीसीन विषयी खूपच माहिती होती. एखादा डॉक्टर त्यांची तपासणी करण्यासाठी त्यांच्याकडे जायचा, त्यावेळी ते डॉक्टरांची उलट तपासणी घेत असत. त्यानंतरच ते डॉक्टरांचे म्हणणे ऐकून घेत असत. माझा असा एक अनुभव होता की, एखाद्या शब्दाचा उच्चार कसा करावयाचा या बाबतीत

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

शिवसेनाप्रमुख खूप पर्टिक्युलर होते. त्यांना रेटिनाचा त्रास होता. मला त्यांनी विचारले की, दीपक, "रेटिना" की " "रेटायना". हाऊ डू यू स्पेल. त्यांच्याकडे एक वॉकींग-टॉकींग मशीन होते. त्या मशीनवर मी सांगितलेले स्पेलिंग टाईप केले आणि त्यांनी "रेटिना"चा उच्चार ऐकला.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:05

डॉ.दीपक सावंत........

या इतक्या छोट्या छोट्या गोष्टीतून आपल्या तोंडावाटे निघणारा शब्द कसा असावा याबाबत ते किती आग्रही होते हे दिसून येते.

एखाद्या औषधाचे साईड इफेक्टस् काय असतात याविषयी त्यांनी दसरा मेळाव्यात सैनिकांना उद्देशून केलेले भाषण ज्यांनी ऐकले असेल त्यांना त्यांच्या भावना कळल्या असतील. डॉक्टरांनी माझ्या शरीराची प्रयोगशाळा करुन ठेवली आहे असे ते म्हणाले होते. खरोखरच माझ्याबरोबरच्या डॉक्टरांना त्यांना औषध देताना खूप भीती वाटायची. मनावर दडपण असायचे. शिवसेनाप्रमुखांना आपण औषध दिले तर त्यांचा पहिला प्रश्न असायचा. या औषधामुळे मला कॉन्स्टिपेशन होईल काय? या प्रश्नाला उत्तर काय द्यायचे? एकदा त्यांना सर्दी झाली होती. डॉक्टरांनी त्यांना सेन्ट्रीजीन नावाची गोळी घ्यायला सांगितली. त्यांनी रात्री 12.00 वाजता मला फोन केला आणि कोणते औषध घेऊ असे विचारले. मी त्यांना सांगितले की, सेन्ट्रीजीनची एक गोळी घ्या. ते मला म्हणाले, मला कॉन्स्टिपेशनचा त्रास आहे. या गोळीमुळे माझ्या आतड्यातील पाणी शोषले जाईल, त्यामुळे मला कॉन्स्टिपेशन होणार नाही का? इतके ते औषधाच्या साईड इफेक्टस्बाबत दक्ष असायचे.

सभापती महोदय, कोणताही शिवसैनिक, नेता किंवा पदाधिकारी रुग्णालयात दाखल झाला असेल तर ते त्याच्या प्रकृतीविषयी जातीने चौकशी करायचे. डेव्हीड लो या जगप्रसिध्द व्यंगचित्रकाराचे पुस्तक त्यांच्या टेबलावर नेहमी असायचे. ते जराही इकडे तिकडे झालेले त्यांना चालत नसे. तसे झालेले दिसून आले तर ते थापाला सांगायचे की, माझे ते पुस्तके व्यवस्थित जागेवर ठेव. त्यांचे घड्याळ, बेल व्यवस्थित ठरलेल्या जागेवर ठेवावे लागे. मी माझे भाग्य समजतो की, माझी सांताक्रूझ येथील वास्तू त्यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेली आहे. त्या काळात सांताक्रूझ पश्चिमेला मांसाहार करणाऱ्यांना फ्लॅट विकत देण्यास बिल्डर मंडळींचा विरोध होता. शिवसेनाप्रमुखांच्या आशीर्वादाने मला त्या परिसरात फ्लॅट विकत मिळाला. माझ्या घरी वास्तूशांतीसाठी स्वत: शिवसेनाप्रमुख आले होते.

सभापती महोदय, शिवसेनाप्रमुखांचे आगळे वेगळे स्मारक व्हावे अशी महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील लोकांची इच्छा आहे. ते स्मारक त्यांच्या ऊंचीला साजेसे असावे. शिवतीर्थाचा काही भाग राज्य शासनाने कायमस्वरुपी शिवतीर्थ म्हणून जाहीर करुन तेथे स्मारक उभे करावे असा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:05

डॉ.दीपक सावंत........

आपल्या मार्फत मी सदनाला आग्रह करतो. शिवसेनाप्रमुखांच्या बाबतीत आणखी ज्या काही आठवणी आहेत त्या सर्वच आठवणी मला उलगडून दाखवायच्या नाहीत. काही आठवणी माझ्या स्वत:साठी आहेत. त्या मी माझ्यापुरत्या मर्यादित ठेवणार आहे. गेली 20 वर्षे माझा त्यांच्याशी सहवास होता. तो सहवास सोनेरी क्षणासारखा मी जपून ठेवणार आहे.

सभापती महोदय, स्व.विलासराव देशमुख यांना श्रध्दांजली वाहताना एवढेच म्हणेन की, सांस्कृतिक क्षेत्र वा राजकीय परिसंवाद असो, सर्वत्र मॅच होणारा असा एक अलौकिक नेता म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांचे आणि माझे खूप जवळचे संबंध होते. श्री.अमरजित मनहास मुंबई पदवीधर मतदारसंघात माझ्या विरुध्दच्या निवडणुकीत पराभूत झाले. याचा अहवाल त्यांना सीआयडीकडून निवडणुकीपूर्वीच कळला होता. तरी देखील विलासराव देशमुखांनी मला व्यक्तीश: फोन करुन अभिनंदन केले.

सभापती महोदय, डॉ.लहाने यांनी 999 डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्यानंतर 1000 व्या शस्त्रक्रियेबद्दल मी त्यांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी विलासराव देशमुख यांनी कॅबिनमध्ये बोलावून मला सांगितले की, 1 लाखाव्या शस्त्रक्रियेची वाट पहात आहात काय? 1 लाखाव्या शस्त्रक्रियेबद्दल डॉ.लहाने यांचा सत्कार मी करणार आहे. तुम्ही एक चांगली आठवण करुन दिली. त्यांनी मी विरोधी पक्षाचा आमदार असताना सुध्दा माझ्याबद्दल खूप चांगले गौरवोद्गार काढले.

सभापती महोदय, सर्वसामान्य गरीब रुग्णांकरिता धर्मादाय रुग्णालयांमध्ये 10 टक्के खाटा राखीव ठेवण्यासाठी आपल्या बरोबरीने ज्यांनी सातत्याने प्रयत्न केले त्या स्व.बाबासाहेब कुपेकर यांनाही मी श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड ( विधानसभेने निवडलेले ) : आदरणीय सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री. अजित पवार यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

आपल्यातून जे लोक निघून गेले ते फार मोठे होते. त्यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत फार मोलाचे कार्य केले होते. त्यांच्या बद्दल, त्यांच्या कर्तृत्वाबद्दल अनेक लोक चरित्रग्रंथही लिहितील. एवढया मोठया माणसांचे अतिशय कमी वेळेत राजकीय विश्लेषण करणे अवघड गोष्ट आहे.

सभापती महोदय, कै.इंद्रकुमार गुजराल हे आपल्या देशाच्या राजकारणामध्ये महत्वपूर्ण व्यक्तिमत्व होऊन गेले असून त्यांनी एक इतिहास घडविला होता. त्यांच्या पक्षाकडे केवळ सहाच खासदार असतांना सुध्दा त्यांनी या देशाचे पंतप्रधान पद भूषविले होते. त्यानी या देशातील लोकशाहीमध्ये आगळे वेगळे, वैशिष्टपूर्ण व्यक्तीमत्व राजकारणी लोकांपुढे ठेवले होते. एवढेच नाही तर आपल्या लोशाहीचे एक वेगळे अंग त्यांच्यामुळे आपल्याला पहायला मिळते. अनेक पक्षांची युती असतांना तसेच पक्षाचे अनेक मोठे नेते असतांना देखील एका छोटया पक्षाचा एक नेता देशाचा पंतप्रधान होऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. त्यांचा कार्यकाळ छोटा असेल परंतु त्यांनी तो एक इतिहास घडविलेला आहे. कै. इंद्रकुमार गुजराल हे अतिशय प्रोग्रेसिव्ह विचाराचे होते. त्यामुळे मी माजी पंतप्रधान कै. इंद्रकुमार गुजराल यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

कै. विलासराव देशमुखाचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. परंतु त्याच्याही पलीकडे जाऊन मला जे विलासराव दिसतात ते मी सांगतो. विलासरावांची गढी होती, ते देशमुख होते, ते मोठे जमीनदार होते. परंतु त्यांनी गढीवरील देशमुखाचे राजकारण केले नाही. या देशामध्ये जी लोकशाही आली होती त्या लोकशाहीच्या जीवन शैलीमध्ये सर्वसामान्य माणसांबरोबर जाणे, त्यांना विश्वासात घेणे, त्यांना प्रेम देणे, त्यांची कामे करणे अशा प्रकारचे आगळे वेगळे काम त्यांनी केलेले आहे. विलासराव आपल्यातून गेल्यामुळे सर्वसामान्य माणसांना दु:ख झाले होते. त्यामुळे मी कै.विलासराव देशमुखांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, 1984 मध्ये मी दलित पँथरचे काम करीत होतो. वरळीची दंगल झाली तेव्हा आम्हाला असे वाटले की, शिवसेनेचे लोक गरीब, दलितांवर आक्रमण करीत आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

नंतरच्या काळातही अशाच प्रकारच्या काही घटना घडल्या. साऊथ इंडियन लोकांच्या संदर्भातील बाळासाहेबांच्या भूमिका मी बघितल्या आहेत. त्यांच्या भूमिकांचा मी अजूनही पाठलाग करीत आहे. प्रबोधनकार ठाकरेंचे चिरंजीव असलेले बाळासाहेब ठाकरे अशा भूमिका का घेतात? त्यांच्यासंदर्भात मला जे उत्तर मिळते ते असे की, त्यांच्या त्या पॉलिटीकल स्ट्रॅटेजीस असायच्या. पॉलिटीकल स्ट्रॅटेजीस मधून त्यांचे राजकारण वाढत वाढत गेले. त्यांनी त्या त्या वेळी ज्या काही भूमिका घेतल्या त्याबाबत प्रचंड गदारोळ झाला होता. संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली होती. यासंदर्भात लोकसभेत चर्चा झाल्या तसेच बाहेरही चर्चा झाल्या. परंतु त्यांच्या राजकारणात एक प्रकारची जी गती होती त्या गतीतून असे पहावयास मिळते की, नंतर ते हळू हळू बदलत गेले. बाळासाहेबांनी नंतरच्या घेतलेल्या भूमिकांमध्ये रिडल्स,नामांतर, आंबेडकर, दलित समाज किंवा पुरोगामी विचारांना पाठिंबा दिला तो प्रत्यक्ष कृतीमधून पहावयास मिळाला आहे.

दिवंगत सर्व नेत्यांना श्रध्दांजली वाहून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभागृहाचे नेते श्री. अजित पवार यांनी माजी पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल, विलासराव देशमुख, बाबासाहेब कुपेकर,शंकररावजी जगताप, बाळासाहेब ठाकरे, विठ्ठलराव दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे यांच्या दुःखद निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी व त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

यानंतर श्री.ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख यांच्या रूपाने महाराष्ट्राच्या राजकारणात एक आगळेवेगळे व्यक्तिमत्व होऊन गेले. बाभळगावचे सरपंच ते मुख्यमंत्री व नंतर केंद्रीय मंत्री असा त्यांचा राजकारणात प्रवास राहिला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात विविध खात्यांचा मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली तेव्हा त्यांनी त्यांना मिळालेल्या खात्यांच्या माध्यमातून नवनवीन विकासाची कामे लातूर व मराठवाडा विभागासाठी केली. नव्हे ती कामे त्यांनी खेचून आणली. लातूरसह मराठवाडा विभागाचा, महाराष्ट्राचा अधिकाधिक विकास करण्याचे काम त्यांनी केले.

सामान्यांचा फोन उचलणारा मुख्यमंत्री म्हणून त्यांची ख्याती होती. कधी कधी ते सभेमध्ये आवर्जून सांगायचे की, एकदा तर मला टमटम चालविणाऱ्याने फोन केला आणि सांगितले की, साहेब, माझी गाडी पोलिसांनी पकडली आहे. अशा प्रकारे ते सामान्य माणसांची देखील दखल घेत होते. त्यामुळेच एक लोकनेता म्हणून त्यांची ओळख होती. एक गोष्ट मला येथे आवर्जून सांगितली पाहिजे की, माणूस मोठ्या पदावर गेल्यावर आपल्या भूमीकडे दुर्लक्ष करतो. परंतु, आम्ही श्री.विलासराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाचा एक गुण पाहिला आहे. कुठलाही लहान मोठा सण असो मग दीपावली असो किंवा शेतकऱ्यांच्या दृष्टीने वेळा अमावस्या असो. अशा छोट्याशा सणाला देखील श्री.विलासराव देशमुख साहेब मुख्यमंत्री असोत किंवा केंद्रीय मंत्री असोत आपल्या बाभळगावच्या गावी जात असत व तो सण आपल्या कुटुंबीयांसमवेत साजरा करीत असत. अशा प्रकारे आपल्या मातीशी इमान राखण्याचे काम श्री.विलासराव देशमुख साहेबांनी केले आहे. अशा या महान नेत्याला राज्य पोरके झाले आहे. नव्हे तर आमचा लातूर जिल्हा पोरका झाला आहे. मराठवाडा पोरका झाला आहे. त्याने मराठवाड्याचे फार मोठे नुकसान झाले आहे.

श्री.बाबासाहेब कुपेकर यांनी विधानसभेचे अध्यक्ष असताना त्यांनी त्यांच्या दालनात मी आमदार असताना शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी बैठक आयोजित केली होती. त्यावेळी माननीय श्री.वसंतराव पुरके हे शिक्षण मंत्री होते, तर श्री.जयंत पाटील हे अर्थ मंत्री होते. त्यांनी निक्षून सांगितले होते की, शिक्षक आमदार सातत्याने सभागृहामध्ये प्रश्न मांडत असतात. हा प्रश्न सुटला पाहिजे. सामान्यांच्या प्रश्नांची जाण ठेवून काम करणारे श्री.बाबासाहेब कुपेकर यांचे नेतृत्व होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दिग्गज नेत्यांपैकी एक होते. श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे व्यक्तिमत्व आगळेवेगळे होते. मुंबईसारख्या राजधानीत बसून, मातोश्रीमध्ये बसून महाराष्ट्राला कंट्रोल करणारे आगळेवेगळे नेतृत्त्व श्री.बाळासाहेब ठाकरेंच्या रूपाने महाराष्ट्राला लाभले होते. अशा या महान नेत्यांना मी माझ्या राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल खान दुर्राणी (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदय, भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, श्री.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, श्री.बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष, विधान सभा, श्री.शंकरराव चव्हाण, माजी अध्यक्ष, विधान सभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे, तसेच सर्वश्री विठ्ठलराव दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे यांच्या दुःखद निधना निमित्त सभागृहाचे आदरणीय नेते श्री.अजित पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

मी श्री.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री यांच्याबद्दल माझ्या भावना व्यक्त करणार आहे. मराठवाड्यातील राजकीय जीवनामध्ये माझा श्री.विलासराव देशमुखांशी वारंवार संबंध आलेला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांच्याकडे एखाद्या कामासाठी जायचो त्यावेळी अत्यंत हसतखेळत पत्र पाहूनच एण्डॉर्समेंट द्यायचे. त्यावेळी आम्हाला असे वाटायचे की, साहेबांनी पत्र वाचले की नाही. पण ते पत्र बरोबर संबंधित विभागाकडे जायचे. सर्वगुण संपन्न असे त्यांचे व्यक्तिमत्व होते, नेतृत्त्व होते. ते लवकर जातील असे वाटत नव्हते. श्री.अजितदादा पवार म्हणाले की, ते आजही आमच्यात आहेत असे वाटते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुला खान दुर्राणी...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एम.एम.शेख यांनी एक सामुदायिक सोहळा औरंगाबाद येथे ठेवला होता. त्यावेळी श्री.विलासराव देशमुख तेथे आले होते. त्यांना मी भेटून सांगितले की, मला विधानपरिषदेची उमेदवारी मिळालेली आहे. मला आपल्या मदतीची आवश्यकता आहे. त्यावेळी ते मला म्हणाले की, आपण चिंता करु नका. मी त्यांच्याकडे काही नगरसेवकांचे फोन दिले. त्यांनी सर्व कॉँग्रेसच्या नगरसेवकांना फोन करुन मला मदत करण्यास सांगितले. सर्वांना मदत करणारे व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले आहे याचे मला दुःख वाटत आहे.

सभापती महोदय, माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विषयी बोलावयाचे झाल्यास इंदिरा गांधी नंतर कोणत्या नेत्याचे नाव घ्यावयाचे असेल तर ते बाळासाहेब ठाकरे यांचे घेता येईल. माननीय बाळासाहेब ठाकरे यांचा जनतेशी सरळ संवाद होता. 1987 साली ते पाथरीला आले होते. त्यावेळी मी नगरपालिकेलचा अध्यक्ष होतो. मी त्यांचा सत्कार करण्यासाठी रेस्ट हाऊसला गेलो होतो. त्यावेळी तेथील शाखाप्रमुख श्री.दामू अण्णा होते. त्यांनी माननीय बाळासाहेब ठाकरे आणि माझी भेट घडवून आणली. मी त्यांचा तेथे सत्कार केला. त्यांच्या सोबत फोटो काढले. त्यांच्या सोबत काढलेला फोटो वर्तमानपत्रातील पहिल्या पानावर छापून आला होता आणि तो एक चर्चेचा विषय झाला होता. आजही तो फोटो माझ्या घरी आहे. त्यावेळी श्री.दिवाकर रावते त्यांच्या सोबत असतील. परंतु त्यावेळी मराठवाड्यामध्ये शिवसेनेचा प्रसार जास्त झाला नव्हता. आज मराठवाड्यामध्ये शिवसेना चांगली विस्तारली आहे आणि हे सर्व श्रेय श्री.दिवाकर रावते यांचे आहे. श्री.दिवाकर रावते यांनी शिवसेनेला एक चांगली ताकद मिळवून दिली आहे. माननीय शिवसेना प्रमुखांच्या निधनाची बातमी आम्हाला समजली त्यावेळी आम्ही एका कार्यक्रमामध्ये होतो. आम्ही तो कार्यक्रम लगेच रद्द केला. लोकांनी उत्स्फूतपणे दुकाने बंद केली. माननीय बाळासाहेब ठाकरेंच्या अत्यंयात्रेस अलोट जनसागर लोटला होता. काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने खूप लोकप्रिय होतात. बाळासाहेबांवरील असलेल्या प्रेमापोटीच त्यांच्या अत्यंयात्रेस अलोट जनसागर लोटला होता, अशा मोठ्या नेत्याला मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुला खान दुर्राणी...

सभापती महोदय, श्री.बाबासाहेब कुपेकर हे चार वेळा विधानसभेवर निवडून आले होते. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळावू होता. विधानसभेचे अध्यक्ष असताना सभागृहात बाक्या प्रसंगाच्या वेळी देखील त्यांनी दोन्ही बाजूच्या सदस्यांना शांत ठेवून सभागृहाचे कामकाज अत्यंत नीटनेटकेपणे चालविले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांना आदरांजली व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, सभागृहाच्या सन्माननीय नेत्यांनी आठ दिवंगत नेत्यां विषयी जो शोकप्रस्ताव आणलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी व भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.विलासराव देशमुख हे मराठवाड्याचे द्रष्टे नेते होते. त्यांचे वक्तृत्व अफलातून होते. त्यांच्या वक्तृत्वाचा मी लोभी होतो. श्री.विलासराव देशमुख यांना संपूर्ण महाराष्ट्राच्या भौगोलिक, राजकीय आणि सामाजिक परिस्थितीची माहिती होती.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

सभापती महोदय, त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय आकर्षक होते. दाद द्यावी तर ती श्री. विलासराव देशमुखांनी आणि दाद घ्यावी ती देखील श्री. विलासराव देशमुखांनी. सभापती महोदय, बीड जिल्ह्यामध्ये रेल्वे होण्याकरिता राज्य सरकारने आपला 50 टक्के वाटा उचलावा यासाठी बीड जिल्ह्यातील नेत्यांचे शिष्टमंडळाने त्यांना भेटून त्यांच्याकडे आग्रहाची मागणी केली. त्यावेळी त्यांनी एका क्षणामध्ये आमची मागणी मान्य केली व त्यानंतर बीड जिल्ह्यातील रेल्वेला मंजुरी मिळाली. कृष्णा खोऱ्यातील मराठवाडयाच्या हिश्श्याचे पाणी त्यांच्या काळातच मंजूर करण्यात आले. अशा या थोर नेतृत्वाला अवघा महाराष्ट्र आणि मराठवाडा मुकलेला आहे. ज्यावेळी त्यांची अंत्ययात्रा निघाली त्यावेळी त्यांच्या बाभळगावच्या बाभळीचे काटे देखील मलूल झाले होते. अशा या दिवंगत नेत्याला मी मन:पूर्वक आदरांजली, शब्दांजली वाहतो.

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुख हे माझ्या राजकीय जीवनाचे शिल्पकार आहेत. अतिशय आकर्षक, लोभस, प्रेमळ परंतु तरी देखील करारी व्यक्तिमत्व. शिवसेनाप्रमुख म्हणजे हिंदुत्वाचा अग्निकुंड, या अग्निकुंडातून बाहेर पडणाऱ्या निखाऱ्यावर जो बसे तो जळून खाक होई. माननीय शिवसेनाप्रमुखांची राष्ट्रनिष्ठा ही हिमालयाएवढी होती. शिवसेनाप्रमुखांचे राष्ट्रप्रेमाचे विचार हे या राष्ट्रातील तरुणांना प्रेरक होते त्यांच्या विचारांची ढग संपूर्ण देशाला बसत असे.

सभापती महोदय, मी मंत्रीमंडळामध्ये राज्यमंत्री असतांना माझ्या गाडीला अपघात झाला. बेस्टच्या बसने माझ्या लाल दिव्याच्या गाडीला धडक दिली. त्यावेळी मी जे.जे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असतांना माननीय शिवसेनाप्रमुख मला भेटायला आले. त्यांनी माझ्या डोक्यावरुन हात फिरविला. ते मला एवढेच म्हणाले की, तुझा अपघात कुणाशी झाला? मी म्हणालो, बेस्टच्या बस बरोबर. ते म्हणाले की, बेस्टची बस तर संपूर्ण लाल, तुझा दिवा तर एवढासाच लाल. त्या संपूर्ण लाल बेस्टच्या बससमोर तुझा एवढासा लाल दिवा काय करणार? त्यानंतर माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या त्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असल्यामुळे त्यांनाही भेटायला गेले. त्या हॉस्पिटलच्या डिनने मला सांगितले की, माननीय शिवसेनाप्रमुखांचा हजरजबाबीपणा कसा आहे? त्याकाळात शोभाताईंवर डाळीचे प्रकरण शेकत होते, अनेक आरोप-प्रत्यारोप होत होते. त्यावेळी शिवसेनाप्रमुख ताईंना म्हणाले की, "काय ताई, डॉक्टरांनी पथ्यपाणी करायला सांगितले असेल, डाळ वगैरे खाऊ नका." अशाप्रकारचा हजरजबाबीपणा त्यांच्यामध्ये होता. अशाप्रकारचे ते नेतृत्व होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

ज्यावेळी इतिहासाची पाने लिहिली जातील त्यावेळी शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे हे नाव अजरामर राहिल.

सभापती महोदय, मी मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाहेर पडलो त्यानंतर माननीय श्री. राणे साहेब हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळी आम्ही शिवसेनेमधून बाहेर पडलो असलो तरी तांत्रिकदृष्टया शिवसेनेमध्येच होतो. एक मनोरंजक किस्सा सांगितला जायचा.एकदा माननीय शिवसेनाप्रमुख विमानातून जात होते त्यांच्यासोबत श्री. मनोहर जोशी, श्री. सुधीर जोशी, श्री. प्रमोद नवलकर, श्री. नारायण राणे होते. पाठीमागच्या बाजूने वेडयांची प्रचंड ओरड, कोलाहल सुरु झाला. त्यामुळे माननीय शिवसेनाप्रमुखांनी श्री. सुधीर जोशींना सांगितले की, मागील बाजूने कोणता आवाज येतो जरा जाऊन पहा. ते जाऊन पाच ते दहा मिनिटांनी परत आले तरी कोलाहल वाढलेला होता. ते म्हणाल सुधीर जोशी, तुम्ही बसा हे तुमचे काम नाही. त्यानंतर श्री. प्रमोद नवलकर गेले व पंधरा मिनिटानंतर परत आले. तरीसुध्दा तो गोंगाट वाढलेला होता. वेडे मोठमोठयाने ओरडत होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:30

प्रा.सुरेश नवले . . . .

नंतर श्री.दत्ताजी नलावडे तेथे गेले. ते गेल्यानंतर 15 मिनिटामध्ये परत आले. मग बाळासाहेब म्हणाले की, प्रमोद नवलकर, मनोहर जोशी यांचे हे काम नाही. आता माझा नारायण राणे जाईल. त्याप्रमाणे श्री.नारायणसाहेब गेले आणि दोन मिनिटांमध्ये परत आले. त्यावेळी बाहेरील गोंगाट शांत झाला होता आणि याचा माननीय शिवसेना प्रमुखांना प्रचंड आनंद झाला. त्यांनी श्री.नारायण राणे यांना विचारले की, काय केले? त्यावर ते म्हणाले की, साहेब, काही नाही. मी दरवाजा उघडून सांगितले की, स्टँण्ड आला आहे. त्यावर माननीय शिवसेना प्रमुख त्यांना म्हणाले की, तू उद्या पासून महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असशील.

सभापती महोदय, शिवसेना प्रमुखांना एक गोष्ट पटली की कोणत्याही परिणामांची चिंता न करता ती गोष्ट स्वीकारुन ते निर्णय घेत असत. अशा एका मोठ्या माणसाला महाराष्ट्र मुकलेला आहे. त्यामुळे आदरणीय शिवसेना प्रमुखांना मी अतिशय विनम्रपणे मी माझी भावांजली, शब्दांजली अर्पण करतो.

----

3सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी विधान परिषदेचे सन्माननीय नेते माननीय श्री.अजितदादा पवारसाहेबांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाच्या संदर्भात मला बोलावयाचे आहे.याबाबत सांगावयाचे तर ज्यांनी स्व.अण्णासाहेब पाटील यांना माथाडी चळवळीमध्ये सातत्याने हातभार लावला आणि चळवळ वाढविण्यासाठी ताकद दिली अशा व्यक्तींचा सदनामध्ये उल्लेख होणे गरजेचे आहे म्हणून मी याठिकाणी बोलत आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी हिंदू हृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा जो शोक प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्यावर मी बोलणार आहे. मुंबईमध्ये काबाडकष्ट करणाऱ्या माथाडी कामगारांना संरक्षण मिळावे अशा प्रकारचा विचार स्व.अण्णासाहेब पाटील यांनी मांडला होता. त्यावेळेला स्व.यशवंतराव चव्हाण, स्व.नरेंद्रजी तिडके, स्व.अरुण मेहता,स्व.वसंतदादा पाटील अशा दिग्गज नेत्यांनी माथाडी कायद्याचे अस्तित्व मुंबईमध्ये निर्माण केले. मुंबईमध्ये मराठी माणसांसाठी, सामान्य माणसांसाठी लढणारे जे नेते होते त्या नेत्यांना स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी एक प्रकारची ताकद दिली.

सभापती महोदय, एक छोटीशी गोष्ट सांगतो. 1993 च्या दंगलीच्या वेळी काही माथाडी कामगार प्रातर्विधी साठी खाली उतरले आणि त्यांनी तेव्हा मशिद बंदर परिसरामध्ये ट्रकमधून काही माल रिकामा केला जात असल्याचे पाहिले. त्यावेळी तलवारीची एक गोण खाली पडली होती आणि काही लोक तलवारी उचलत होते. ही गोष्ट संबंधितांनी पाहिल्यानंतर त्या दहशतवाद्यांनी माथाडी कामगारांना मारले.त्यामुळे दुसऱ्या दिवशी सर्व माथाडी कामगारांनी आपले काम बंद ठेवले होते. दुसऱ्या दिवशी आदरणीय श्री.अजितदादा पवारसाहेब तेथे आले होते. स्व.कामगार मंत्री श्री.अरुण मेहता देखील आले होते. त्यानंतर मुंबईमध्ये दंगलीला सुरुवात झाली आणि त्याच वेळी मोठ्या प्रमाणात शाखा प्रमुखांनी माथाडी कामगारांना संरक्षण देण्याचे काम केले.

सभापती महोदय, स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी माथाडी चळवळीवर प्रेम केले. कारण ज्या वेळी महाराष्ट्रामध्ये युतीचे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर कै.आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना माननीय माजी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी साहेबांच्या माध्यमातून करण्यात आली. नंतर माननीय श्री.नारायण राणे मुख्यमंत्री झाले. त्यावेळेला घणसोली आणि कोपरखैरणे येथे माथाडी कामगारांना घरे देण्यात आली. स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी सातत्याने स्व.अण्णासाहेब पाटील आणि माथाडी कामगार यांच्यावर प्रेम केले. खरे म्हणजे मला त्यांच्याबरोबर काम करण्याची

3सी-3 . . . .





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कधीच संधी मिळाली नाही. परंतु सातत्याने माथाडी चळवळ आणि माथाडी कामगार हे सदैव स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल बोलत असतात. त्याचवेळी मुंबईतील दंगल थांबविण्याचे काम हे माननीय श्री.शरद पवारसाहेब संरक्षण मंत्री असताना झालेले आहे.

सभापती महोदय, याठिकाणी दुसरी बाब सांगावयाची तर माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाल्याचे समजल्यानंतर माथाडी कामगार निराश झाला. त्यादिवशी संपूर्ण एपीएमसी मार्केट आणि ज्या-ज्या ठिकाणी माथाडी कामगार काम करीत होते, त्यांनी आपापली कामे पूर्णपणे बंद करुन त्यांच्या शोकसभेसाठी उपस्थित राहिले. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे साहेबांचे निधन होण्यापूर्वी मला सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांच्याबरोबर त्यांना भेटण्याची संधी मिळाली होती. श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाल्यानंतर मी देखील माथाडी कामगारांच्यावतीने दु:ख व्यक्त केले होते.

सभापती महोदय, मला याठिकाणी स्व.विलासराव देशमुख साहेब यांचा देखील उल्लेख केला पाहिजे. 1999 मध्ये निवडणूक झाल्यावर पहिल्यांदाच युती सरकार सत्तेवर आले. तेव्हा माथाडी कामगारांबाबत हा केवळ राष्ट्रवादी पक्षाचा कामगार नव्हेतर हा माथाडी कामगार आहे आणि कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा मला अधिकार आहे अशी त्यांनी भूमिका मांडली.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील .....

सिडकोच्या नवी मुंबईच्या परिसरामध्ये पहिल्यांदा तीन हजार घरे माथाडी कामगारांसाठी सिम्प्लेक्स टेक्नॉलॉजीचे तंत्रज्ञान वापरुन घरे देऊ करण्याचे काम श्री. विलासराव देशमुख यांनी केले. श्री. विलासराव देशमुख हे एकमेव असे मुख्यमंत्री होते की, ज्यांनी आघाडी सरकारच्या काळामध्ये माथाडी कामगारांच्या मेळाव्यात प्रत्यक्षामध्ये भाग घेऊन सदैव कामगारांच्या पाठीशी राहण्याचे वचन दिले. श्री. विलासराव देशमुख यांचे ज्यावेळी निधन झाले त्यावेळी माथाडी कामगार मोठ्या प्रमाणामध्ये शोकाकुल झाले. कारण आघाडी सरकारमध्ये ते एकमेव असे मुख्यमंत्री झाले की, ज्यांनी माथाडी कामगारांना घरे देण्यासाठी आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी ताकद दिली. मी कै. आमदार अण्णासाहेब पाटील आणि महाराष्ट्रातील संपूर्ण माथाडी चळवळीतर्फे या सर्व दिग्गज नेत्यांना मानाचा मुजरा करतो आणि शोक व्यक्त करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या अनुषंगाने शोक व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सतत हसतमुख आणि स्ट्राँग मराठी स्पिरीट असलेले नेते म्हणून श्री. विलासराव देशमुख यांची ओळख होती. प्रत्येक प्रश्नाला उत्तर देताना केसांमधून हात फिरवून उत्तर देणे हे त्यांचे ट्रेडमार्क होते. संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या नेतृत्वाने त्यांनी एक कुटुंब तयार केले. मैत्री व संबंध पक्षविरहित टिकविण्याची कुशलता त्यांच्याकडे होती. आघाडीचे पहिले मुख्यमंत्री म्हणून श्री. विलासराव देशमुख साहेबांनी शपथ घेतली व अतिशय कठीण परिस्थितीमध्ये सक्षमपणे आणि कुशलतेने सरकार चालविले. त्यांच्याशी ज्यांचा ज्यांचा संपर्क आला त्यांच्या मनात स्थान निर्माण करण्याचे श्री. विलासराव देशमुख यांचे व्यक्तिमत्व होते. निश्चितपणे माझ्यासारख्या प्रत्येक युवकाला प्रेरणा आणि शिकवण देणारे त्यांचे जीवन हे आम्हाला नेहमीच आदर्श राहील.

सभापती महोदय, फटकळपणाचा महामेरु, 'व्यंगविनोदाचा आधारु, मराठी चैतन्याचे तारु' असे श्री. बाळासाहेब ठाकरे 17 नोव्हेंबरला आपल्यातून हरपले. आपण दिलेल्या शब्दाची जर आपणच किंमत केली नाही तर दुसरा कोणी करील याची अपेक्षाही करु नये आणि दिलेल्या शब्दासाठी वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल पण समोरच्याला न्याय मिळवून द्यावयाचा हे आदरणीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे तत्व होते. आमची पिढी भाग्यवान आहे की, अशा दिव्य व्यक्तिमत्वाला आम्हाला बघावयास मिळाले. त्यापेक्षाही जास्त भाग्यवान आमच्यापेक्षा सिनियर सदस्यांची पिढी आहे. कारण आपल्यापेक्षा त्यांना जास्त अनुभवावयास मिळाले, त्यांच्याशी संपर्क साधण्याची संधी मिळाली, त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. सत्ता नाही, संपत्ती नाही पण तरीही त्यांच्या अंत्ययात्रेला लाखो लोकांचा जनसागर आलेला होता. त्याचे कारण हेच होते की, शब्दांची संपत्ती आणि सामान्य माणसाच्या मनावर बाळासाहेबांनी नेहमीच सत्ता गाजवली. मी माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आदरणीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

भारताचे माजी पंतप्रधान श्री. इंद्रकुमार गुजराल यांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे देशामध्ये राजकीय अस्थिरता असताना सुध्दा त्यांनी आपल्याकडे पंतप्रधान म्हणून केंद्र सरकारची धुरा घेतली आणि देशाची सत्ता चांगल्या प्रकारे चालविण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, श्री. विलासराव देशमुख साहेबांशी माझा जो संबंध आहे त्यामध्ये या अधिवेशनाचाही एक संबंध आहे. 21-22 वर्षापूर्वी साधारणत: 1988 साली नागपूरचे अधिवेशन सुरु असताना धनगर समाजाच्या, भटक्या विमुक्तांच्या सवलतींसाठी आम्ही अधिवेशन काळात एक मोठा मोर्चा आयोजित केला होता. त्यावेळी आदरणीय श्री. शरद्चंद्रजी पवार राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांना त्या मोर्चाची कल्पना दिली होती. साहेब त्या मोर्चाला सामोरे जाणार होते. जवळजवळ 70 ते 80 हजार लोक उपस्थित असलेल्या त्या मोर्चाला सामोरे गेले पाहिजे असे त्यांचे मत होते. पण आदरणीय श्री. पवार साहेब एक महत्वाची बैठक असल्यामुळे दिल्लीला गेले. पण त्यांनी दिल्लीवरुन फोन करुन आदरणीय श्री. विलासराव देशमुख यांना सांगितले की, आपल्याला या मोर्चाला सामोरे जावयाचे आहे आणि राज्य मंत्रिमंडळाच्या वतीने, शासनाच्या वतीने आपण या मोर्चाला सामोरे जावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

मोर्चा समोर काय सांगायचे ते आपणच सांगा असे आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी विलासराव देशमुख साहेबांना सांगितले. त्यावेळी त्यांच्याकडे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास अशी खाती असावीत. त्यावेळी मोर्चाला सामोरे जातांना विलासराव देशमुख साहेबांनी जे भाषण केले ते त्यांचे भाषण आम्हाला पहिल्यांदा ऐकण्याचा योग आला. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी सांगितले होते की, या समाजाला आपल्याला सवलती द्यायच्या आहेत. त्या सवलती जाहीर करा. कारण लगेच एक वर्षानंतर निवडणुका होणार होत्या. त्यावेळचे विलासराव देशमुख यांचे भाषण मला आजही चांगले आठवते. त्यांनी सांगितले की, माझ्या खांद्यावर हे जे घोंगडे टाकलेले आहे त्या घोंगड्यातील उभे आणि आडवे धागे जसे घट्ट आहेत, ते कुणी वेगळे करण्याचा प्रयत्न केला तरी वेगळे होणार नाहीत, त्याप्रमाणे तुमचे आणि आमचे नाते घट्ट आहे. आमच्या पासून तुम्हाला कुणीही वेगळे करण्याचा प्रयत्न केला तरी तुम्ही आमच्या पासून वेगळू होऊ शकत नाही. तुमच्यासाठी जे काही करणार आहोत ते आदरणीय श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली करणार आहोत. त्यानंतर आमच्या समाजाला भटक्या/विमुक्तांच्या सवलती मिळू लागल्या. आमच्या समाजाला सवलती मिळण्यासाठी विलासराव देशमुख साहेबांनी आदरणीय श्री. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न केले. मी त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहतो.

स्वर्गीय शंकरराव जगताप साहेब हे बहुजन समाजातील हुशार व्यक्तिमत्व. केवळ बहुजन समाजाचा म्हणून नाही तर एक हुशार आणि अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना विधान सभेचा अध्यक्ष होण्याची संधी मिळाली. त्यामधून त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा महाराष्ट्रावर उमटविला. मी त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

स्वर्गीय बाबासाहेब कुपेकर साहेब हे सहकार राज्यमंत्री असताना मी त्यांच्याकडे एक काम घेऊन गेलो होतो. त्यांनी अधिका-यांना बोलावून माझ्या सारख्या एका छोट्या कायकर्त्यांचे काम करण्याचे निदेश दिले. तळागाळातील लोकांसाठी काम करणारे बाबासाहेब कुपेकर यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.

शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या बद्दल आमच्या मनात लहानपणापासूनच अत्यंत आदर होता. मी वांद्रे येथे रहात असताना कधी वांद्रे पूर्वेला तर कधी वांद्रे पश्चिमेला तर कधी गांधीनगरमध्ये होणा-या त्यांच्या सभा ऐकण्यासाठी लहान मुलांबरोबर मी देखील गाड्यांमध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

बसून जात असे. मी एक गोष्ट या ठिकाणी मुद्दाम नमूद करु इच्छितो की, या मुंबईमध्ये राहाणारा मराठी माणूस त्यांनी केन्द्रबिंदू मानला. माननीय प्रतिभाताई पाटील ह्या राष्ट्रपतीच्या उमेदवार जाहीर झाल्या त्यावेळी त्यांनी पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून महाराष्ट्राची एक पाटील कन्या देशाची राष्ट्रपती होत असल्यामुळे त्यांना पाठिंबा दिला. श्री. प्रणव मुखर्जी सारखे व्यक्तिमत्व हे देशाचे राष्ट्रपती झाले पाहिजे म्हणून त्यांना पाठिंबा देण्याची भूमिका त्यांनी घेतली. तसेच या मुंबई नगरीमध्ये उद्योग, व्यापार करणारे जे मराठी लोक आहेत त्यांना देखील शिवसेना प्रमुखांनी सहकार्य केलेले आहे.

माझा स्वत:चा अनुभव मी सांगतो. मुंबई बंदरामध्ये काम करीत असताना परप्रांतीय व्यापा-यांबरोबर संबंध येत होते आणि त्यावेळी आम्हाला त्रास होत होता. जेव्हा ही गोष्टी बाळासाहेबांच्या कानावर गेली त्यावेळी त्यांनी आपली पूर्ण टीम आमच्या संरक्षणासाठी पाठविली आणि आम्हाला जो काही त्रास होत होता त्यातून आमची सुटका केली. मराठी उद्योजक, मराठी व्यापारी या मुंबईमध्ये टिकावा यासाठी त्यांनी स्थानीय लोकाधिकार समिती मार्फत प्रयत्न केले. ज्या दिवशी बाळासाहेबांचा अंत्यविधी होता त्यावेळी कसेही करुन बाळासाहेबांचे अंत्य दर्शन घ्यायचेच अशी खूणगाठ मी मनाशी बांधली. अंत्ययात्रेला खूप गर्दी होती. आदरणीय श्री. शरद पवार हे महापौर बंगल्यावर बसून होते. एवढी प्रचंड गर्दी असताना देखील त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्याचा योग मला आला. ज्या ठिकाणी शिवसेना प्रमुखांचा देह ठेवलेला होता त्या ठिकाणी प्रत्यक्ष जायला मिळेल की नाही अशी शंका माझ्या मनात होती. परंतु त्या ठिकाणी श्री. रामदास आठवले होते. त्यांची आणि माझी चांगली ओळख आहे. अनेक मान्यवर व्यक्ती देखील तेथे होत्या. त्यांच्या बरोबरीने मला शिवसेना प्रमुखांचे जवळून अंत्यदर्शन घेण्याची संधी मिळाली.

सभापती महोदय, मुंबईमध्ये दोन अतिरेकी आले होते. त्यांना पकडल्यानंतर त्यांच्याकडे बाळासाहेबांचा फोटो सापडला होता. त्यावेळी मी चिंतित झालो होतो. थेट भारतावर हल्ला न करता ज्या व्यक्तीवर या मुंबईतील आणि महाराष्ट्रातील लाखो लोक अवलंबून आहेत, ज्यांच्यावर ते प्रेम करीत आहेत अशा व्यक्तीवरच हल्ला करण्याचा कट अन्य राष्ट्रातून रचला गेला होता. त्याबद्दलही मी फार चिंतित झालो होतो. मी बाळासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करतो.

तसेच श्री. विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, श्री. कन्हैयालाल गिडवाणी व श्री. सदाशिवराव शिंदे यांनाही मी श्रद्धांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

.....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी भारताचे माजी पंतप्रधान श्री.इंद्रकुमार गुजराल, सर्वश्री विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, बाबासाहेब कुपेकर, वि.स.स. व माजी अध्यक्ष,विधानसभा, शंकरराव जगताप,माजी अध्यक्ष,विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा,कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिव शिंदे, माजी वि.व.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या दिवंगत नेत्यांमध्ये महाराष्ट्राला उत्तुंगता देणारी दोन मोठी व्यक्तिमत्व आहेत, त्यात विलासराव देशमुख व आमचे आदरणीय साहेब शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आहेत. या सभागृहात विलासराव देशमुख यांचे राजकीय व्यक्तिमत्व आम्ही अनुभवत होतो. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य विलासराव देशमुख यांच्या बद्दल बोलले. मराठवाडयाचे मुख्यमंत्री म्हणून मला विलासराव देशमुख यांचा नेहमीच अभिमान आहे. ते मराठवाडयातील मुख्यमंत्री होते म्हणून त्यांच्या विरोधात मी कधीही येल्गार केला नाही. त्यांचे मराठवाडयात कौतुक करण्यासारखेच काम होते. आमचे नेहमी संघर्ष होत असत. परंतु त्यांनी मराठवाडयाला 25 द.ल.मि.लि. पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. माननीय श्री.अजितदादा पवार यांनी मराठवाडयाला तेवढे पाणी दिले जाणार नाही असे सभागृहात आम्हाला सांगितले. मराठवाड्यात मंत्रिमंडळाची बैठक झाली, त्या बैठकीमध्ये माननीय विलासराव देशमुख यांनी मराठवाड्याला 25 द.ल.मि.लि.पाणी देण्याचा देण्याचा निर्णय घेतला. माननीय विलासराव देशमुख यांनी मराठवाडयात आयोजित केलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयामुळे मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळणारच अशा प्रकारचा आशावाद आज निर्माण झालेला आहे. मराठवाडयातील जनता त्यांची ॠणी राहील. मराठवाडयास पाणी मिळेल की नाही याचा आपण नंतर विचार करु. या निर्णयावर इतरांची सही का उशिरा झाली त्याचे मला अजूनपर्यंत उत्तर मिळालेले नाही. माननीय विलासराव देशमुख यांनी मराठवाडयासाठी निर्णय घेतला, तो फार मोलाचा आणि महत्वाचा होता.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, याच सभागृहामध्ये माननीय विलासरावांना काटछाट करताना पाहिलेले आहे. श्री.अनिस अहमद, विलासराव देशमुख आणि आमचे माननीय गडकरी साहेब यांच्यात झालेले युध्द देखील आम्ही पाहिले. स्वतःच्या पक्षातील मंत्री मुख्यमंत्र्यांना आव्हान करतो, तरी देखील माननीय विलासरावांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळातून काढले नाही. मंत्र्यांच्या विरोधाचा देखील विलासरावांनी सन्मान केला ती गोष्ट देखील आम्ही अनुभवली आहे. माननीय श्री.नारायण राणे यांनी सभागृहात अविश्वासाचा जो प्रस्ताव आणला होता, तो प्रस्तात त्यांनी हसत खेळत उधळून लावला तोही अनुभव आम्ही पाहिलेला आहे. माननीय विलासराव देशमुख यांचे नेतृत्व राजबिंडे असे होते. ते लातूर मतदार संघातून एकदा पराभूत झाले. लातूर शहराच्या प्रमुख चौकामध्ये विश्वेश्वरय्यांचा पुतळा बसविण्याचा निर्णय झाला होता. त्या जागेवर माननीय विलासरावांनी कॉंग्रेस पक्षाची निष्ठा दाखवत राजीव गांधी यांचा पुतळा बसविला. आजही तो पुतळा तेथे उभा आहे. विश्वेश्वरांच्या समाजाचे सर्व माणसे एकत्र आली आणि निवडणुकीत विलासरावांचा पराभव केला. त्यानंतर त्यांनी त्या समाजाला पुन्हा एकत्र करुन प्रतिष्ठीत चौकात विश्वेश्वरय्यांचा पुतळा उभारला. त्यानंतर ते पुन्हा विधानसभेवर निवडून आले. ज्यावेळी ते विधानसभेच्या निवडणुकीत पडले, त्यावेळी ते अस्वस्थ झाले होते व आमच्या मातोश्रीवर आले होते. ती मातोश्री आजही माझ्या डोळयासमोर उभी आहे. माँ साहेब गेल्या, त्यावेळी मातोश्रीतून आमचे मातृत्व वात्सल्य गेले होते. आता आमचे मोठे साहेब गेले. आमचा देवच मातोश्रीतून गेला. माननीय विलासराव देशमुख यांना मातोश्रीवर बाळासाहेबांनी आशीर्वाद दिले.

महोदय, माननीय शिवसेनाप्रमुख हे कृष्णकुंज येथे रहात होते.शालेय जीवनात वाचन करुन मी माननीय प्रबोधनकारांना भेटावयास जात असे. त्यावेळी मी "मार्मिक"चा वेडा होतो. त्या घरण्याशी माझे जवळचे संबंध निर्माण होत गेले. त्यावेळी माननीय बाळासाहेब हे नोकरी करण्यासाठी रेल्वेतून जात होते. प्रबोधनकार तेथे असावयाचे. शालेय, महाविद्यालयीन जीवनामध्ये शिवसेनाप्रमुखांचे "मार्मिक"मध्ये येणारे घणाघाती लेख मी नियमित वाचत असे. या ठिकाणी "मार्मिक"च्या बाबतीत सांगितले गेले की, मार्मिकमध्ये मुंबईच्या दूरध्वनींची यादी छापून आली, त्यात मराठी माणसे किती आहेत ते पहा. आता भ्रमणध्वनी आले त्यामुळे डायरीचा संबंध येत नाही.

3...

श्री.दिवाकर रावते...

शिवसेना स्थापन होण्यापूर्वीचा संपूर्ण काळ माझ्या स्मरणात आहे. दिवाकर रावते आणि शिवसेनाप्रमुखांचे कुटुंबीयांचे संबंध यासंबंधी बोलण्याची ही वेळ नाही. आमचे मातोश्री बरोबर असलेले नाते मी या ठिकाणी सांगू शकत नाही. दिवाकर रावते पासून ते त्यांच्या चार वर्षाच्या नातीपर्यंत आमचे संबंध आहेत. मातोश्रीने आम्हाला जिवापाड प्रेम दिले आहे. बाळासाहेबाबद्दल बोलण्याची ही आम्हाला शेवटची संधी आहे. यापुढे आम्ही बोलू की नाही या बाबतीत सांगू शकत नाही. माननीय  शिवसेनाप्रमुख आमचे सर्वोच्च आहेत. त्यामुळे मला शेवटी बोलण्याची संधी द्यावी अशी सभापती महोदय मी आपणास विनंती केली आहे. मी शेवटी का बोलणार आहे, त्याची कारणे देखील मी आपणाला सांगितली आहेत.

सभापती महोदय, पहिला मेळावा 30 ऑक्टोबर 1966 रोजी भरविण्यात आला होता. त्या मेळाव्याची दोन दिवसापूर्वी पासून तयारी सुरु केली होती. त्यावेळी व्यासपीठ 20 फुटाचे नसायचे, त्यावेळी व्यासपीठ फक्त 12 फुटाचे असावयाचे. त्या व्यासपीठावरील माननीय शिवसेनाप्रमुखांचे मी प्रथम भाषण ऐकले. त्या व्यासपीठावर रामराव आदिक होते, माझ्या जीवनात एकही मेळावा मी सोडला नाही. प्रत्येक मेळाव्याला मी हजर राहिलेलो आहे. मी त्या व्यासपीठावर माननीय शरदराव पवार यांना पाहिले...

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:50

श्री.दिवाकर रावते..........

त्या व्यासपीठावर जॉर्ज फर्नांडिसना पाहिले, रा.सु.गवई यांना पाहिले. शिवशक्ती-भीमशक्ती एकत्र आणण्याकरिता तो प्रयोग झाला होता. अनेक दिग्गजांची भाषणे त्या व्यासपीठावरुन ऐकली. परंतु शिवसेनाप्रमुख हे अभंग असे व्यक्तिमत्व होते. एक नेता, एक मैदान कायमस्वरुपी असे होते. शिवाजी पार्कचे काय महत्व असेल मला माहिती नाही. परंतु ज्या सार्वजनिक मैदानाला शिवाजी पार्क म्हणून 1997 साली नाव देण्यात आले ते मैदानच जणू एका नेत्याकरिता जन्माला आले का? त्या शिवाजी पार्कवर शिवसेनेचा जन्म झाला. त्या शिवाजी पार्कला अनन्यसाधारण असे महत्व आहे. शिवतीर्थ म्हणून ज्याचा उल्लेख केला जातो त्या शिवाजी पार्कवरील प्रत्येक क्षण मला आठवतो.

उत्तुंग असे कोणते घोषवाक्य शिवसेनाप्रमुखांनी केले असेल? मुद्दाम मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. ब्राम्हण ब्राम्हणेतर, मराठा मराठेतर 92 कुळी 96 कुळी, स्पृश्य अस्पृश्य , घाटी, कोकणी, दलित दलितेतर अशा सर्व वाद घालणाऱ्या मराठी माणसाची एकजूट करणारे शाहू, फुले, आंबेडकरांना अभिप्रेत असणारे घोषणावाक्य पहिल्यांदा शिवसेनाप्रमुख घेऊन आले. हे वाक्य घेऊन त्यांनी शिवसेना स्थापन केली. महाराष्ट्रामध्ये मराठी माणसाला अवमानित करणारा एकमेव शब्द वापरला जायचा. अरे घाटी बाजूला हो ना. तू घाटी आहेस ना. घाटी म्हणजे मराठी माणूस निकम्मा. मग शिवसेनाप्रमुखांचा या वाक्यातून अवतार झाल्यानंतर कोणी घाटी म्हटल्यानंतर खाडकन कानाखाली आवाज काढणारा मराठी माणूस रेल्वेमध्ये, बसमध्ये, रस्त्यावर दिसायला लागला. त्या घाटी या नावाला आदरार्थ निर्माण झाला. त्या घाटावरच्या लोकांनी या महाराष्ट्रात राज्य केले त्या घाट्यांना अवमानित करणाऱ्या शब्दाला शिवसेनाप्रमुखांनी सन्मान द्यायला लावला. ती शिवसेना महाराष्ट्रामध्ये अवतीर्ण झाली. ही शिवसेना जातीपातीच्या पलीकडे आहे हे त्यांनी सिध्द करुन दाखविले. जे बोलले ते करुन दाखविले.

शिवसेनेने नगरसेवक, आमदार, खासदार कोणत्या जातीचे आहेत हे बघितले नाही. कोणत्याही जाती जोपासणाऱ्या पक्षातील लोकांपेक्षा शिवसेनेने सर्वाधिक लोक निवडून आणून दाखविले. जाती पलीकडे या महाराष्ट्रामध्ये खरे शाहू, खरे फुले, खरे आंबेडकर निर्माण करुन दाखविले. शिवसेनाप्रमुखांनी मराठी मराठी म्हणून हे सर्व करुन दाखविले. सत्तेचा त्याग केला. शिवसेनाप्रमुख नेहमी म्हणायचे. शिवसेना ही अस्वलासारखी आहे. अस्वलाचा एक केस उपटला गेला तरी फरक पडणार नाही. नारायण गेला, अमुक गेला, तमुक गेला, काही फरक पडत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:50

श्री.दिवाकर रावते..........

सत्ता त्यागातून अशी ताकद शिवसेनाप्रमुखांनी निर्माण केली.

सभापती महोदय, माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांनी उल्लेख केला की, शिवसेनाप्रमुखांनी सत्ता कधी स्वीकारली नाही. हे शिवसेनाप्रमुखांचे देशापुढील एकमेव वैशिष्ट्य आहे. ते जाहीर भाषणात बोलायचे की, सत्ता नाही मिळाली तरी चालेल. परंतु पाकधार्जिण्या मुसलमानांची मते आम्हाला नको. देशामध्ये मुस्लिमांच्या मतांचे लांगूलचालन सुरु असताना बेधडक बोलणारे अद्वितीय असे एकमेव शिवसेनाप्रमुख होते.

सभापती महोदय, 1989 मध्ये लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली. शिवसेनेचे प्रकाश परांपजे हे खासदार होते, आता ते दिवंगत झाले आहेत. ठाण्यातील निवडणुकीमध्ये स्व.प्रकाश परांजपे हे शिवसेनेतर्फे व श्री.मनोहर साळवी हे काँग्रेसचे उमेदवार होते. शिवसेनेचे मत फुटले. शिवसेना पराभूत झाली. साळवी हे निवडून आले. शिवसेनेच्या 31 नगरसेवकांचे राजीनामे घेऊन शिवसेना सत्तेपासून बाजूला झाली. पक्षाशी बेईमानी केल्यामुळे तुम्हाला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही असे सांगून 31 नगरसेवकांचे राजीनामे घेणारा एकमेव महाराष्ट्रातील नेता म्हणजे शिवसेनाप्रमुख होय. आता आयाराम गयारामचे दिवस सुरु झालेले आहेत. एक इकडे जातो, एक तिकडे जातो, पद मिळाले नाही की भांडतो. 31 नगरसेवकांचे राजीनामे घेतल्यामुळे एक हाती दीड वर्ष सत्ता काँग्रेसकडे राहिली. सत्तेचा लोभ असू शकत नाही हे सांगणारे शिवसेनाप्रमुख होते.

बोफोर्स प्रकरणानंतर श्री.विश्वनाथ प्रताप सिंग यांनी देशाला हाक दिली. त्यांच्या हाकेला ओ देणारे शिवसेनाप्रमुख प्रथम पुढे आले. ते म्हणाले माझ्या खासदारांचे राजीनामे तयार आहेत, देशाचे राज्य कधी घेतो सांग असे त्यांनी विश्वनाथ प्रताप सिंग यांना आणि विरोधी पक्षाला जाहीर आव्हान दिले. झुंझायचे तर मर्दासारखे झुंझायचे असते. त्या काळात सत्तेचा त्याग करुन दाखविणारे शिवसेनाप्रमुख आपल्या देशामध्ये होते.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सभापती महोदय, सीमा प्रश्न सर्वांनाच माहिती आहे. सीमा प्रश्नामध्ये संघर्ष केलेली आम्ही मंडळी आहोत. या सभागृहातील काही सदस्यांनी आमच्या अगोदरही संघर्ष केलेला आहे. सीमा प्रश्नाच्या संदर्भात 69 शिवसैनिकांचे बळी गेलेले आहेत. हे बळी अनकव्हर्ड महाजन रिपोर्टमध्ये असून अंतुले साहेबांनी हा अहवाल लिहिलेला आहे. महाजन अहवाल आपल्यावर लादत असतांना शिवसेना प्रमुखांनी आंदोलन उभारले आणि महाजन अहवाल कायमचा गाडला गेला. आता पर्यंत सीमा प्रश्न जीवंत राहिला तो त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुखांनी निर्माण केलेले आंदोलन, त्यामध्ये भोगलेला तुरुंगवास, शिवसैनिकांचे बलिदान यामुळेच आपण ठराव करतो, भाषणे करतो व सीमा भागातील जनतेकरिता ठामपणाने उभे राहतो. सीमा वासियांना शिवसेना आपल्यामागे उभी आहे या विश्वासावर ते जगत आहेत.

भारतीय सेना, कामगार सेनेचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी केलेला आहे त्यामुळे त्यावर जास्त बोलणे उचित होणार नाही. सुरुवातीच्या काळात मंत्रालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी संप केला होता. त्या संपकरी कर्मचाऱ्यांचा मेळावा शिवतीर्थावर झाला होता. त्या मेळाव्यात शिवसेना प्रमुखांनी सन्मानाने मंत्रालयाच्या पायऱ्या चढा, माझे काय होईल, शिवसेना संपेल की, मराठी माणूस संपेल यासंदर्भात त्यांना योग्य मार्गदर्शन केले. त्यावेळेस याविषयाच्या संदर्भात सर्वत्र निषेध झाला होता. परंतु कर्मचाऱ्यांच्या नंतर लक्षात आले की, सेना प्रमुखांनी आपल्याला जे सांगितले होते तेच खरे होते. गिरणी कामगाराच्या संपाच्या कामगार मेळाव्यात मी देखील हजर होतो. त्यावेळेस अंतुले साहेब मुख्यमंत्री होते. त्यावेळेस थोडे थांबा, दोन पावले मागे जाऊ, मागण्या करु परंतु आता ताबडतोब संप करावयाचा नाही असे मार्गदर्शन सेना प्रमुखांनी केले होते. परंतु त्यावेळी कामगारांनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही व त्यामुळेच कामगारांच्या प्रश्नासंदर्भात सभागृहात रोज प्रश्न मांडावे लागतात.

सभापती महोदय, कामगार क्षेत्रातील सर्व माहिती मी येथे वाचून दाखविणार नाही. शिवसेना प्रमुखांना विकासाची दृष्टी आहे का ? अशी शंका उत्पन्न करण्यात आली होती. वीज बिल माफी, व्याज माफी अशा घोषणा युती शासनाने केल्या होत्या. आपल्या सरकारने शेतकऱ्यांना काही सवलती दिलेल्या आहेत. कापसाच्या भावा संदर्भात सेनाप्रमुखांनीच घोषणा केली होती.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

सभापती महोदय, मी अनेक प्रकारच्या दिंडया काढलेल्या आहेत. कापूस दिंडी, कापसाच्या भावाकरिता दिंडी काढली, आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी मी दींडया काढल्या आहेत. उध्वस्त भगिनींच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन करण्यासाठी मी दिंडी काढली होती. मी माझ्या उध्वस्त भगिनींना काही देऊ शकत नसलो तरी सांत्वन तरी करु शकतो व त्यासाठीच मी दिंडी काढली होती. अनवाणी पायाने मी 12500 कि.मी.ची दिंडी काढली होती.माझे पाय रक्ताने माखले होते. दिंडीच्या काळात मला माननीय शिवसेना प्रमुखांचा आठवडयातून दोनदा किंवा तिनदा फोन यायचा. ते मला फोनवरुन माझी तब्येत कशी आहे याची विचारणा करीत असत. 12500 कि.मी. अंतराची अनवाणी दिंडी काढण्याचे सामर्थ्य केवळ शिवसेना प्रमुखांमुळेच माझ्यात आले होते. सुरुवातीच्या काळात सेनाप्रमुखांनी मला सांगितले होते की, एवढे लांबचे अंतर पायी चालण्याचे धाडस करु नको. त्यावेळेस मी त्यांना सांगितले होते की, साहेब आपले सामर्थ्य माझ्या मागे उभे असल्यामुळे असे धाडस करणे मला काहीच अवघड नाही. त्यावेळेस त्यांनी मला सांगितले की, उद्या दुपारी तू माझ्याकडे ये. त्यांनी मला उध्वस्त भगिनींना सांत्वनेच्या संदर्भात स्वत:च्या हस्तक्षराचे पत्र दिले. मी त्या पत्राचा उल्लेख येथे करत नाही. त्यांनी माझ्याजवळ स्वत:चे पैसे भगिनींना देण्यासाठी दिले होते. त्यांचा शेतकऱ्यांच्या घरांसदर्भात आम्हाला जो ओलावा जाणवला तो फार मोठा होता. तो टीकेचा नसुन घरे उभारण्याचा आणि घरे सांभाळण्याचा ओलावा होता.

माननीय शिवसेना प्रमुखांकडे विकासाची दृष्टी होती त्यामुळेच त्यांनी मुंबई-पुणे महामार्ग,सागरी सेतू अशा कामांना चालना दिली. महाराष्ट्र टँकर मुक्त झाला पाहिजे, प्रत्येक गावाला पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे, शेतीला पाणी मिळाले पाहिजे ही जी दृष्टी होती ती विकासाचीच होती. यामध्ये माँ साहेबांचा फार मोठा दृष्टिकोन होता. नदी खोरे महामंडळ शिवशाहीच्या काळातच स्थापन झाले होते, कृषी करता कर्ज मुक्ती, व्याज मुक्त कर्ज ही घोषणा सुध्दा शिवशाहीच्या काळातच झाली होती. भारनियमन मुक्त महाराष्ट्र ही संकल्पना सुध्दा सेना प्रमुखांनीच जाहीर केली होती. 40 लाख झोपडपट्टीयांना मोफत घरे, जे मूळ मुंबईकर चाळीत राहत होते अशा लाखो भाडेकरुंच्या संरक्षणाकरिता पुनर्बांधणीचा

..3..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

निर्णय शिवसेना प्रमुखांनीच घेतला होता. गिरणी कामगारांना घरे देण्याचा निर्णय सुध्दा माननीय शिवसेना प्रमुखांनीच घेतला होता. कै. विलासराव देशमुख यांनी 60 हजार गिरणी कामगारांना घरे देऊ अशी घोषणा या सभागृहात केली होती.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

गिरणी कामगारांच्या घरांचा प्रश्न, झुणका भाकर प्रश्न, वृद्धाश्रमाचा प्रश्न, सैनिकी शाळेचा प्रश्न, असे अनेक प्रश्न माननीय शिवसेना प्रमुखांनी हाताळले. हे सर्व पाहता शिवसेनाप्रमुखांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी कोणती दृष्टी दाखविली नाही असा प्रश्न उभा राहतो.

सभापती महोदय, मंडल आयोगाचा देखील विषय होता. मंडल आयोगाला उघड उघडपणे विरोध करणारे शिवसेना प्रमुखच होते. जातीला पोट असले तरी पोटाला जात नसते असे सांगून आर्थिक निकषावर आरक्षण लागू करावे अशी ठोस भूमिका घेणारे शिवसेना प्रमुख हे एकमेव होते. श्री.भुजबळ हे शिवसेनेतून फुटले ते मंडल आयोगाकरिता नव्हे तर सत्तेकरिता फुटले. यासंबंधी जर काही चर्चा करावयाची असेल तर आपण माझ्या समोर यावे. मी त्याचा साक्षीदार आहे. मंडल आयोगासाठी शिवसेनाप्रमुखांनी आपले धोरण बदलले नाही. भुजबळ गेला तरी चालेल असा विचार त्यांनी केला. शिवसेनाप्रमुख आर्थिक निकषासाठी भांडत होते.

सभापती महोदय, त्यांचे पत्रकारांशी नाते काय होते हे सर्वांना माहिती आहे. तुझे नी माझे जमेना असेच ते नाते होते. शिवसेना प्रमुखांशिवाय महाराष्ट्रातील पत्रकारिता जीवंत वाटत नव्हती. त्यासंबंधातील सगळे अनुभव माझ्याकडे आहेत. सगळ्या पत्रकार परिषदांची माहिती माझ्याकडे आहे. देशामधील हे एकमेव नेतृत्व होते की, ज्या पत्रकारांनी त्यांच्याशी वाद घातले, लेखणीने शिवसेनेला नेहमी झोडले, ज्या पत्रकारांनी शिवसेनेची नेहमीच निंदानालस्ती केली, त्याच पत्रकारांचा सन्मान करणारे शिवसेनाप्रमुख एकमेव होते. मग ते श्री.विद्याधर गोखले, श्री.नारायण आठवले, श्री.संजय राऊत, श्री.संजय निरूपम, श्री.प्रीतीश नंदी, श्री.भरतकुमार राऊत या सर्वांना शिवसेनाप्रमुखांनी खासदार केले. अशा प्रकारची हिंमत आज पर्यंत कुठल्याही पक्षाची झालेली नाही. मी देखील पत्रकार आहे असे सांगून त्या पत्रकारांचा सन्मान त्यांनी करून दाखविला.

श्री.राम जेठमलानी, श्री.शरद जोशी यांचा आमच्याशी काहीही संबंध नाही. तरी देखील ते आमच्या पक्षाचे खासदार झाले. आमच्यासाठी संसदेमध्ये ते काय करतात यासंबंधीचा ब्र देखील शिवसेनाप्रमुखांनी कधी काढला नाही. दिले ते दिले, केले ते केले या उक्ती प्रमाणे शिवसेनाप्रमुख वागत होते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

येथे काही सन्माननीय सदस्य मघा पासून समाजाचा विषय मांडत आहेत. कवी शांताराम नांदगावकर हे दलित होते. त्यांना या सभागृहाचे सदस्यत्व शिवसेनेनेच दिले होते. माननीय श्री.बाळासाहेबांनी एका समाजाचा कधीच विचार केला नाही. येथे फक्त साहित्यिक आला पाहिजे एवढाच विचार त्यांनी केला होता. त्यामुळेच कवी शांताराम नांदगावकर या सदनाचे सदस्य झाले, हे आपणा सर्वांना माहीत आहेच.

असो धर्म आणि जात कुठला
जो जो या संस्कृतीत नटला,
म्हणू मराठी आम्ही तयाला,
नाते आमचे जडे तयाशी

या उक्ती प्रमाणे शिवसेनेची स्थापना झाली होती. मग तुम्ही हिंदू असू द्या, मुस्लिम असू द्या, ख्रिश्चन असू द्या, या महाराष्ट्राच्या मातीत नटलेला माणूस मराठी आहे. ही त्याची व्यापक व्याख्या होती. ही भूमिका शिवसेना प्रमुखांनी मांडली.

सभापती महोदय, ही शक्ती महाराष्ट्रातील नव्हती तर ती देशातील होती. शिवसेनाप्रमुख मुंबईतील मातोश्रीमध्ये बसून देशाला अशी काय साद घालायचे की, त्याने संपूर्ण देश हलायचा. हिंदुत्वाचा प्रचार केला म्हणून सहा वर्षे मतदानाला बंदी घातलेला देशातील एकमेव नेता म्हणजे माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे. हिंदुत्वावर निष्ठा असलेला देशातील हा एकमेव नेता होता. पाकिस्तानातील पत्रकार जेव्हा येथे आले तेव्हा मुंबईतील पत्रकारांनी विचारले की, पाकिस्तानातील लोक सर्वात जास्त कोणाला घाबरतात ? त्या पत्रकाराने जाहीर सांगितले की, आमच्या पाकिस्तानमध्ये शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना लोक घाबरतात.

माननीय श्री.लालकृष्ण आडवाणी यांनी दहा आतंकवाद्यांची यादी पाकिस्तान सरकारला दिली तेव्हा पाकिस्तानच्या तत्कालीन पंतप्रधानांनी सांगितले की, दहा आतंकवादी भारताच्या ताब्यात देण्यासाठी आम्ही विचार करू पण आम्हाला एकच माणूस पाहिजे. तो म्हणजे शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे. तो आम्हाला द्यावा. पार्लमेंटमध्ये ही चर्चा गाजली होती.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अमरनाथ यात्रेला अडथळा केला तर याद राखा. हाज यात्रा होऊ देणार नाही. हाज यात्रेचे लाड बंद करा, हे सांगणारे शिवसेनाप्रमुखच होते. आज सर्वोच्च न्यायालयाने हाज यात्रा दहा वर्षात बंद करून टाका असे आदेश दिले आहेत. द्रष्टेपणाचा हा एक मोठा विषय आहे. जे माननीय बाळासाहेब ठाकरे बोलले होते ते आता कोर्टाने मान्य केले आहे. शिवसेनाप्रमुख अशारितीने राष्ट्रीयत्व दाखवत होते. येथे बाबरी मशिदीचा संदर्भ सर्वांनीच दिला आहे. आपल्या नेत्याचा आदेश पणाला लावणारे शिवसैनिक देखील त्यांनी तयार केले. आज या देशात असा कुठला पक्ष आहे, संघटना आहे की, ज्या पक्ष प्रमुखाच्या शब्दावर कार्यकर्ते सर्वस्व पणाला लावतील ? शिवसेने मधील शिवसैनिक असा आहे की, आपल्या नेत्याकरिता सर्वस्व अर्पण करील.

सभापती महोदय, निधड्या छातीने श्रीमती इंदिरा गांधी यांना पाठिंबा देण्याचे काम शिवसेनाप्रमुखांनी केले. बांगला देशचे युद्ध जिंकल्यानंतर या देशाची माँ दुर्गा असे श्रीमती इंदिरा गांधी यांना संबोधून त्यांचे कार्टुन श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी काढले. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे आणि माननीय श्री.अटल बिहारी वाजपेयी या दोघांनी श्रीमती इंदिरा गांधी यांचे स्वागत केले होते.

श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली त्यावेळी संपूर्ण देशामध्ये शिखांचे

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

हत्याकांड सुरु झाले. महाराष्ट्रात माननीय बाळासाहेब ठाकरे शिखांच्या बाजूने उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, याद राखा, महाराष्ट्रात शिखांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही." त्यावेळी फक्त महाराष्ट्रात शिखांची हत्या झाली नाही. शिखांवर कोणी चालून गेले नाही. असे राष्ट्रीयत्व जपणारे शिवसेना प्रमुख होते.

सभापती महोदय, माननीय शिवसेनाप्रमुख बांगला देशीय घुसखोरांबद्दल बोलायचे ज्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. काश्मिरच्या प्रश्नावर बेधडक बोलणारे फक्त शिवसेना प्रमुखच होते. आतंकवाद्यांविरुध्द उघड उघड बोलणारे शिवसेना प्रमुखच होते. जगातील आतंकवाद्यांच्या यादीत पहिल्या क्रमांकावर शिवसेना प्रमुखच होते.

सभापती महोदय, दिल्लीमध्ये आमची सत्ता असताना देखील "समझोता एक्सप्रेसला" शिवसेना प्रमुखांनी उघड विरोध केला होता. आतंकवाद थांबत नसेल तर आमच्या देशात पाकिस्तान बरोबर क्रिकेट सामने खेळले जाणार नाहीत म्हणून खेळपट्टी उखडून टाकणारे शिवसेना प्रमुखच होते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भाषणात हिंदुत्वाबद्दल एक चांगले उदाहरण दिले. आमचे हिंदुत्व फक्त शेंड्या व जानव्याचे नाही. जपान मधील नागरिकास जपानी म्हटले जाते, चीन मधील नागरिकास चीनी म्हटले जाते. रशिया मधील नागरिकास रशियन म्हटले जाते. अमेरिकेमधील नागरिकास अमेरिकन म्हटले जाते. जगाच्या पाठीवर हिंदूचा एकमेव देश आहे. मग तुम्ही कोणी असो, ख्रिश्चन असो, मुस्लिम असो या देशामध्ये राहणारा प्रत्येक नागरिक हा हिंदुच आहे अशी हिंदुची व्याख्या सांगणारे शिवेसना प्रमुख होते. हिंदुस्थानातील नागरिक जगाच्या पाठीवर हिंदू म्हणूनच ओळखला गेला पाहिजे ही त्यांची भावना होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास घटनादत्त नागरिकत्व दिले ते हिंदुत्व आहे हे सांगणारे शिवसेना प्रमुख होते.

सभापती महोदय, मला चांगले आठवते. मी त्यावेळी मुंबई महानगरपालिकेचा महापौर होतो. दादर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्यभूमी जवळ घाण असते. ती उद्ध्वस्त होत आहे अशा प्रकारच्या बातम्या रोज वर्तमानपत्रातून येत होत्या. तेव्हा माननीय शिवसेना प्रमुखांनी

..2..

श्री.दिवाकर रावते..

मला बोलावून घेतले आाणि सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्यभूमीचे सुशोभिकरण करुन घे. मला सांगण्यास अभिमान वाटतो की, त्यावेळी 10 कोटी रुपये मंजूर करुन श्री.शशी प्रभू आर्किटेक्ट यांच्या अधिपत्याखाली तेथील सुशोभिकरण करण्यात आले. दिनांक 6 डिसेंबर 1991 रोजी माझ्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या चिरंजीवांना बोलावून त्यांच्या हस्ते सुशोभिकरणाचे उद्घाटन करण्यात आले होते. शिवसेना प्रमुखांनी पहिल्या प्रथम चैत्यभूमीचे सुशोभिकरणाचे आदेश देऊन सुशोभिकरण करुन घेतले होते. आमची तुमच्याशी अशी नाळ जुळली आहे. शिवशक्ती व भीमशक्ती एकत्र व्हावी असा तो विषय नाही.

सभापती महोदय, राष्ट्रीयत्व, महाराष्ट्रीयत्व आणि सर्व धर्मांना एकत्र घेऊन जाणारे शिवसेना प्रमुख या देशाने पाहिले आहेत. सर्व मतभेद बाजूला ठेवून त्यांच्या विषयी आदर व्यक्त करण्याचे आपण ठरविले. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मनोभावे माननीय शिवसेना प्रमुखांबद्दल आपले विचार व्यक्त केले. आपले राजकीय मतभेद उद्याही असू शकतील. आज मातोश्रीमध्ये देव नसला तरी माननीय श्री.उध्दव ठाकरे हे माननीय शिवसेना प्रमुखांच्या आशीर्वादाने कामकाज करीत आहेत. भविष्यात आपल्यामध्ये वादही निर्माण होतील. पण शिवसेनाप्रमुखांनी जे अलोट प्रेम दिले, ज्याचा आपण विचारही करु शकत नाही ते त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी दिसून आले. भगवान श्रीकृष्णाने अर्जूनाला सांगितले की, समोर आप्त असतील वा स्वकीय असतील पण तू फक्त लढण्याचे काम कर. भगवान श्रीकृष्ण हरतऱ्हेने अर्जूनाला लढण्यास उद्युक्त करीत होते. पण ते अर्जूनाच्या पथ्यी पडत नव्हते. वारंवार सांगितल्यानंतर अर्जूनाने श्रीकृष्णाला विचारले की, आपण नक्की कोण आहात ? त्यावेळी भगवान श्रीकृष्णाने अर्जूनाला आपले भव्य रुप दाखविले. तशा प्रकारचे भव्य विराट रुप दिनांक 18 नोव्हेंबर रोजी महाराष्ट्राला, हिंदुस्थानाला आणि सर्व जगाला पहावयास मिळाले. तुमच्या आमच्यातील असलेले शिवसेना प्रमुख इतके विराट होते की ते आमच्या पक्षाच्या पलीकडचे, त्याच्याही पलीकडचे, त्याच्याही पलीकडचे असे अनाकलनीय होते. मी त्यांच्या सोबत बरीच वर्षे काढली तरी मला शिवसेना प्रमुख अजून कळले नाहीत. ते विराट रुप पाहिल्यानंतर मला ते फक्त तिळाएवढेच कळले की काय असे मला वाटायला लागले आहे.

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुखांनी संजय दत्तच्या बाबतीत निर्णय घेतला. तो प्रसंग मला आठवतो. त्यावेळी आम्ही नाना पाटेकरची भूमिका असलेला एक सिनेमा पहावयास गेलो होतो. त्यावेळी माननीय शिवसेना प्रमुख होते, मॉसाहेब होत्या, उस्मानाबादचे जिल्हाधिकारी होते. सुनील दत्तच्या बंगल्यामध्ये थिएटर होते, शिवसेना प्रमुख बाहेर आल्यावर ते धावत धावत त्यांच्या समोर आले आणि म्हणाले,

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

"साहब, मैं सोता नहीं हूं. मुझे नींद नहीं आती है. मेरा बेटा जेल में पड़ा हुआ है. वहां उसको ए.सी. नहीं है. इसलिए मैं भी अब चारपाई पर ही सोता हूं." त्यांचे एवढेच शब्द मी ऐकले त्यानंतर शिवसेनाप्रमुखांनी मनावर घेतले आणि संजय दत्त जेलमधून सुटला, त्यासाठी त्यांनी हिंमत दाखविली, त्याला मुक्त केले. आजही संजय दत्त मुक्त आहे. काय व्हायची ती शिक्षा त्याला होईल. परंतु त्याला मुक्त करण्याचे धाडस दाखविणारे शिवसेनाप्रमुख महाराष्ट्रामध्ये होते.

सभापती महोदय, मला शेवटी एवढेच म्हणावयाचे आहे की, माननीय शिवसेनाप्रमुखांचे अंतिम दर्शन आपण सर्वांनी घेतले. आज या ठिकाणी प्रत्येक माननीय सदस्य त्यांच्या मनामध्ये असलेल्या शिवसेनाप्रमुखांबद्दल बोलत होते. आपण वेगवेगळया पक्षामध्ये कुठेही असलो तरी माझ्या मनामध्ये असलेल्या शिवसेनाप्रमुखांबद्दल आपण बोलत होता. हे बोलत असतांना एका व्यक्तिमत्वाचा उल्लेख आपणाकडून करावयाचा राहून गेला आहे. माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण साहेब भाषण करीत असतांना असे बोलले की, या राज्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज झाले, त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर झाले त्यानंतर शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे झाले. परंतु आपण त्यामध्ये लोकमान्य टिळकांना सोडल्याचे माझ्या लक्षात आले. लोकमान्य टिळक सुध्दा या महाराष्ट्रामध्ये झाले. शिवसेनाप्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या एवढे उतुंग व्यक्तिमत्व झ ााले. त्या व्यक्तिमत्वाने सह्याद्रीसुध्दा हिमालयापेक्षा मोठा आहे हे दाखवून दिले. ज्यावेळी संरक्षणमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेले त्यावेळी हिमालयाच्या रक्षणाकरिता सह्याद्री धावून गेला हे स्लोगन माननीय शिवसेनाप्रमुखांनी मार्मिकमध्ये दिले होते. त्याच शिवसेनाप्रमुखांच्या कार्टूनचे सामर्थ्य किती मोठे असते याचे उदाहरण देतो.

तुमच्या कॉंग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष असलेले श्री. भोसले यांचे वडील आणि मी दादर भागात रहात होतो. त्यावेळी शिवसेनाप्रमुखांनी एकच कार्टून काढले होते. त्यावरुन त्या व्यंगचित्राची ताकद किती मोठी आणि महत्वाची होती हे लक्षात येते. त्या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर रशिया आणि आपल्या देशामध्ये जे काही चालले होते त्याचा संदर्भ घेऊन श्रीमती इंदिरा गांधी श्री. यशवंतराव चव्हाण यांना रशियन व्होडका पाजत असल्याचे व्यंगचित्रामध्ये दाखविले होते. त्यावेळी कडवट राष्ट्रवादी असलेले श्री. भोसले यांनी मला घरामधून बोलावून घेतले आणि दम देऊन विचारले की, "तुझ्या साहेबांनी हे कार्टून कसे काढले?" अशाप्रकारे ते कार्टून त्यांना झोंबले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

"आमचे यशवंतराव दारु पितात काय?" त्यावेळी मी लहान होतो. मी शिवसेनाप्रमुखांना म्हणालो की, साहेब ते भोसले गरम झाले, माझ्याबरोबर दूरध्वनीवर बोलले. त्यावेळी त्यांनी अशाप्रकारे कार्टूनमध्ये किती सामर्थ्य असते हे मला सांगितले. माननीय शिवसेनाप्रमुखांनी या देशाला व जगाला सह्याद्रीसुध्दा हिमालयापेक्षा कितीतरी मोठा आहे हे दाखवून दिले आहे. अशा या शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकाचा विषय वेगळा आहे. त्यांचे स्मारक जिथे बनावयाचे असेल तिथे बनेल. परंतु माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी त्यांच्या भाषणामध्ये त्याबाबत उल्लेख केल्यानंतर अखंड मराठी जनांचे दैवत असलेल्या शिवसेनाप्रमुखांविषयी माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे साहेब म्हणाले ते महत्वाचे आहे. ते म्हणाले की, "या पृथ्वी तलावर आणि जगाच्या पाठीवर जोपर्यंत मराठी माणूस आहे तोपर्यंत एकच शिवसेनाप्रमुख असतील व ते माननीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे असतील. अशा शिवसेनाप्रमुखांकरिता कुठेतरी नतमस्तक व्हावे अशाप्रकारचे एखादे स्थान हे शिवतीर्थावर असावे.

माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेब आपणास सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराज हे खूप मोठे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची उंची या जगामध्ये, दुनियेमध्ये कुणीही गाठू शकणार नाही. त्यामुळे आमच्या जन्मावेळी जे शिवाजी पार्क निर्माण झाले त्या शिवसेनाप्रमुखांच्या नेतृत्वाकरिता एखादे मैदान निर्माण होणे ही जगाच्या पातळीवर एकमेव गोष्ट आहृे तो कदाचित योगायोग असेल. माननीय शिवसेनाप्रमुखांचा योग्य असा सन्मान शिवसैनिकांच्या मनामध्ये, लाखो-करोडो मराठी माणसांच्या मनामध्ये असल्यामुळे त्या शिवतीर्थाबाबत आपण एकत्र बसून चर्चा करावी. त्या समाधीवर शिवसैनिकाला माथा टेकण्याचा सन्मान मिळाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे, त्याठिकाणी स्मारक व्हावे अशी आमची भूमिका नाही. याकरिता आम्ही आपल्याला नम्रपणे विनंती करतो. या शासनाने शिवसेनाप्रमुखांना जो सन्मान दिला त्याच पध्दतीने मराठी माणसांचे एकमेव आशास्थान आज त्याठिकाणी आहे, त्यालाही सन्मान द्यावा.

या विषयासंबंधी राजकारण आता संपलेले आहे. तुम्ही आम्ही आपल्या पक्षाच्या माध्यमातून राजकारण करु. शिवसेनाप्रमुख हे या राजकारणाच्या पलीकडील आहेत, मराठी माणसाचे अंतिम आशास्थान आहेत. या देशामध्ये मराठी माणूस जोपर्यंत जीवंत आहे, मराठी माणसाचा श्वास चालू आहे तोपर्यंत या देशाला कुणीही हलवू शकणार नाही, या देशाला कुणीही जिंकू शकणार नाही, या देशाकडे कुणीही वाकडया नजरेने पाहू शकणार नाही. ही सेनापती बापट यांनी दिलेली सिंहगर्जना



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

शिवसेनाप्रमुखांनी आपल्या 50 वर्षाच्या संपूर्ण आयुष्यामध्ये मराठी माणसाच्या मनगटामध्ये असलेल्या सामर्थ्याच्या कृतीमधून दाखवून दिली आहे. ते सामर्थ्य दाखविण्याकरिता आपल्याला हे करावे लागेल या जाणिवेतून करावे अशाप्रकारे सर्वच पक्षाच्या माननीय सदस्यांना मी हे आवाहन करीत आहे. ते आम्हाला पाहिजे म्हणून नाही, तुम्हाला पाहिजे म्हणून नाही तर तुमच्या आमच्या मराठी माणसाच्या मनातील, सह्याद्रीच्या कडे-कपारीतील सामर्थ्य देशाला दिसण्याकरिता आणि कायम स्वरुपामध्ये त्या ठिकाणी माथा टेकण्याकरिता एक समाधीस्थान आपण निर्माण करावे अशाप्रकारे या माध्यमातून आपणा सर्वांना विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय शिवसेनाप्रमुख आम्हाला सोडून गेले हे माझे व्यक्तिगत नुकसान झाले, पहिल्या दिवसापासून आजपर्यंत मी खूप भारावून गेलो. सभागृहामध्ये आपण सर्वांनी शिवसेनाप्रमुखांना जी आदरांजली वाहिली त्याबद्दल मी शिवसेनेच्या वतीने आणि माननीय श्री. उध्दवजी ठाकरे यांच्यावतीने कृतज्ञता व्यक्त करतो. आपण जो आदर व्यक्त केला आहे त्याचा मी आदर राखतो. शिवसेनाप्रमुख हे सदैव आमच्यामध्ये आहेत आम्ही त्यांना कधीही कैलासवासी म्हणणार नाही. महात्मा ज्योतिबा फुले हे कैलासवासी नाहीत, महात्मा गांधी हे कैलासवासी नाहीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुध्दा कैलासवासी नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज तर नाहीच नाहीत आणि लोकमान्य टिळक तर नाहीच त्याप्रमाणे शिवसेनाप्रमुख हे तुमच्या आमच्याकरिता कायम स्फूर्तीस्थान राहणार असल्यामुळे ते शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे आहेत, या देशाचे ते एकमेव हिंदू हृदय सम्राट आहेत. म्हणून मी मन:पूर्वक माझ्या भावना व्यक्त करीत असतांना शेवटी एवढेच सांगतो की, साहेब, तुम्ही आम्हाला आदेश दिले त्याप्रमाणे शिवसैनिक म्हणून आम्ही जगलो आणि आताही तसेच जगत आहोत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मी कितीही मोठा नेता असलो तरी मी शिवसैनिका सारखा जगतो. साहेब तुम्ही सांगितले त्यांना आम्ही भिडलो, सांगाल तेथे लढलो पण, शिवसेनाप्रमुख आयुष्यात आम्ही फक्त यमा पुढे हरलो ! यमा पुढे हरलो !!

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते आणि उप मुख्यमंत्री सन्माननीय श्री. अजितदादा पवार यांनी या सदनामध्ये श्री. इंद्रकुमार गुजराल, श्री. विलासराव देशमुख माजी, मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री, सर्वश्री बाबासाहेब कुपेकर, विधानसभा सदस्य व माजी अध्यक्ष, विधानसभा, शंकरराव जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा, शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे तसेच सर्वश्री विठ्ठलराव सायण्णा दिकोंडा, कन्हैयालाल गिडवाणी व सदाशिवराव शिंदे, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे.त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना या सदनामध्ये व्यक्त केलेल्या आहेत.

कै. इंद्रकुमार गुजराल यांनी सन 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यामध्ये प्रखर देशभक्त म्हणून भाग घेतला होता. सन 1964, सन 1990 व सन 1992 अशा तीन वेळा ते राज्यसभेवर तर सन 1989 व सन 1998 अशा दोन वेळा लोकसभेवर ते निर्वाचित झाले होते.केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये विविध खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी कार्य केलेले आहे. विशेषत: देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी केलेले काम हे या देशातील अजरामर पद्धतीचे काम आहे.एप्रिल, 1997 ते मार्च 1998 या काळात भारत देशाचे पंतप्रधान म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे.अशा या स्वातंत्र्यवीराचे आणि भारताच्या माजी पंतप्रधानांचे दिनांक 30 नोव्हेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

आपल्या सर्वांचे जीवाभावाचे सहकारी विलासराव देशमुख हे अत्यंत परखड विचारांचे तरुण नेते होते.त्यांनी ग्रामीण विभागातील एक तरुण कार्यकर्ता म्हणून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद या त्रिस्तरीय राजकारणामधून आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली. ग्रामीण भागातील सामान्य माणसासाठी स्वत:ला झोकून दिले होते. ते स्वत: बी.एससी., एल.एल.बी., असताना सुध्दा त्यांनी वकिलीमध्ये गुंतून न राहता खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील विविध समाजातील सर्व लोकांना जीवाभावाचे मित्र म्हणून जोडले. ते अत्यंत परखड विचारांचे असतानाही महाराष्ट्र डोळ्यासमोर ठेवून राज्यातील तिन्ही विभागांचा समतोल विकास व्हावा या दृष्टीने अनेक विभागांमध्ये काम करताना तसेच मुख्यमंत्री म्हणून काम करताना खऱ्या अर्थाने त्यांनी आपल्या कामाची छाप या महाराष्ट्रामध्ये निर्माण केली.असे माझे सहकारी मित्र स्वर्गीय विलासराव देशमुख हे माननीय वसंतदादांच्या मंत्रीमंडळामध्ये देखील राज्यमंत्री होते. त्यावेळेस मी देखील राज्यमंत्री होतो.आम्ही दोघेजण एकाच विभागाचे म्हणजे गृह विभागाचे मंत्री होतो. सर्व साधारणपणे अनुभव असा आहे की, दोन गृहमंत्र्यांचे पटेल की नाही याबद्दल काही वेळा शंका व्यक्त केली जाते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

मंडळामध्ये राज्यमंत्री होते. त्यावेळेस मी देखील राज्यमंत्री होतो.आम्ही दोघेही एकाच गृह विभागाचे मंत्री होतो. सर्वसाधारणपणे अनुभव असा आहे की, दोन गृहमंत्र्यांचे पटेल का याबद्दल काही वेळा शंका व्यक्त केली जाते. पण विलासरावजी एवढ्या मोठ्या मनाचे होते की, आम्ही किमान तीन वर्षे गृह राज्यमंत्री म्हणून काम केले. आम्ही दोघांनीही काही पथ्ये पाळली होती की, कोणत्याही पद्धतीची मतभिन्नता आमच्यामध्ये होता कामा नये. राज्याचे हित आम्ही डोळ्यापुढे ठेवावे आणि या दृष्टिने सातत्याने काम करताना त्यांच्या सहकार्यामुळेच मला राज्यामध्ये गृह राज्यमंत्री म्हणून काम करता आले.

नंतर श्री. बरवड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

परंतु विलासरावजी एवढ्या मोठ्या मनाचे होते की, आम्ही किमान तीन वर्षे गृह राज्यमंत्री म्हणून काम केले. आम्ही दोघांनीही काही पथ्ये पाळली होती की, आमच्यामध्ये कोणत्याही पध्दतीची मतभिन्नता निर्माण होता कामा नये, राज्याचे हित आपण डोळ्यासमोर ठेवावे. या दृष्टीने सातत्याने त्यांच्या सहकार्यामुळेच मला राज्यामध्ये गृह राज्यमंत्री म्हणून काम करता आले.

विलासरावजी 1980, 1985, 1990, 1999 आणि 2004 असे पाच वेळा लातूर विधानसभा मतदारसंघातून निवडून आले. एक अत्यंत कर्तृत्वसंपन्न व्यक्ती असताना राजकीय आघात कसा होतो यांचे दोन अनुभव दुर्दैवाने त्यांच्यासमोर आले. एक म्हणजे लातूर मतदासंघामध्ये ते एक वेळा दुर्दैवाने पराभूत झाले त्याचबरोबर एक वेळा विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. विधान परिषद निवडणुकीच्या वेळी आम्हा काही लोकांना असे वाटत होते की, हा एक उमदा नेता आहे, त्याला भवितव्य आहे, राज्याचे नेतृत्व करण्याची कुवत आहे, अशा परिस्थितीत त्यांनी या निवडणुकीमध्ये शेवटपर्यंत उभे राहू नये. स्व. रामराव आदिक साहेबांनी मला सांगितले की, तुम्ही विलासरावजींकडे जावे आणि तुमचा आणि माझा हा निरोप सांगावा. पण विलासरावजी त्यांनी घेतलेला एखादा निर्णय काहीही झाले तरी बदलण्याचे शक्यतो कधीही कबूल करीत नसत. त्या पध्दतीने त्यांनी मला सांगितले की, उद्या निवडणूक आहे आणि आज रात्री 11.00 वाजता तुम्ही आणि मी या निवडणुकीतून माघार घेण्याबाबत चर्चा करीत आहोत पण ते माझ्या बाबतीत शक्य होईल असे वाटत नाही आणि त्यांनी ते स्वीकारले नाही.

नंतरच्या काळात स्व. विलासरावजी देशमुख यांना दोन वेळा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांमध्ये, विभागांमध्ये कोणत्याही पध्दतीच्या, कोणत्याही जातीच्या गरिबाला मदत करण्याचा त्यांचा दृष्टीकोन होता. गोरगरीब समाज ही खऱ्या अर्थाने त्यांची ताकद होती, शक्ती होती. हे काम करीत असताना गोरगरीब, सामान्य माणसांचा आशीर्वाद ही खरी शक्ती त्यांच्या पाठीशी राहिली. आयुष्यामध्ये सर्वात जास्त विविध खात्यांचा अनुभव असणारे मंत्री बघावयाचे झाले तर त्यामध्ये श्री. विलासराव देशमुख होते ही वस्तुस्थिती आहे. .

केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्यावर जी जबाबदारी दिली

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** .....

ती पार पाडत असताना आयुष्यातील किमान 35 वर्षे महाराष्ट्रातील अनेक प्रश्न सोडविण्याचा अनुभव असणारे आणि महाराष्ट्रामधील प्रत्येक प्रश्नामध्ये लक्ष घालणारे विलासराव त्या ठिकाणी फार रमले असे मलाही कधी वाटले नाही. अशा परिस्थितीत अचानक ते एका दुर्धर आजाराने आजारी पडले. राष्ट्रपतींच्या निवडणुकीच्या अनुषंगाने ज्यावेळी ते मुंबईत आले त्यावेळी आम्हा सर्वांची नजर त्यांच्याकडे गेली आणि आम्ही सर्वांनी त्यांना सांगितले की, विलासरावजी, आज तुमची प्रकृती चांगली नाही आणि हे योग्य नाही. त्यानंतर दुर्दैवाने विलासराव आपल्यातून निघून गेल्यामुळे पुन्हा आमची कधी भेट झाली नाही. आयुष्यामध्ये असणारी ही एक रुखरुख आहे. अत्यंत ध्येयवादी, परखड विचाराचे, सामान्य हा केंद्रबिंदू समजून त्यांच्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ...

मी जेव्हा राज्याचा पाटबंधारे मंत्री होतो त्यावेळी बजेटच्या दिवशी त्यांनी मला सांगितले की, शिवाजीराव, आज तुमच्या पायाला थ्रो बॉलने मोठी जखम करण्याची माझी इच्छा आहे. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, मी थ्रोबॉल वगैरे काही पहात नाही. मी सरळ बॉलवर खेळणारा खेळाडू आहे. एखादा लोकप्रतिनिधी किती प्रखर बुद्धिमत्तेचा आणि अभ्यासू असावा हे त्यांचे भाषण ऐकल्यावर समजते. आपल्या भाषणातून घणाघाती हल्ला करीत असताना देखील सामान्य आणि तळागाळातील माणूस हा त्यांनी केन्द्रबिंदू मानला. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये सांगितले की, माझ्या विभागामध्ये अनेक ठिकाणी पाण्याचे पाट वहात आहेत. मी सांगितले की, आपण केलेली सूचना मी गांभीर्याने घेतलेली असून माझ्या विभागामध्ये असे काही असेल तर मी जरुर योग्य ती कार्यवाही करीन. परंतु माझ्या विभागामध्ये धरणाच्या बाबत काही फरक पडू नये म्हणून एक शास्त्र आहे आणि त्यासाठी प्रत्येक धरणामध्ये थोडेसे पाणी लिकेज ठेवले जाते. तसे ते शास्त्र असेल तर ते मी तपासून घेईन. पण आपण म्हणता त्याप्रमाणे काही वस्तुस्थिती असेल तर मी कठोर कारवाई करीन. अशा प्रकारे सदनामध्ये एवढया प्रखरपणे आणि परखडपणे बोलणारा असा हा नेता होता. 14 ऑगस्ट 2012 रोजी ते आपल्यातून गेले. एक जिवाभावाचे व्यक्तिमत्व या नात्याने आपण सर्वजण त्यांच्याकडे पहातो.

स्वर्गीय बाबासाहेब कुपेकर आणि माझा संबंध जवळ जवळ 30 वर्षापासूनचा होता. आम्ही दोघेही जवळच्या जिल्ह्यातील होतो. दोघेही जिल्हा परिषदेचे सदस्य आणि पदाधिकारी होतो. कोल्हापूर जिल्ह्यातील अत्यंत सुशिक्षित व्यक्तिमत्व या अनुषंगाने त्यांना आम्ही पहात होतो. अनेक विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. 1995, 1999, 2004 आणि 2009 असे एकूण चार वेळा ते गडहिंग्लज मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. 1999 ते 2004 या काळात राज्याचे सहकार, पर्यावरण, कामगार, उद्योग व माजी सैनिकांचे कल्याण या खात्यांचे राज्यमंत्री म्हणून त्यांनी काम केले होते. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अत्यंत उत्कृष्ट काम केले होते. अशा एका अभ्यासू लोकप्रतिनिधीचे, कुशल प्रशासकाचे, उत्कृष्ट संसदपटूचे दिनांक 26 सप्टेंबर 2012 रोजी दु:खद निधन झाले.

स्वर्गीय शंकरराव जगताप हे सातारा जिल्हयातील एक कष्टाळू, सुशिक्षित आणि वकिलीपर्यन्त शिक्षण झालेले व्यक्तिमत्व. 1978, 1980, 1985, 1990 आणि 1995 असे सलग पाच



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

वेळा ते सातारा जिल्ह्यातील कोरेगाव मतदार संघातून निवडून आले होते. इतर मागासवर्गीय समाजातील असतानाही दोन्ही समाजातील दुवा या दृष्टीने ते सातारा जिल्ह्यात काम करीत होते. 1980 ते 1985 या काळात विधानसभेचे उपाध्यक्ष तर 1985 ते 1990 या काळात विधानसभेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांचे दिनांक 25 ऑगस्ट 2012 रोजी दु:खद निधन झाले.

स्वर्गीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे महाराष्ट्रातील सर्वसामान्यांची एक जबरदस्त अशी मोठी शक्ती या दृष्टीने पाहिले जाते. शिवसेना निर्मितीचे बाळासाहेब हे प्रमुख होते.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 16:30

सभापती....

सर्व पक्षांमध्ये त्यांचे अनेक सहकारी होते. ज्या ज्या वेळी राज्यातील अडचणींचे प्रश्न असतील, राज्याच्या हिताचे प्रश्न असतील, राज्यातील विविध समाजातील प्रश्न असतील, त्या त्या वेळी त्यांच्या बरोबर चर्चा करण्यासाठी अनेक पक्षीय लोक प्रसंगानुरुप जात असत. मला देखील काही महत्वाच्या विषयांवर त्यांच्यासमवेत चर्चा करण्याचा योग आला होता. मी अत्यंत निकडीच्या प्रश्नाच्या वेळी त्यांच्याकडे चर्चा करण्यासाठी गेलो होतो.

स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा लढयात सक्रीय सहभाग घेतला होता. त्यात त्यांना कारावासही झाला होता. त्यांनी सुरुवातीस काही काळ "फ्रि प्रेस जर्नल" या वृत्तपत्रात व्यंगचित्रकार म्हणून कामही केलेले आहे. नंतरच्या काळात साप्ताहिक "मार्मिक", "दैनिक सामना" यात त्यांनी संपादक म्हणून काम केले. अत्यंत ध्येयवादी असणाऱ्या, प्रखर विचार असलेल्या बाळासाहेबांनी 1966 मध्ये शिवसेनेची स्थापना केली. महाराष्ट्रावर ज्या ज्या वेळी अत्यंत कठीण प्रसंग आले, त्या प्रत्येक प्रसंगी त्यांनी सहकार्याची भूमिका घेतली होती. महाराष्ट्रात 1992-1993 या काळात जातीय संघर्ष निर्माण झाला होता. 1992 च्या शेवटी व फेब्रुवारी 1993 हा काळ सर्वांचा कस पाहणारा होता. त्यावेळी बाळासाहेबांनी आपले प्रखर नेतृत्व सिध्द करण्याचा प्रयत्न केला. त्या काळात मुंबई शहर कसे शांत राहील या अनुषंगाने आपण सर्वांनी सामुदायिकपणे विचार करण्याचा प्रयत्नही केला. अत्यंत कुशल संघटक, बेडरपणाचे नेतृत्व असणारे, आपले विचार कितीही परखड असतील, ते कोणालाही न पटणारे असतील तरी त्यासंबंधी कोणाचीही मुलाहिजा न ठेवता विचार व्यक्त करणारे, महाराष्ट्राच्या हिताकरिता कोणतेही कष्ट पडले तर लढण्याची हिंमत दाखविणारे असे व्यक्तिमत्व 17 नोव्हेंबर, 2012 रोजी दुर्देवाने निघून गेले. हे व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले असे न मानता त्यांचे विचार पुढच्या काळात प्रखर रहावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. सदनातील सर्व सदस्यांनी जे विचार मांडले, त्या विचारांशी मी देखील सहमत आहे.

माजी विधान परिषद सदस्य विठ्ठलराव दिकोंडा हे 1942 च्या लढयात लढलेले एक स्वातंत्र्यवीर होते. त्या लढयात त्यांना कारावासही भोगावा लागला होता. सोलापूर जिल्हयात अनेक क्षेत्रामध्ये काम करणारे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांचे शनिवार, दिनांक 20 ऑक्टोबर, 2012 रोजी दु:खद निधन झालेले आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

कै.कन्हैयालाल गिडवाणी यांचे कुटुंब सिंध प्रांतातून येऊन सांगली येथे स्थायिक झाले होते. ते सांगलीमध्ये अनेक क्षेत्रात काम करीत होते. ते अत्यंत जिद्दी असे कार्यकर्ते होते. ते विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे दिनांक 27 नोव्हेंबर, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

माजी विधान परिषद श्री.विठ्ठलराव शिंदे यांनी 1942 च्या स्वातंत्र्य लढयात सक्रीय सहभाग घेतला होता. कोल्हापूर जिल्हयात अनेक क्षेत्रात त्यांनी काम केलेले आहे. 1964 आणि 1970 या कालावधीत कोल्हापूर स्थानिक प्राधिकरण मतदार संघातून विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. त्यांचे दिनांक 23 सप्टेंबर,2012 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:35

**सभापती**.....

या दिवंगतांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोकप्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: शोकप्रस्तावानंतर सभागृहाचे कामकाज स्थगित करणे

**सभापती** : भारताचे माजी पंतप्रधान कै.इंद्रकुमार गुजराल; कै.विलासराव देशमुख, माजी मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री; कै.बाबासाहेब कुपेकर, माजी अध्यक्ष, विधानसभा व मंत्री; कै.शंकरराव चिमाजी जगताप, माजी अध्यक्ष, विधानसभा; शिवसेनाप्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे आणि इतर माजी विधानपरिषद सदस्य यांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सभागृहाचे आजचे कामकाज स्थगित करण्यात येत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 11 डिसेंबर, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 04 वाजून 37 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 11 डिसेंबर, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही